सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, १५ ऑगस्ट २०२४ । युगाब्द ५१२५ । वर्ष ३९ वे अंक २८६ ।
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत

### उद्या अंक नाही

भारतीय स्वातंत्र्यदिनानिमित्त गुरुवार, दि. १५ ऑगस्ट २०२४ रोजी दै. सोलापूर तरुण भारत कार्यालयास दिवस सुटी आहे. त्यामुळे शुक्रवार, दि. १६ ऑगस्ट २०२४ चा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, विक्रेते आणि जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.

**- व्यवस्थापक**

# स्वातंत्र्यदिनी आत्मघाती हल्ल्याचा कट

### पंजाब, दिल्लीत 'हाय अलर्ट'

### मोठ्या समूहाला अतिरेकी करू शकतात लक्ष्य

**◆ नवी दिल्ली, १४ ऑगस्ट**

सध्या जम्मूमध्ये सक्रिय असलेल्या दहशतवादी गटातील एक अथवा दोन दहशतवादी स्वातंत्र्यदिनाच्या दरम्यान दिल्ली किंवा पंजाबमध्ये आत्मघाती हल्ल्याचा प्रयत्न करू शकतात, अशी माहिती मिळाल्यानंतर गुप्तचर यंत्रणा 'हाय अलर्ट'वर आहेत. पण गुप्तचर यंत्रणांनी हेदेखील सूचित केले की, सुरक्षा दलांच्या मोठ्या प्रमाणातील तैनातीमुळे १५ ऑगस्टला हल्ल्याची योजना आखली गेली नसावी. परंतु, एक किंवा दोन दिवसांनी आत्मघाती हल्ल्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो.

जम्मू-काश्मीरमधील कठुआच्या सीमेला लागून असलेल्या एका गावात शस्त्रांसह दोन अज्ञात व्यक्तींच्या हालचाली दिसून आल्या आहेत. ते जवळच्या शहराकडे जाण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे एका गुप्तचर माहितीच्या हवाल्याने सूत्राने सांगितले.

१ जून रोजी स्फोटकांची खेप जम्मू शहराच्या एका अंतर्गत भागात पोहोचली. या स्फोटकांचा वापर पुढील काही दिवसांत सुरक्षा आस्थापने, छावण्या, वाहने अथवा महत्त्वाच्या ठिकाणांना लक्ष्य करण्यासाठी केला जाऊ शकतो, असे सूत्रांनी म्हटले आहे.

गुप्तचरांच्या माहितीनुसार, पंजाब आणि जम्मू-काश्मीरमध्ये लगतच्या भागात कार्यरत असलेले आयएसआय पुरस्कृत गँगस्टर्स, कट्टरपंथी आणि दहशतवाद्यांचा स्वातंत्र्य दिन आणि अमरनाथ यात्रा विस्कळीत करण्याचा प्रयत्न होता. १५ ऑगस्टच्या आसपास मोठ्या समूहाला लक्ष्य करण्यासाठी घातक आयईडी स्फोटकांचा वापर केला जाऊ शकतो. या पृष्ठभूमीवर अलर्टमध्ये म्हटले की, सरकारच्या काही निर्णयांचा अथवा कारवाईचा बदला घेण्याच्या शक्यतेमुळे हा धोका आणखी वाढला आहे.

**जम्मूत दहशतवादी गट सक्रिय**

कठुआ, डोडा, उधमपूर, राजौरी आणि पूंछ जिल्ह्यांतील अलीकडील काही दहशतवादी हल्ल्यांमुळे जम्मू प्रदेशात सशस्त्र दहशतवादी गट सक्रिय असल्याचे उघड झाले आहे. या माहितीवरून या दहशतवादी संघटनांचा उद्देश आणि नियोजन उघड झाले आहे. उच्चपदस्थ प्रतिष्ठित व्यक्ती, आस्थापने, प्रसिद्ध आणि महत्त्वाची ठिकाणे आणि गर्दीच्या ठिकाणांना लक्ष्य करून घातपात घडविण्याचा दहशतवादी संघटनांचा कट असल्याची माहिती मिळाली आहे. लष्कर-ए-तोयबा आणि जैश-ए-मोहम्मदचा दिल्लीला लक्ष्य करण्याचा कट असल्याचेही गुप्तचर अहवालात नमूद आहे. ◀(वृत्तसंस्था)



स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला दिल्लीत विद्यार्थ्यांनी काढलेल्या तिरंगा यात्रेचे दृश्य. यात्रेत विद्यार्थ्यांनी विविध वेशभूषा केल्या होत्या.

## पंतप्रधान मोदी आज करणार संबोधित

**नवी दिल्ली, दि. १४ ऑगस्ट**

भारत यंदा ७८ वा स्वातंत्र्यदिन साजरा करणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यावर्षी लाल किल्ल्यावरून अकरावे भाषण देणार आहेत.



गुरुवारी सकाळी ७.३० वाजता पंतप्रधान मोदी भाषण करण्यापूर्वी लाल किल्ल्यावर तिरंगा फडकवतील. यंदाच्या स्वातंत्र्यदिनाची थीम विकसित भारत आहे. २०४७ पर्यंत भारताचा प्रत्येक क्षेत्रात विकास व्हावा, हे केंद्र सरकारचे ध्येय आहे. शिक्षण, आरोग्य आणि तंत्रज्ञानात सुधारणा करून विकासावर लक्ष केंद्रित करणे हा, या थीमचा उद्देश आहे.

# अमित शाह यांची हुतात्म्यांना आदरांजली

### फाळणीच्या यातना देश विसरणार नाही

**◆ नवी दिल्ली, १४ ऑगस्ट**

देशाच्या फाळणीच्या वेळी ज्यांनी यातना भोगल्या आणि ज्यांनी हौत्मात्म्य पत्करले त्यांना देश कधीही विसरणार नाही. जो देश आपला इतिहास लक्षात ठेवतो, तो एक शक्तिशाली देश म्हणून उदयास येऊन आपले भविष्य घडवू शकतो, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी समाज माध्यम 'एक्स'वर लिहिले आणि हुतात्म्यांना आदरांजली अर्पण केली.

१९४७ मध्ये १४ ऑगस्ट रोजी ब्रिटिशांनी भारताचे विभाजन केल्यानंतर पाकिस्तान हा मुस्लिम देश म्हणून उदयास आला. फाळणीनंतर मोठ्या प्रमाणात दंगली झाल्यामुळे लाखो लोक विस्थापित झाले आणि अनेकांना आपला जीव गमवावा लागला होता.

फाळणीच्या भयावह परिस्थितीत ज्या लाखो लोकांना अनन्वित यातना सहन कराव्या लागल्या, काहींनी आपले प्राण गमावले, अनेक जणांना बेघर व्हावे लागले, त्यांना माझी श्रद्धांजली, असे अमित शाह यांनी 'एक्स' वर लिहिले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली या दिवसाचे स्मरण म्हणजे राष्ट्र निर्मितीच्या प्रक्रियेतील आधारभूत पाया असल्याचे ते म्हणाले.



केंद्रीय गृह मंत्री अमित शाह यांनी बुधवारी दिल्लीतील निवासस्थानी तिरंगा फडकवला

मोदी सरकार २०२१ पासून, देशाच्या फाळणीच्या वेळी ज्यांनी आपले प्राण गमावले त्यांच्या स्मरणार्थ १४ ऑगस्ट हा 'विभाजन विभीषिका स्मृती दिवस' म्हणून पाळत आहे.

२०२१ मध्ये विभाजन विभीषिका स्मृती दिवसाची घोषणा करताना, पंतप्रधान मोदी म्हणाले होते की, लोकांच्या संघर्ष आणि बलिदानाच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जाईल, कारण फाळणीच्या वेदना कधीही विसरता येणार नाहीत. फाळणीमुळे झालेल्या हिंसाचारात लाखो लोक विस्थापित झाले आणि अनेकांना आपला जीव गमवावा लागला, असेही मोदींनी नमूद केले होते. ◀(वृत्तसंस्था)

# केजरीवालांना नाकारला अंतरिम जामीन

**◆ नवी दिल्ली, १४ ऑगस्ट**

उत्पादन शुल्क घोटाळा प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना बुधवारी अंतरिम जामीन नाकारला आहे. या प्रकरणी २३ ऑगस्टपर्यंत उत्तर द्या, असे सांगत सीबीआयला नोटीस बजावली आहे.

उत्पादन शुल्क घोटाळा प्रकरणात केजरीवालांनी दाखल केलेल्या याचिकेवर बुधवारी न्यायालयात सुनावणी झाली. केजरीवाल यांनी केंद्रीय एजन्सीद्वारे केलेल्या अटकेला आव्हान देणारी स्वतंत्र याचिका न्यायालयात दाखल केली होती.

यावर आज न्या. सूर्यकांत आणि न्या. उज्ज्वल भुयान यांच्या न्यायासनासमोर सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने सध्या अंतरिम जामीन नाही, असे स्पष्ट करीत सीबीआयला २३ ऑगस्टपर्यंत उत्तर द्या नोटीस जारी केली आहे. यानंतर पुढील सुनावणी होणार आहे. ◀(वृत्तसंस्था)

# पीडितेच्या पालकांना तीन तास ताटकळत ठेवले

**कोलकाता, १४ ऑगस्ट**

कोलकाता येथील निवासी महिला डॉक्टरच्या बलात्कार आणि हत्या प्रकरणामुळे देशभरात संतापाची लाट उसळली असताना ठिकठिकाणी निवासी डॉक्टर न्यायाच्या म ागणीसाठी रस्त्यावर उतरले होते. दुसरीकडे, पीडितेच्या पालकांना तिचा मृतदेह देण्याआधी रुग्णालय प्रशासनाने तब्बल तीन तास नुसते ताटकळत उभे ठेवले होते, अशी संतापजनक माहिती समोर आली आहे. यासंदर्भात पीडितेच्या शेजारच्या व्यक्तीने सांगितले की, तिची आई माझ्याकडे रडत आली की माझे सर्वस्व गेले. मी विचारले काय झाले तर तिने सांगितले, माझ्या मुलीने आत्महत्या केल्याचे हॉस्पिटलने सांगितले आहे. हे कळताच मुलीचे माता, पिता, मी आणि आणखी एकजण असे चार लोक रुग्णालयाकडे धावलो. तिथे गेल्यानंतर मुलीच्या आई-वडिलांना थांबा असे सांगण्यात आले. हे थांबणे थोडेथोडके नव्हते तर तब्बल तीन तास त्यांना त्या दु:खावेगाच्या स्थितीत ताटकळत उभे राहावे लागले. ते थोड्या थोड्या वेळाने दिसेल त्याला हात जोडून, पाया पडून विनंती करत होते की, आमच्या मुलीचा चेहरा तर एकदा दाखवा. त्यानंतर मुलीच्या वडिलांना तिचा मृतदेह पाहण्याची परवानगी देण्यात आली आणि त्यांनी फोटो काढून आणला.

## तर पक्ष आणि चिन्ह काय सगळंच दिलं असतं

**लातूर, दि. १४ ऑगस्ट**

ही बहीण फक्त १५०० रुपयांसाठी भावांवर प्रेम करत नाही, तर मनापासून प्रेम करते. भावाने मागितले असते तर सर्व देऊन टाकले असते. पक्ष आणि चिन्ह काय? सगळे देऊन टाकले असते, असे विधान खासदार सुप्रिया सुळे यांनी केले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी चुकीची कबुली दिल्यानंतर सुप्रियांच्या या विधानाची चर्चा जोरात रंगली आहे. राखी पोर्णिमेच्या मुहुर्तावर बहिण-भावाचा मिलाफ पुन्हा होणार का? असे अडाखे आता राजकीय वर्तुळात बांधले जात आहेत. राज्यात विधानसभेची निवडणूक तोंडावर आल्यामुळे सर्व राजकीय पक्षांनी कंबर कसली आहे. सध्या राज्यातील सर्वच पक्षांच्या नेत्यांचे राज्यभर दौरे सुरु असून या दौऱ्यात मेळावे, सभा आणि मतदारसंघाचा आढावा घेण्यात येत आहे. या सभांच्या माध्यमातून सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात आरोप-प्रत्यारोपाचं राजकारण सुरु आहे. अशातच काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामती लोकसभा मतदारसंघाबाबत माठे विधान केले होते. बारामतीमध्ये सुप्रिया सुळे यांच्या विरोधात सुनेत्रा पवार यांना उमेदवारी देऊन चूक केली. आता मला वाटतं की हा निर्णय चुकीचा होता, असे अजित पवार यांनी एका मुलाखतीत म्हटले होते.

# मनोज जरांगेंसोबत तिसरी आघाडी स्थापन करणार

### संभाजीराजे छत्रपतींचा दावा; लवकरच बोलणी

**कोल्हापूर, दि.१४ ऑगस्ट**

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे २९ ऑगस्ट रोजी विधानसभा निवडणुकीबाबत आपला निर्णय जाहीर करणार आहेत. मात्र त्या आधीच त्यांच्या विधानसभा निवडणूक लढवण्याच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. त्यातच संभाजीराजे छत्रपती यांच्या स्वराज्य पक्षाच्या वतीने देखील विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू करण्यात आली आहे. आपण मनोज जरांगे पाटील यांच्यासोबत तिसरी आघाडी करणार असल्याची माहिती संभाजीराजे छत्रपती यांनी दिली आहे. या संदर्भात मनोज जरांगे पाटील यांच्यासोबत लवकरच बोलणी करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

विधानसभा निवडणूक एकत्र लढवण्याबाबत आपली आणि मनोज जरांगे पाटील यांची अद्याप चर्चा झालेली नाही. मात्र, या संदर्भात आपण लवकरच चर्चा करणार असल्याचे संभाजीराजे छत्रपती यांनी सांगितले आहे. समाजामध्ये काम करत असताना मनोज जरांगे पाटील यांचे उद्दिष्ट आणि माझा उद्देश एकच आहे. त्यामुळे आम्ही एकत्र येऊन काम करणार असल्याचा देखील विश्वास संभाजीराजे छत्रपती यांनी व्यक्त केला आहे. पुणे जिल्ह्यातून अहमदनगर जिल्ह्याकडे जात असताना मनोज जरांगे पाटील यांनी पुण्यात माध्यमांशी संवाद साधला होता. त्यावेळी राज्यातील २८८ विधानसभा मतदारसंघात उमेदवार देणार असल्याचे संकेत मनोज जरांगे पाटील यांनी दिले होते. तसेच मनोज जरांगे पाटील यांनी विधानसभा निवडणुकीच्या तयारीला लागा, कागदपत्रे जमा करा, असे आवाहन देखील मराठा समाजातील इच्छुक उमेदवारांना केले होते.

# खा. सुप्रिया सुळे यांच्यावर यंत्रणेद्वारे पाळत

### महेश तपासे यांचा आरोप

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई दि.१४ ऑगस्ट :**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्यावर यंत्रणेच्या माध्यमातून महायुती सरकार पाळत ठेवत आहे ,असा आरोप शरद पवार पक्षाचे मुख्य प्रवक्ते महेश तपासे यांनी बुधवारी केला. याबाबत गृह विभागाने तातडीने खुलासा करावा अशी मागणी ही त्यांनी केली आहे.

सुप्रिया सुळे यांचा मोबाईल व व्हाट्सअप अकाउंट नुकताच हॅक झाल्यामुळे वेगवेगळ्या चर्चांना उधाण आलेले आहे .लोकसभा निवडणुकीमध्ये त्यांचा पराभव करण्याकरिता भाजपने सर्वत्र प्रयत्न केले. मात्र त्या मोठ्या मताधिक्याने विजयी झाल्यामुळे भाजपाच्या पचनी पडले नाही व अजित पवार यांना घेऊन काहीच फायदा झाला नाही आपल्या राजकीय विरोधाकांवर पाळत ठेवण्याचे आरोप याआधी देखील भारतीय जनता पार्टीवर अनेक वेळा झाले. त्यातच मध्यंतरी पेगासस स्पायवेअरचा उपयोग केला जातो अशाही शंकांना उभारी देणाऱ्या बातम्या देखील प्रसिद्ध झाल्याची आठवण तपासे यांनी करून दिली. महाराष्ट्रात होणाऱ्या आगामी विधानसभा निवडणुका लक्षात घेता पेगासस सॉफ्टवेअरच्या माध्यमातून आमच्या नेत्यांच्या हालचालींवर विशेष करून सुप्रिया सुळे, उद्धव ठाकरे, प्रदेशाध्यक्ष जयंती पाटील, नाना पटोले यांच्यावर यंत्रणेच्या माध्यमातून पाळत असण्याची शंका नाकारता येत नाही. संसदेमध्ये प्रभावी वक्तव्याच्या माध्यमातून खासदार सुप्रियाताई सुळे यांनी नुकताच अर्थसंकल्पीय अधिवेशनात सरकारला घेरले व त्यानंतर लगेचच त्यांचे पती श्री सदानंद सुळे यांना आयकर विभागाची नोटीस आल्याची माहिती सुप्रियाताई सुळे यांनी दिली आहे. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर पक्षाचे प्रवक्ते तपासे यांनी महाराष्ट्राच्या गृह विभागाने याबाबतचा खुलासा करण्याची मागणी केली आहे.



# राज्यातील ५९ पोलिस अधिकारी, अंमलदारांना राष्ट्रपती पोलीस पदक

### स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वदिनी घोषणा

**मुंबई, दि.१४ ऑगस्ट:**

७८ व्या स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वदिनी केंद्रीय गृह मंत्रालयाकडून महाराष्ट्र पोलीस दलात विविध घटकात कार्यरत असलेल्या ५९ अधिकारी व अंमलदाराना राष्ट्रपती, शोर्य व पोलीस पदके जाहीर करण्यात आली आहेत.

त्यामध्ये अप्पर महासंचालक चिरंजीवी प्रसाद, राजेंद्र डहाळे, सतीश श्र गोवेकर या पोलिस अधिकाऱ्यांना विशिष्ट सेवेसाठी 'राष्ट्रपती पोलीस पदक' प्रदान करण्यात आले. यासह राज्यातील १७ पोलिस अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्याना 'पोलीस शौर्य पदक' तर ३९ पोलिसांना गुणवत्तापूर्ण सेवेसाठी 'पोलीस पदक जाहीर करण्यात आली.

'राष्ट्रपती पोलीस शौर्य पदक' आणि 'पोलीस शौर्य पदक', जीवन आणि मालमत्ता यांचे संरक्षण, गुन्हेगारीला पायबंद आणि गुन्हेगारांना अटक करण्यासाठी उल्लेखनीय शौर्यासाठी दिले जाते.

विशिष्ट सेवेसाठी राष्ट्रपती पोलीस पदकांमध्ये राज्याचे अतिरिक्त पोलिस महासंचालक, चिरंजीवी प्रसाद, संचालक राजेंद्र डहाळे, सतीश गोवेकर, सहाय्यक पोलीस आयुक्त यांचा समावेश आहे.

त्याशिपाय ठाण्यातील परायुक्त दत्ता शिंदे एसीबी मुंबईचे संदीप दिवाण व दहिसर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक अशोक होनमाने आदींचा समावेश आहे. पदक विजेत्यांची नावे अशी: पोलीस शौर्य पदकांमध्ये डॉ. कुणाल सोनावणे - उप-विभागीय पोलीस अधिकारी, दीपक आवटे - पोलीस उपनिरीक्षक, . धनाजी होनमाने - पोलीस उपनिरीक्षक (मरणोत्तर), नागेशकुमार म दरबोईना - नाईक शिपाई, शकील युसुफ शेख - विश्वनाथ पेंदाम - पोलीस शिपाई, विवेक नरोटे - पोलीस शिपाई, मोरेश्वर नामदेव पोटावी - पोलीस शिपाई, कैलाश चुंगा कुलमेथे - शिपाई, कोटला बोटू कोरामी - शिपाई, कोरके वेलादी - शिपाई, महादेव विष्णू वानखेडे - पोलीस शिपाई, अनुज मिलिंद तारे (आयपीएस) -अतिरिक्त पोलीस अधीक्षक, राहुल देव्हाडे - , विजय सकपाळ - उपनिरीक्षक, महेश बोरू मिच्छा - मुख्य शिपाई, समय्या लिंगय्या आसाम - नाईक यांचा समावेश आहे.

**गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पदक' विजेते:** अप्पर आयुक्त ठाणे - दत्तात्रय शिंदे- एसीबीचे उपमहानिरीक्षक, संदीप दिवाण- उपमहानिरीक्षक, शिवाजी ज्ञानदेव फडतरे- उप-अधीक्षक, संजय खांदे-अधीक्षक, विनीत जयंत चौधरी-उपअधीक्षक, प्रकाश गायकवाड-उपनिरीक्षक, सदानंद राणे- निरीक्षक, विजय हातिसकर-पोलीस सहआयुक्त, महेश तराडे-उप अधीक्षक, राजेश रमेश भागवत- निरीक्षक, गजानन कृष्णराव तांदूळकर-उपनिरीक्षक, राजेंद्र तुकाराम पाटील- उपनिरीक्षक, संजय साहो राणे-उपनिरीक्षक, गोविंद शेवाळे-उपनिरीक्षक, मधुकर नैताम- उपनिरीक्षक, अशोक होनमाने- निरीक्षक, शशिकांत शंकर तटकरे-उपनिरीक्षक, अक्षयवारनाथ श्र शुक्ला-उपनिरीक्षक,शिवाजी जुंदरे-उपनिरीक्षक, सुनील लयाप्पा हांडे- सहाय्यक उपनिरीक्षक, प्रकाश श्र देशमुख-उपनिरीक्षक, दत्तू रामनाथ खुळे- सहाय्यक उपनिरीक्षक, रामदास नागेश पालशेतकर- निरीक्षक (पीए).

# काँग्रेसचे दोन फुटीर आमदार धनुष्यबाण हाती घेणार?

### मुख्यमंत्र्यांशी घेतली भेट

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि. १४ ऑगस्ट-**

विधान परिषदेच्या निवडणुकीत क्रॉस वोटिंग केल्याचा संशय असलेल्या काँग्रेसच्या आम दारांपैकी दोघाजणांनी बुधवारी वर्षा या शासकीय निवासस्थानी जाऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन चर्चा केली. ते लवकरच शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश करून विधानसभा लढविण्याची शक्यता वर्तवली जात आहे.


नांदेड जिल्ह्यातील देगलूर विधानसभा म तदारसंघाचे आमदार जितेश अंतापूरकर व नाशिक जिल्ह्यातील इगतपुरीचे हिरामण खोसकर यांनी सकाळी वर्षा निवासस्थानी जाऊन शिंदे यांच्याशी सविस्तर चर्चा केली. विधानसभा निवडणुकीत त्यांना काँग्रेसकडून पुन्हा तिकीट मिळण्याची शक्यता नाही. त्यामुळे ते पक्ष सोडण्याच्या तयारीत असल्याचे सूत्रांकडून समजते. मुख्यमंत्र्यांच्या भेटीबाबत त्यांनी काहीही भाष्य करण्यास नकार दिला.

गेल्या महिन्यात झालेल्या विधान परिषदेच्या निवडणुकीत काँग्रेसच्या ५ आमदारांनी क्रॉस वोटींग केली. त्यामुळे महाविकास आघाडीचे उमेदवार शेकापचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांचा पराभव झाला. फुटीर आमदारांम ध्ये वांद्रेतील आमदार झिशान सिद्धीकी यांच्यासह अंतापुरकर व खोसकर यांचा समावेश असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे . प्रदेश काँग्रेसने गद्दार आम दारांबाबतचा अहवाल पक्षश्रेष्ठींना पाठविला होता. मात्र तांत्रिक कारणास्तव त्यांच्यावर शिस्तभंगाची कोणतीही कारवाई केलेली नाही. मात्र त्यांना पुन्हा उमेदवारी न देण्याची निर्देश हायकमांडने दिले आहेत त्यांना पक्षाच्या महत्त्वाचे कार्यक्रम, बैठकातून डावलण्यात येत आहे. त्यामुळे या आमदारांची चलबिचल सुरू आहे. विधानसभेच्या तोंडावर या दोघांवर कारवाईची शक्यता आहे. त्यामुळे पक्षाने कारवाई करण्यापूर्वी स्वत: पक्ष सोडण्याचा प्रयत्नात आहेत. विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहिता लागू होण्यापूर्वी ते महायुतीतील सोयीच्या ठरणाऱ्या पक्षात लवकरच प्रवेश करतील अशी शक्यता वर्तवली जाते. त्यामुळेच या दोघांनी मुख्यमंत्री आज शिंदे यांची भेट घेऊन चर्चा केली असल्याचे सांगितले जात आहे.

जितेश अंतापूरकर हे नांदेड जिल्ह्यातील देगलूर विधानसभा मतदार संघात पोटनिवडणुकीत विजयी झाले आहेत. त्यांचे वडील रावसाहेब अंतापूरकर यांच्या निधनानंतर पक्षाने त्यांना तिकीट दिले होते. त्यावेळी त्यांनी भाजप उमेदवार सुभाष साबणे यांचा मोठ्या फरकाने पराभव केला होता. अंतापूरकर हे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांचे समर्थक समजले जातात.

CMYK
सोलापूर
प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
https://dainiktarunbharat.com / https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर गुरुवार, १५ ऑगस्ट २०२४ । युगाब्द ५१२५ । वर्ष ३९ वे अंक २८६ ।






## अग्रलेख...

# स्वातंत्र्य दिन चिरायु होवो

१५ ऑगस्ट २०२४ भारताचा स्वातंत्र्य दिन. या दिवशी आपल्याला इंग्रजांच्या दुष्चक्रातून स्वातंत्र्य मिळाले. आपल्यासोबत पाकिस्तानही स्वतंत्र झाला. यंदाचा हा भारताचा ७८ वा स्वातंत्र्य दिन. एखाद्या स्वतंत्र देशाचा विचार करता ७०-८० वर्षे म्हणजे फारशी होत नाहीत. पण आपण या कालावधीत केलेली प्रगती एका स्वतंत्र राष्ट्राच्या इतिहासाच्या दृष्टीने पुरेशी म्हणायला हरकत नाही. भारतावर अनेक दशके ईस्ट इंडिया कंपनी आणि ब्रिटिशांचे राज्य होते. ब्रिटिश काळात भारतीयांवर झालेले अत्याचार आपल्यातील जुन्या जाणत्यांनी अनुभवले आहेत. त्यावेळी भारताला 'सोने की चिडीया' म्हटले जाई. काँग्रेसच्या नेतृत्वात स्वातंत्र्याची चळवळ उभी झाली आणि विकसित होत गेली. या चळवळीच्या जोडीला क्रांतिकारकांच्या फौजादेखील उभ्या झाल्या. अनेक स्वयंसेवी राष्ट्रवादी संघटनाही स्वातंत्र्यासाठी सज्ज झाल्या. काँग्रेस कार्यकर्त्यांनी ज्याप्रमाणे इंग्रजी पोलिसांच्या लाठ्या-काठ्या खाल्ल्या, त्याचप्रमाणे क्रांतिकारकांनीही या देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान दिले. काँग्रेस कार्यकर्त्यांनी आंदोलने केली आणि प्रसंगी कारागृहाचा मार्गही पत्करला. अहिंसेच्या मार्गाने निघालेल्या कार्यकर्त्यांना हौतात्म्य पत्करावे लागले. पण अहिंसेचा मार्ग अमान्य असलेल्या क्रांतिकारकांनी गुप्तपणे शस्त्रे चालविण्याचे प्रशिक्षण घेतले आणि इंग्रज अधिकाऱ्यांच्या हत्या घडवून सर्वत्र देशप्रेमाची भावना वृद्धिंगत केली. काँग्रेसची चळवळ आणि क्रांतिकारकांच्या गनिमीकाव्यामुळे अखेर इंग्रजांना भारत सोडून जावे लागले. देश स्वतंत्र झाला आणि एक नवी पहाट बघण्याचा योग भारतीयांना आला. त्याच स्वातंत्र्य दिनाला आज ७८ वर्षे पूर्ण झाली आहेत. स्वातंत्र्याचा पहिला ध्वज पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी फडकवला आणि या देशाला अंधकाराच्या गर्तेतून बाहेर काढण्याचा निर्धार केला. आज आपण ७८ वा स्वातंत्र्य दिन साजरा करण्यासाठी सज्ज झालो आहोत; ज्याचा प्रारंभ देशाची राजधानी दिल्लीतील ऐतिहासिक लाल किल्ल्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकवण्यापासून होणार आहे. यानंतर त्यांचे बहुप्रतीक्षित सलग ११ वे स्वातंत्र्य दिनाचे भाषण होईल. या वर्षासाठी भारताच्या स्वातंत्र्य दिनाची थीम 'विकसित भारत' अशी आहे. ही थीम २०४७ पर्यंत देशाला विकसित राष्ट्रात रूपांतरित करण्याची सरकारची वचनबद्धता प्रतिबिंबित करणारी आहे.

देशाच्या संसदेत सध्या रणकंदन चाललेले दिसायला मिळत आहे. सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांवर कुरघोड्या करताना दिसत आहेत. वक्फ बोर्ड पुनर्रचना कायदा, आरक्षणातील क्रिमीलेअर, समान नागरी संहिता, विभिन्न राज्यांना निधीचे वाटप, अग्निवीर योजना, बांगलादेशातील अस्थिरता, पाकिस्तानमधील अनागोंदी आणि श्रीलंकेची रसातळाला जात असलेली अर्थव्यवस्था आदी मुद्यांवर सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात मनभिन्नता दिसत आहे. भारतीय निवडणुकांमध्ये जॉर्ज सोरोस यांचा वाढता रस, अर्बन नक्षल, विभाजनकारी डावे आणि अनिर्बंध स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते असलेले लिबरल्स सरकारवर कुरघोडी करण्याचा मोका सोडायला तयार नाहीत. स्वयंसेवी संस्थांच्या नावेही अनेकांचा गोंधळ माजवण्याचा प्रयत्न सुरू आहे. सुदृढ लोकशाहीसाठी मतभेद आवश्यकच आहेत. पण या साऱ्या मतभेदांच्या वर उठून तिरंग्याच्या नावाखाली उभय पक्षांचे लोकप्रतिनिधी एकत्र येऊ शकतात. या तिरंग्याच्या उत्सवानिमित्त सरकारने 'हर घर तिरंगा' अभियान हाती घेतले आहे. त्यात आपण साऱ्यांना मतभेद विसरून सामील व्हायला हवे. भारतमातेचा जयजयकार करायला हवा आणि 'वंदे मातरम्'च्या घोषणाही द्यायला हव्यात. देशाच्या झेंड्याबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी पुढे येण्यापासून कोणीच कोणाला रोखू शकत नाही. कारण हा ध्वज स्वातंत्र्याचा आहे... तो पारतंत्र्याची श्रृंखला मोडणारा आहे... देशाला प्रगतीच्या मार्गावर नेणारा आहे. याच दिवशी देशवासीयांना संविधानाचे रक्षण करण्याची सामूहिक शपथ घ्यायची आहे. हा दिवस एकमेकांमधील वाद मिटवून शुभेच्छा देण्याचा आहे. परस्परविरोधी पक्षांच्या सदस्यांनी सहमतीने निर्णय घेऊन तोडगा काढण्याचा संकल्प करणारा हा दिवस आहे. स्वातंत्र्यानंतरची राज्यकर्त्यांची पहिली १० वर्षे एकूणच लोकशाहीची व्यवस्था काय, हे समजून घेण्यात गेली. त्यानंतरच्या १० वर्षांत देशावर युद्धे लादली गेली. त्यातून आपण सहीसलामत बाहेर पडलो, पण त्यात झालेले अपरिमित नुकसान भरून काढण्यास बराच कालावधी लागला. त्यानंतरच्या दशकात भारताला आणिबाणीचा सामना करावा लागला. ही १० वर्षे लोकतंत्र वाचवण्याच्या कामात गेली. चौथ्या दशकात भारत प्रगतीबाबत काही ठोस बोलू शकला. त्या काळात विकासाच्या बऱ्याच योजना आल्या आणि देशात चहलपहल दिसून आली. त्यानंतरचा काळ गॅट कराराबाबतच्या कोलाहलात तसेच खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या समस्यांवर तोडगा काढण्यात गेला. त्यानंतरच्या काळात बरीच स्थित्यंतरे येऊन गेली. याच काळात अल्पावधीच्या सरकारांचीही चव भारतीयांनी चाखली. वाजपेयींच्या काळात पहिले गैरकाँग्रेस सरकार स्थापन झाले. त्यानंतरच्या १० वर्षांत मनमोहनसिंग यांचे धोरणलकव्याचे सरकार आपण पाहिले. पण मोदींच्या काळात भारताने खऱ्या अर्थाने प्रगती अनुभवली. गेल्या १० वर्षांतील भारताची प्रगती उल्लेखनीय आहे. पंतप्रधान मोदी निवडून आले, तेव्हा भारत ही जगातील दहावी अर्थव्यवस्था होती, त्यानंतर ती पाचवी अर्थव्यवस्था बनली आणि लवकरच जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने वाटचाल सुरू झालेली आहे. जागतिक महामारी अनुभवण्याचा काळही हाच होता. त्यावेळी भारताने ही परिस्थिती अतिशय कुशलतेने हाताळून हा देश कुठल्याही परिस्थितीत आपली काळजी घेण्यास समर्थ असल्याचे जगाला दाखवून दिले. त्याप्रसंगी आपण सुमारे शंभरावर देशांना लसी आणि कोरोनाशी लढणारी औषधे पुरवून आपल्या मानवतावादी स्वभावाचा जगाला परिचय करून दिला. स्वातंत्र्याचा खरा अर्थ आपल्याला १९४७ मध्ये कळला, पण स्वातंत्र्याची ताकद काय असू शकते, याची प्रचीती २०२४ नंतरच आली. पाकिस्तानवर केलेला सर्जिकल स्ट्राईक हा आपली ताकद आजमावणारा होता. चीनला दिलेली टक्कर 'हम किसी से कम नही' हे दाखवून देणारी होती. आपल्या देशातील तरुणाईची ताकद ओळखून त्यांच्यासाठी नवनवे उपक्रम राबविण्याचाही काळ २०२४ नंतरचाच होता. भारताने आता नवतंत्रज्ञान स्वीकारले आहे. आपण वित्तीय प्रणाली, बँकिंग प्रणालीचे डिजिटलायझेशन पाहत आहोत. ते डिजिटलायझेशन, ती प्रगती, ते तंत्रज्ञान लहान शहरे, खेड्यांपर्यंत पोहोचले आहे. त्यामुळे भारतात क्रांती होत आहे. भारताने राबविलेल्या अनेक योजना आज विदेशातील लोकांसाठी आदर्श ठरत आहेत. त्यासाठी त्यांची भारताकडे विचारणा होत आहे. निवडणूक आयोगाचे काम जगातील लोकशाहीवादी देशांसाठी एक उत्कृष्ट उदाहरण म्हणून पुढे आले आहे. निवडणुकीत ईव्हीएमचा सुरू केलेला वापर केवळ नवतंत्रज्ञान स्वीकारणारा प्रयोग नसून त्याद्वारे निवडणुकीतील गैरप्रकारांना बराच आळा बसला आहे. गेल्या १० वर्षांतील मोदींची लाल किल्ल्यावरची भाषणे देशाला दिशा देणारी ठरली आहेत. मोदींनी विविध देशांशी संपर्क स्थापित करून, भारतीयांच्या मुत्सद्देगिरीची कामगिरी जगापुढे मांडली आहे. हे सरकार त्यांनी केलेल्या कामाचे ऑडिट करणारेही आहे. आपातकालीन परिस्थितीत गरजूंच्या मदतीला धावून जाण्याचा एक विक्रमच या सरकारने प्रस्थापित केला आहे. जनधन योजनेतून लक्षावधी नागरिकांना बँकिंग प्रणालीशी जोडण्याची अद्वितीय कामगिरी या सरकारने केली आहे. अग्निवीर योजनेतून देशातील तरुणांना राष्ट्रपतींच्या जबाबदारीची जाणीव करून देणारे तसेच युवकांच्या रोजगारासाठी झटणारे म्हणूनही या सरकारची ओळख आहे. ७८ वा स्वातंत्र्य दिन साजरा करीत असतानाच विरोधक आणि सत्ताधाऱ्यांनी सहमतीने काम करण्याचा संकल्प केल्यास प्रगतीमधील उरल्यासुरल्या बाधाही दूर होतील, असा विश्वास व्यक्त होत आहे. स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने 'विजयी विश्व तिरंगा प्यारा, झेंडा उंचा रहे हमारा' या गौरव गीतानुसार व्यवहार करण्याची शपथ घेऊ या!

## इतस्तत:

# बांगला देश...

**डॉ. विवेक राजे**

मार्टिन लुथर किंगचे एक प्रसिद्ध वाक्य आहे, 'जी संस्कृती किंवा राष्ट्र मनाने घाबरट/मृदू स्वभावाची माणसे जन्माला घालते ती संस्कृती/राष्ट्र स्वत:चा सांस्कृतिक मृत्यू हप्त्यांवर विकत घेत असते...' कदाचित किंग यांना घाबरट वा मृदू स्वभावाचीच माणसं भेटली असतील. कारण निडर किंवा कणखर माणसे आणि घाबरट किंवा मृदू स्वभावाची माणसे असे पाश्चात्त्य विचारपद्धतीप्रमाणे दोन परस्परविरोधी टोकं सांगून मार्टिन लुथर किंग मोकळा झाला. त्याला कणखर असूनही माणसं जिवंतपणी डोळ्यांवर कातडं ओढून घेऊ शकतात किंवा आपल्या पूर्वजांनी दिलेल्या वारसा, आपल्या अवतीभोवती वर्तमानात घडत असलेल्या घटना आणि भविष्यात येऊ घातलेल्या आपल्या पिढ्यांचे सन्मानित अस्तित्व या तीनही बाबतीत, टोकाची बेपर्वा वा उदासीन असू शकतात, ही तिसरी शक्यता लक्षात आली नसावी. कारण, तो भारतात कधी आलाच नव्हता. माणसं बेपर्वा किंवा उदासीन असतात याचा अर्थ ते कणखर नसतात किंवा कणखर लढवय्ये होऊच शकत नाहीत असा नाही. उलट कणखर लढवय्येपणाचा वारसा आणि तत्त्वज्ञान त्यांनाही मिळालेले असते. त्यांना ते तत्त्वज्ञान माहिती असते; पण ते कृतीत आणण्याची त्या माणसांची इच्छा नसते. कारण डोळ्यांवर ओढलेल्या कातड्यामुळे त्याची कृती करण्याची इच्छाशक्ती संपुष्टात आलेली असते, हेच खरे. हे सगळं मांडण्याचे कारण आमचा शेजारी बांगलादेशमध्ये मागील काही दिवसांपासून घडत असलेल्या घडामोडी होत. काही विद्यार्थी कुठल्यातरी मुद्यावरून आंदोलन करतात आणि ते वाढत जाऊन शेवटी त्या देशातील संपूर्ण राजकीय व्यवस्था उलथून पाडली जाते. या प्रकारचे एक आंदोलन सुमारे ३०-३५ वर्षांपूर्वी चीनमध्ये घडले. पण चीनच्या साम्यवादी सरकारने निष्ठूरपणे नि:शस्त्र विद्यार्थी आंदोलकांवर रणगाडे घालून हे आंदोलन चिरडून टाकले. पण मध्य पूर्वेत आणि इतरत्र झालेल्या आंदोलनांनी मात्र व्यवस्था उलथून टाकण्याची कामगिरी चोख बजावली. परिणामतः याचे एक स्टॅण्डर्ड टूल किट, कार्य पद्धती अस्तित्वात आली. आता जगातील विभिन्न शक्ती आपले ईप्सित साध्य करण्यासाठी या कार्य पद्धतीचा प्रछन्न वापर करू लागल्या. बांगलादेशात हे टूल किट वापरत जगातील काही परस्पर विरोधी हितसंबंध असलेल्या शक्तींनी उलथापालथ घडवून आणत तेथील लोकशाही व्यवस्था उलथून टाकली. निर्माण केलेल्या/झालेल्या परिस्थितीचा फायदा घेऊन मग तेथील बहुसंख्य असलेल्या मुस्लिम समाजाने आपली मूळ हिंसक वृत्ती दाखवत तेथील अल्पसंख्यक हिंदूंवर अत्याचार करण्याची आपली तहान भागवून घेतली. अशा प्रत्येक प्रसंगी मृदू, घाबरट आणि डोळ्यांवर अहिंसेच्या नेभळ्या तत्त्वज्ञानाचे कातडे ओढून घेतलेल्या, असंघटित, गाफील, मूर्ख हिंदू समाज नेहमीच मार खातो, हा इतिहास आहे.

आंदोलनाला असामाजिक तत्त्वांनी हातात घेतल्यानंतर पोलिस दल हतबल झाले होते. बांगलादेशी सैन्याने जेव्हा निवडून आलेल्या शासनाची साथ देण्यास नकार दिला. पोलिस आधीच हतबल झालेले होते. कायदा सुव्यवस्था पार कोलमडून पडली होती. हीच संधी तेथील इस्लामिक गुंडांनी साधली. देशाचा मानबिंदू असलेले पंतप्रधान निवासस्थान लुटले गेले. अशा लुटीतून मिळालेल्या वस्तूंना इस्लाममध्ये 'माल-ए-गनीमत' म्हणतात. आणि इस्लाममध्ये माल-ए-गनीमत मिळवणारा माणूस चोर-लुटारू नव्हे तर भाग्यवान मानला जातो. पंतप्रधान निवासात मिळालेली स्त्रियांची अंतर्वस्त्रे झेंड्यासारखी हवेत लहरवणाऱ्या नीच आणि उन्मादी समाजाचे पंतप्रधान निवासस्थान लुटल्यानंतर पुढचे सावज अर्थातच डरपोक, असंघटित आणि शासनावर आपल्या सुरक्षेसाठी अवलंबून असणारा, संख्येने कमी आणि बेसावध असलेला हिंदू समाजच होणार होते. पण भारतातील बहुसंख्य असलेला हिंदू समाज यापासून योग्य तो धडा घेताना दिसत नाही. बांगलादेशी हिंदूंनी तर याचा विचारही केला नसेल. कदाचित आपण आणखी एका नागरी युद्धाची नांदी या देशात ऐकतो आहोत, हेच आजच्या भारतातील हिंदू समाजाला मान्य नाही. बांगलादेशमध्ये अराजक निर्माण करून, लोकशाही मार्गाने निवडून आलेले सरकार उलथून टाकण्याच्या या प्रक्रियेत जवळजवळ एक महिना सामान्य जनता भरडली जाताना दिसते. अराजकाच्या परिस्थितीत ज्या समाजाच्या हातात शस्त्र असते आणि ते चालवण्याची तयारी आणि हिंमत असते तो बाजी मारून जात असतो. हिंदू समाजाने अहिंसेचे अतिरेकी तत्त्वज्ञान झुगारून देत, व्यूहरचना करीत जर शस्त्र चालवले असते तर या देशाची फाळणी झालीच नसती. बांगलादेश आज जगभरातील हिंदूंना हेच सांगतो आहे. बांगलादेशमधील हिंदू समाज आता एकत्र येऊन आपल्या विरोधातील हिंसाचाराच्या विरोधात रस्त्यावर उतरून निदर्शने करताना दिसतो आहे. हिंदू समाज चितगाव तसेच भारतीय सीमेजवळील प्रदेशात एकत्र येतो आहे. हिंदू समाज केवळ स्वसंरक्षणाच्या उद्देशाने एकत्र आला तर सद्यस्थितीत त्याला सुरक्षितता मिळेल, हे नक्की. मात्र, त्यातून भविष्य सुरक्षित होणार नाही. भविष्यातील सुरक्षिततेसाठी वेगळी उपाययोजना करावी लागते. ती करण्यासाठी संघटित आक्रमकता धारण करावी लागेल. आज रस्त्यावर उतरून निदर्शने केल्यामुळे तेथील हिंदू समाजाला हिंसेचे लक्ष्य केले जाते आहे, याकडे जगाचे लक्ष वेधले गेले आहे. पण फक्त जगाचे लक्ष वेधून घेऊन काहीही उपयोग नसतो. कारण इस्लामिक हिंसाचाराला वोक विचारसरणी नेहमीच तात्त्विक मुलामा चढवते हा गेल्या अनेक वर्षांतील अनुभव आहे. तसेच इस्लामच्या व वोकीझमच्या दबावाखाली अनेक देश आणि विचारवंत गप्प बसणे श्रेयस्कर मानताना दिसतात, हेही सत्यच आहे. त्यामुळे जगातील सर्व हिंदूंनी एकत्र येऊन, जागतिक पातळीवर निदर्शनाद्वारे आपण सगळे हिंदू म्हणून संघटित झालो आहोत, याची जाणीव जगाला तसेच इस्लामला करून देणे ही पहिली पायरी होय. पुढील पायरी आता जिथे हिंदू जनसंख्या एकूण लोकसंख्येच्या १० टक्के आहे, त्या प्रदेशात हिंदू समाजाने नियोजनपूर्वक स्थलांतर करणे हे होय. त्याचवेळी स्वत:च्या संरक्षणाची जबाबदारी घेत त्याची तजवीज केली पाहिजे. अनेक हिंदूंनी मिळेल ते साहित्य शस्त्र म्हणून जवळ बाळगणे सुरू केले पाहिजे. वेळप्रसंगी तिखटाची पूडदेखील स्वसंरक्षणासाठी परिणामकारक शस्त्र ठरू शकते, हे सगळ्यांनीच लक्षात घेतले पाहिजे. तिसरी पायरी म्हणजे जगातील सगळ्या हिंदू वस्त्यांची सुरक्षिततेच्या दृष्टीने बांधणी करणे होय. यात हिंदू वस्तीवर होऊ शकणाऱ्या बाह्य आक्रमणाला प्रतिबंध करणे हे अभिप्रेत आहे तसेच या वस्त्यांच्या आत कोणत्याही परिस्थितीत मुसलमानांना व्यवसायासाठी, रहिवासासाठी जागा मिळणार नाही, याला सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे. कारण हिंदू विरोधी हिंसा ही नेहमी आतून आणि बाहेरून एकाच वेळी सुरू केली जात असते. शासकीय सुरक्षा व्यवस्था किंवा पोलिस हे सगळे नुकसान घडल्यावर जागे होतात, हा जगभरातील अनुभव आहे. हिंदू तरुणांनी जगभरात एकत्र येऊन कोणत्याही आव्हानाचा प्रतिकार करण्याच्या क्षमतेचे संवर्धन करणे, ही काळाची मागणी आहे. बलोपासना आणि शस्त्र सज्जता याद्वारेच फक्त राजकीय, धार्मिक, जातीय हिंसाचारावर विजय मिळविता येतो, हे दिवसेंदिवस फक्त करीअर, पैसा आणि सुखासीनतेच्या मागे लागून डोळ्यांवर स्वार्थाचे कातडे ओढून घेऊन नेभळट/घाबरट/मृदू झालेल्या हिंदू समाजाने लक्षात घेतले पाहिजे. शेवटी मार्टिन लुथर किंगचे वरील वाक्य आणि बांगलादेशमधील घटना हेच तर सांगत आहेत.

९८८१२४२२२४

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# नगराध्यक्षांना लॉटरी!

राजकारणात कधी काहीही होऊ शकते. कधी कुणाचे स्वप्न भंगते तर कधी कुणाला लॉटरी लागते. अशीच लॉटरी राज्यातील १०६ नगराध्यक्षांना लागली आहे. राज्यातील नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका २०२१-२२ मध्ये झाल्या. त्यावेळी निवडल्या गेलेल्या नगराध्यक्षांचा अडीच वर्षांचा कालावधी संपुष्टात येऊन अडीच वर्षांसाठी पुन्हा नव्याने नगराध्यक्ष निवडले जाणार होते. यासाठी अनेकजण बाशिंग बांधून तयार होते. मात्र, राज्य मंत्रिमंडळाच्या काल झालेल्या बैठकीत एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. नगरपंचायत नगराध्यक्षांचा कालावधी आता अडीच ऐवजी पाच वर्षांचा केल्याने राज्यातील १०६ नगराध्यक्षांचे नशीब फळफळले असून त्यांना जणू यानिमित्ताने लॉटरीच लागली आहे. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मध्ये सुधारणा करण्यात येणार असून अडीच वर्षांचा कालावधी पाच वर्षांचा करून हा निर्णय पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात येणार आहे. या निर्णयाने राज्यभरातील १०६ नगराध्यक्षांना मुदतवाढ मिळणार असून त्यांचा कालावधी पाच वर्षांचा झाल्याने राजकीय वर्तुळात उत्साहवर्धक वातावरण बघायला मिळत आहे. अडीच वर्षांत एखाद्या पदाधिकाऱ्याला विकास कामे करताना अनेक अडचणी येतात. याशिवाय विकासाची कामे करण्याकरिता अडीच वर्षांचा कालावधी हा कमी पडत असल्याने अनेकदा कार्यतत्पर नगराध्यक्षांना विकास कामे अर्ध्यावरच सोडावे लागत होते. पर्यायाने शहराच्या विकास कामांना खीळ बसत होती. कुठल्याही



नगरपरिषद किंवा नगरपंचायतीच्या विकास कामांचा पाठीचा कणा म्हणून नगराध्यक्षांकडे बघितले जाते. मात्र, अडीच वर्षांतच नगरपंचायतीचा कारभार दुसऱ्या नगराध्यक्षाच्या हाती सोपविला गेल्यास विकास कामे रखडली जातात आणि त्याचा फटका शहरवासीयांना भोगावा लागतो. या निर्णयामुळे आता जुनेच नगराध्यक्ष परत अडीच वर्षांसाठी सत्तेत राहिल्यास विकास कामांना नक्कीच गती मिळू शकेल. नगराध्यक्षांचा कालावधी अडीच वर्षांचा केल्याने दुसऱ्या अडीच वर्षांसाठी अनेक जण उत्सुक होते. आपली अध्यक्षपदी वर्णी लागावी म्हणून अनेक नगरसेवक प्रयत्नरत होते. मात्र, राज्य सरकारच्या नगराध्यक्षांच्या मुदतवाढ निर्णयाने त्यांच्या स्वप्नांवर पाणी फेरले गेले आहे. एखाद्या स्वायत्त संस्थेचा प्रमुख या नात्याने सूत्रे स्वीकारल्यानंतर त्या संस्थेच्या कामाचा व इतर निर्णयाचा अभ्यास करण्यातच एक ते दीड वर्ष निघून जातात. त्यांना काही शिकता येण्याआधीच त्यांच्या पदाचा कार्यकाळ संपलेला असतो आणि त्यामुळेच अशा स्वायत्त संस्थांमधील प्रशासकीय अधिकारी पदाधिकाऱ्यांवर वरचढ होतात. अनेकदा नवीन पदाधिकाऱ्यांना अंधारात ठेवून प्रशासकीय अधिकारी आपली पोळी शेकून घेतात. त्यामुळे एखाद्या स्वायत्त संस्थेला समजून घेण्यासाठी, त्या संस्थेतील कामाचा प्रकार, जबाबदारी, शहराच्या विकासासाठी ठरणारे महत्त्वाचे निर्णय घेण्याकरिता किमान ५ वर्षांचा कालावधी असणे गरजेचे आहे, असे मत अनेक नगराध्यक्षांनी व्यक्त केले आहे. पूर्वी अशा स्वायत्त संस्थांमधील प्रमुख पदाधिकाऱ्यांचा कालावधी हा ५ वर्षांचा असायचा. नंतरच्या काळात यात बदल करून अडीच वर्षांचा करण्यात आला. या अडीच वर्षांत अनेकांना काम करताना अडचणी येत होत्या. त्यांना त्यांचे काम समजून घेण्यातच अडीच वर्षांची मुदत संपून जात होती. त्यामुळे राज्य मंत्रिमंडळाने घेतलेला हा निर्णय अतिशय महत्त्वपूर्ण असून नगराध्यक्षांना किमान ५ वर्षांचा कालावधी मिळणे आवश्यक आहे. या निर्णयामुळे नगराध्यक्ष निवडीच्या घोडाबाजाराला आळा बसला आहे. अडीच वर्षांनंतर आपल्या हाती सत्तेची सूत्र यावीत म्हणून अनेकदा पैशाचा वापर केला जातो. नगरसेवकांना आमिष दाखविले जाते आणि चुकीचे लोक सत्ता आपल्या हाती घेण्याचा प्रयत्न करतात. मात्र आता जे नगराध्यक्ष सध्या कार्यरत आहेत तेच आता पुढील अडीच वर्षांसाठी कार्यरत राहणार असल्याने राज्यभरातील अनेक शहरातील विकास कामांना गती मिळेल, अशी अपेक्षा नक्कीच करता येऊ शकते.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# निवडणूक जम्मू-काश्मीर विधानसभेची...

जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीची घोषणा रक्षाबंधनानंतर कोणत्याही दिवशी होऊ शकते. सर्वोच्च न्यायालयाने जम्मू-काश्मिरात ३० सप्टेंबरच्या आधी विधानसभा निवडणूक घेण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे निवडणूक आयोग कामाला लागला आहे. राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेच्या मुद्यावरून निवडणूक आयोगाची नुकतीच केंद्रीय गृहसचिवांसोबत बैठक झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी २० जूनला राज्याच्या दौऱ्यावर आले असताना त्यांनी राज्यात लवकरच निवडणुका होतील, असे आश्वासन दिले होते. त्यानंतर निवडणूक आयोगाने राज्याचा दौरा करून तेथील परिस्थितीची पाहणी केली होती. परिसीमनानंतर राज्यात विधानसभा निवडणुका घेतल्या जातील, त्यानंतर योग्यवेळी या भागाला राज्याचा दर्जा दिला जाईल, असे गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेत म्हटले होते. त्यामुळे आता जम्मू-काश्मिरातील विधानसभा निवडणुकीची घोषणा आयोग कधी करणार, याकडे राज्यातीलच नाही तर देशातील जनतेचेही लक्ष लागले आहे. कारण जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे घटनेतील ३५ ए आणि ३७० वे कलम रद्द झाल्यानंतर राज्यात प्रथमच विधानसभा निवडणूक होणार आहे. आतापर्यंत काश्मीर खोऱ्यात होणाऱ्या हिंसाचाराच्या घटना आता जम्मू भागात होत आहेत. राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने निवडणूक आयोगासमोर हे मोठे आव्हान आहे. ३७० कलम रद्द करताना केंद्र सरकारने जम्मू-काश्मीरचे दोन केंद्रशासित भाग केले होते. जम्मू-काश्मीर मिळून एक केंद्रशासित प्रदेश तर लडाखचा दुसरा केंद्रशासित प्रदेश. जम्मू-काश्मीर विधानसभेत ९० सदस्य असून यातील ७४ जागा खुल्या श्रेणीतील तसेच ९ जागा अनुसूचित जमातीच्या तर ७ जागा अनुसूचित जातीच्या आहेत. राज्यात ८७.०९ लाख मतदार आहेत. म्हणजे प्रत्येक विधानसभा मतदारसंघात सरासरी १ लाखापेक्षाही कमी मतदार आहेत.

अमरनाथ यात्रा संपल्यानंतर म्हणजे रक्षाबंधनानंतर राज्यातील विधानसभा निवडणुकीची घोषणा होईल, असा अंदाज आहे. २०१४ मध्ये राज्यात विधानसभा निवडणूक झाली होती, तेव्हापासून म्हणजे १० वर्षांत राज्यात विधानसभा निवडणूक झाली नाही. विधानसभेच्या ९० जागांसाठी चार ते पाच टप्प्यात निवडणूक होईल, असे मानले जात आहे. कारण २०१४ मध्येही पाच टप्प्यात विधानसभा निवडणूक झाली होती. लडाखसह राज्यातील सहा लोकसभा मतदारसंघातील निवडणूक शांततेत पार पडली होती. विशेष म्हणजे आतापर्यंतच्या लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत यावेळी मतदानाची टक्केवारीही चांगली होती. २०१४ मध्ये जम्मू-काश्मीर विधानसभेत व्याप्त काश्मिरातील २४ जागा पकडून १११ जागा होत्या. यातील व्याप्त काश्मीरच्या २४ जागा वगळून उर्वरित ८७ मतदारसंघांत निवडणूक झाली होती. यावेळी विधानसभा मतदारसंघाच्या परिसीमनानंतर राज्यात ३ जागा वाढल्या आहेत. जम्मू भागात विधानसभेच्या सहा तर काश्मीर भागात विधानसभेची एक जागा वाढली आहे. यामुळे आता काश्मीर भागात विधानसभेच्या ४७ तर जम्मू भागात विधानसभेच्या ४३ जागा झाल्या आहेत. आधी जम्मू भागात विधानसभेच्या ३७ तर काश्मीर खोऱ्यात ४६ जागा होत्या. लडाखमध्ये विधानसभेच्या फक्त चार जागा होत्या. व्याप्त काश्मीरवरील आपला दावा कायम ठेवण्यासाठी तेथील विधानसभेच्या २४ जागा जम्मू-काश्मीरच्या विधानसभेत, तेथे निवडणूक होत नसली तरी गृहीत धरल्या जातात. परिसीमनानंतर जम्मू भागातील ४४ टक्के लोकसंख्या विधानसभेच्या ४८ टक्के जागांवर तर काश्मीर खोऱ्यातील ५६ टक्के लोकसंख्या विधानसभेच्या ५२ जागांवर मतदान करणार आहे. २०१४ मध्ये राज्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत पीडीपीला २८ तर त्याखालोखाल भाजपाला २५ जागा मिळाल्या होत्या. नॅशनल कॉन्फरन्सने १५ तर काँग्रेसने १२ जागा जिंकल्या होत्या. अपक्ष आणि अन्य छोट्या पक्षांनी ७ जागा जिंकल्या होत्या. विशेष म्हणजे भाजपाची मतांची टक्केवारी सर्वात जास्त होती. पीडीपीच्या मदतीने भाजपाने राज्यात सरकार स्थापन केले होते, पीडीपीच्या मेहबुबा मुफ्ती मुख्यमंत्री तर भाजपाचे डॉ. निर्मलसिंह उपमुख्यमंत्री झाले होते. पण हे सरकार फार काळ चालू शकले नाही, हा भाग वेगळा.

विधानसभा निवडणुकीत राज्यात ६५.५२ टक्के मतदान झाले होते. पीडीपीला २२.७० टक्के, भाजपाला २३ टक्के, नॅशनल कॉन्फरन्सला २०.८० टक्के तर काँग्रेसला १८ टक्के मते मिळाली होती. यावेळी झालेल्या लोकसभा निवडणुकीत राज्यातील लोकसभेच्या ५ पैकी भाजपाने २, नॅशनल कॉन्फरन्सने २ आणि अपक्षाने १ जागा जिंकली आहे. लोकसभा निवडणुकीचे वैशिष्ट्य म्हणजे नॅशनल कॉन्फरन्सचे उमर अब्दुल्ला यांचा बारामुल्ला मतदारसंघात तुरुंगातून निवडणूक लढवणारे अपक्ष उमेदवार रशीद इंजिनीअर यांनी पराभव केला. अनंतनाग राजौरी लोकसभा मतदारसंघात नॅशनल कॉन्फरन्सचे मिया अल्ताफ अहमद यांनी पीडीपीच्या मेहबुबा मुफ्ती यांचा पराभव केला. उधमपूर लोकसभा मतदारसंघात केंद्रीय मंत्री आणि भाजपाचे डॉ. जितेंद्रसिंह तर जम्मू मतदारसंघात भाजपाचे जुगलकिशोर यांनी सलग तिसऱ्यांदा विजय मिळविला. लडाख लोकसभा मतदारसंघात भाजपाचा पराभव झाला. या मतदारसंघात अपक्ष उमेदवार मोहम्मद हनिफा विजयी झाले. लोकसभा निवडणुकीत भाजपाला २४.३६ टक्के, नॅशनल कॉन्फरन्सला २२.३० टक्के, काँग्रेसला १९.३८ टक्के तर पीडीपीला ८.४८ टक्के मते मिळाली होती. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत यावेळी भाजपाची २२ टक्के मते कमी झाली. २०१९ मध्ये भाजपाला ४६.३९ टक्के मते मिळाली होती. नॅशनल कॉन्फरन्स आणि पीडीपीच्या मतांमध्ये अनुक्रमे १५ आणि ५ टक्क्यांनी वाढ झाली. २०१९ मध्ये नॅशनल कॉन्फरन्सला ७.८९ टक्के तर पीडीपीला ३.४० टक्के मते मिळाली होती. भाजपाने काश्मीर खोऱ्यातील ३ लोकसभा मतदारसंघांत आपले उमेदवारच उतरवले नव्हते, तर त्याठिकाणी स्थानिक पक्षांना पाठिंबा दिला होता. त्यामुळे यावेळी भाजपाच्या मतांची टक्केवारी कमी झाली. राज्यातील विधानसभा निवडणुकीत भाजपा, काँग्रेस, नॅशनल कॉन्फरन्स, पीडीपी तसेच गुलाम नबी आझाद यांचा जम्मू-काश्मीर पीपल्स कॉन्फरन्स हे पाच प्रमुख पक्ष आहेत. याशिवाय काही छोटे पक्षही निवडणुकीच्या रिंगणात उतरू शकतात. भाजपा गुलाम नबी आझाद यांच्या जम्मू-काश्मीर पीपल्स कॉन्फरन्ससोबत आघाडी करू शकतो. नॅशनल कॉन्फरन्स आणि पीडीपी हे दोन्ही पक्ष इंडिया आघाडीचा भाग आहेत, त्यामुळे यातील नेमका कोणता पक्ष काँग्रेससोबत आघाडी करणार, हे आताच सांगता येणार नाही. मात्र भाजपा जम्मू-काश्मीरमधील विधानसभा निवडणुकीच्या तयारीला लागला आहे.

केंद्रीय मंत्री किशन रेड्डी यांना भाजपाने निवडणूक प्रभारी केले आहे. ३७० कलम रद्द करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतल्यामुळे जम्मू-काश्मीर विधानसभेची निवडणूक जिंकणे भाजपासाठी आवश्यक झाले आहे. विधानसभा निवडणूक जिंकल्यामुळे भाजपाच्या या निर्णयावर राज्यातील जनतेने शिक्कामोर्तब केले, तो निर्णय मनापासून स्वीकारला, असे मानले जाणार आहे. ३७० कलम रद्द करण्याचा निर्णय देशातील जनतेने कधीच मनापासून स्वीकारला आहे, त्याचे स्वागत केले आहे. मात्र राज्यातील जनतेने तो स्वीकारल्याचे विधानसभा निवडणुकीच्या निकालावरून स्पष्ट होणार आहे.

९८८१७१७८१७

## वाचक पत्रे

### अनुकरणीय उपक्रम...

'एका हाती गीता आणि दुसऱ्या हाती एआय!' ही 'तरुण भारत'मधील बातमी वाचण्यात आली आणि एक सकारात्मक संदेश मिळाला. भगवद्गीता जीवनाचे तत्त्वज्ञान सांगणारा एक अनमोल ग्रंथ. गीता केव्हा वाचावी? याचे उत्तर सहज 'उतारवयात' हेच येतं. पण गीता वाचून जीवनात सकारात्मक बदल करायचा तर तो बालवयात केला तर भावी आयुष्य उज्ज्वल होईल. आज आधुनिक भारताचे चित्र समोर येत असताना आध्यात्मिकतेकडे वळले तर अनेक समस्यांचे निराकरण सहज होईल. शाळा हे ज्ञान मंदिर आहे. या मंदिरात गीता पठन केले तर त्यातून होणारे संस्कार भावी पिढीला सक्षम करतीलच. आज प्रत्येकाला सर्व काही क्षणात उपलब्ध हवे आहे, पण कर्म करणे, संयम बाळगणे, क्रोधाला आवर घालणे याचेही मार्गदर्शन अत्यंत आवश्यक आहे. विज्ञान आणि अध्यात्म यांची सांगड घातली तर भावी पिढी अधिक सक्षम होईल. गीता शिकणे आणि समजून घेणे आणि जीवनात त्याचा वापर करणे आवश्यक आहे. गीतेच्या प्रत्येक श्लोकात एक ऊर्जा आहे, चैतन्य आहे आणि शब्दांच्या माध्यमातून आपल्यात होणारे हे परिवर्तन निश्चित गरजेचे आहे. कर्मयोग, ज्ञानयोग आणि भक्तियोग शिकवणारी गीता जीवनाच्या प्रत्येक वळणावर साथ देणारी आहे. जीवनात प्रत्येक परिस्थितीत कसे वागावे आणि कसे वागू नये हे गीता सांगते. भारत देश अधिक सक्षम संपन्न करायचा तर शालेय जीवनात या संस्काराचे बीज मुलांच्या मनात रुजवले गेले पाहिजे तरच आदर्श आणि संपन्न व्यक्तिमत्त्व विकसित होऊन देशाचे भविष्य उज्ज्वल होईल.

**संगीता वाईकर**/९९२२५०४७९४

●● ●●

### अखंड भारतासाठी...

वेळ अशी आली आहे की, आता भारत सरकारने आपला अखंड भारत साकार करण्यासाठी जोरदार भक्कम कारवाई करण्यासाठी पावले उचलावी. यासाठी साम, दाम, दंड, नीती यांचा विचार व साहाय्याने पावले उचलावीत. हीच वेळ आहे भारताला अखंड बनविण्याची. बेलगाम राष्ट्रांना लगाम लावण्याची. आपला भारत काश्मीर ते कन्याकुमारी आणि इम्फाल नदीच्या पलीकडे पुन्हा परत शक्तीच्या रूपाने संपन्न अवस्थेत उभा राहिला पाहिजे. अखंड भारत हेच आपले स्वप्न आहे. हे स्वप्न साकारण्यासाठी सोनेरी संधी आली आहे. त्याचा फायदा भारत सरकारने घेतला पाहिजे. भारत भूमी आपली वंदनीय माता आहे. अखंड भारत पुन्हा निर्माण झाला पाहिजे.

**मधुकर डबीर**/९८२२६१५३३१

●● ●●

### 'कुछ मीठा हो जाये...'

'इस राखी मे, कुछ अच्छा हो जाये, कुछ मीठा हो जाये...' रक्षाबंधन म्हणजे राखी पौर्णिमा जवळ आली की, समाजमाध्यमावरून जाहिरातीचे पेव फुटते. बहिणीने भावाला राखी बांधल्यावर भाऊ तिला विदेशी चॉकलेटचा मोठा बॉक्स भेट देतो, असे या जाहिरातीमध्ये दाखवतात. भारतामध्ये अनेक मिठाई प्रसिद्ध आहेत आणि त्या घरीसुद्धा बनवता येतात. घरी बनवलेल्या मिठाईमध्ये प्रेम, जिव्हाळा असतो. ती मिठाई आपल्या माणसाने खावी अशी आपुलकीची भावना असते. असे असताना रक्षाबंधनाच्या दिवशी जाहिरातीतील विदेशी चॉकलेटचा अट्टाहास का?

**दीपाली गीते**/९८२२००४०५४

●● ●●

### तोंड शिवले का भाऊ तुमचे?

बापा... बापा... असहिष्णूच्या नावानं कितीक माणसं बोलले होते. आठवते का? ज्याले त्याले देशात असुरक्षितच वाटे. मंग तो नसिरुद्दीन राहे का अमीर खान राहे. अजून पावेतो काहीच त झालं नाय याईले. फक्त बोंबच मारे अन् हो थे साहित्यिकाइची गेंग पन चुप हाय... अवार्ड गिवार्ड वापस कोनीच देल्ले नाय अजून. कसे देईन भाऊ? बांगलादेशात अल्पसंख्यक कोन हाय? हंऽ आत्ता समजलं तुले. थ्या हिंडेगबर्गच्या अहवालावर कसे मुकरी मुकरी बोलते काँग्रेसवाले. परदेशातले मानसं आपल्या देशाचा सर्वे करते अनं त्याईच्या वर हे कॉंग्रेसवाले विश्वास ठेवते अन् मार पत्रपरिषदा घेते. शोभते का याईले? फिलीस्थीन जिंदाबाद म्हणून संसदेत ओरडते कारन का आपल्या देशात ते मायनारीटीत हाय म्हंते, मंग बांगलादेशात कोण मायनारीटीत हाय भाऊ. बॅरिस्टर होऊन चालत नाय, पारदर्शकता पायजे तवा शिक्षणाले अर्थ. या देशातला एक बी विरोधी पक्षाले बांगलादेशातल्या अल्पसंख्यक लोकाईची चिंता नाय. कारन का त्याईच्या पॉलीसीत बसतच नाय ना ते अन् इकडे आपन अशा लोकाईले मत देऊन पन्नास जागा वाढवून देतो. थोड्या जागा वाढल्या की काय या लोकाईले वाटून रायलं आपनच जिंकलो. इतका आत्मविश्वास वाढला यायचा का इचारू नका. म्हणून पंतप्रधानांनी सीएए कायदा आणला. तो लवकर लागू झालाच पायजे. मुस्लिम देशातल्या अल्पसंख्यकांनी जायचं तरी कुठं? इकडून कोनाले तिकडं जायचं असन तं खुशाल गेलं पायजे. लोड कायले वाढवता भारतात. जनतेने चांगले डोये उघडून पायलं पायजे आता. बों बों बोंबलणारे कवा चुप रायते अन् कवा ओरडते ते...

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# अ.पोलिस आयुक्त शिंदे यांना राष्ट्रपतींकडून पदक

## सहाय्यक पोलिस निरीक्षक सावंत व पोलिस उपनिरीक्षक येणपे यांना महासंचालकांचे विशेष पदक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट -**

मुळचे सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील चिचोली गावचे रहिवासी वय सोलापूर शहर आयुक्तालयातील तत्कालीन सहायक पोलिस आयुक्त तथा सध्याचे मिरा-भाईदर पोलिस आयुक्तालयातील अप्पर पोलिस आयुक्त दत्तात्रय तुळशीदास शिंदे यांना स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रपतींकडून गुणवत्तापूर्ण सेवा पदक जाहीर झाले आहेत. तसेच सोलापूर शहर पोलि आयुक्तालयातील सहाय्यक पोलिस निरीक्षक नानासाहे सांवत व पोलिस उपनिरीक्षक नागेश येणपे यांना पोलिस महासंचालकांचे विशेष सेवा पदक जाहीर झाले आहे.



१४ ऑगस्ट रोजी भारतीय स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून राष्टपतींनी महाराष्ट्र पोलीस दलातील एकुण ३९ पोलीस अधिकारी व अंमलदार यांना त्याांच्या गुणवत्तापूर्ण सेवेबद्दल ''राष्ट्रपती पदक'' देऊन गौरवले आहे. दत्तात्रय शिंदे हे मूळचे सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील चिचोली गावचे रहिवासी आहेत. ग्रामीण भागातील सर्व सामान्य शेतकरी कुटुंबातील असुन त्यांनी एम.एस.सी. (कृषी), जी.डी.सी. ॲन्ड ए., डी.सी.ए., एल.एल.बी. हे शिक्षण पूर्ण केलेले आहे. त्यांनी महाराष्ट्रामध्ये विविध पदावर उत्कृष्ट कामगिरी केलेली आहे.

सन २००१-२००४ या कालावधीत सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयात गुन्हे शाखेचे सहायक पोलीस आयुक्त या पदावर काम करताना सन २००३ मध्ये फौजदार चावडी पोलीस ठाणे हद्दीत अचुक गुन्हेगारी गुप्त वार्ता प्राप्त करुन १२६ हातबॉम्ब जप्त केले. या दोन गुन्ह्यांचा प्रिव्हेन्शन ऑफ टेरेरीस्ट ॲक्टीव्हीटीज ॲक्ट (पोटा) कायद्याअंतर्गत तपास करुन गुन्हेगारांविरुध्द दोषारोपपत्र सादर करण्यात आली. याशिवाय दि.११/१०/२००२ रोजी सोलापुर शहरामध्ये उसळलेल्या जातीय दंगलीमध्ये बेकायदेशिर जमावास पांगविण्यासाठी बळाचा परिणामकारक वापर केला. जिवितांचे व सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी वेळप्रसंगी गोळीबार करावा लागला. तसेच शास्त्रीनगर भागात कोंम्बींग ऑपरेशन राबवून सुमारे ५०० घातक शस्त्रास्त्रे जप्त करुन आरोपींना अटक केली. दंगलीमध्ये आरोपींना अटकाव करणे, अटक करणे व त्याानंतर त्याांचेवर न्यायालयीन खटले भरणे या कामगिरींमध्ये महत्वाची भूमिका बजावली.

दत्तात्रय शिंदे यांनी गडचिरोली, गोंदीया, सोलापूर, मुंबई, नवी मुंबई, सिंधुदुर्ग, सांगली, जळगांव, पालघर व ठाणे शहर या ठिकाणी कार्यरत असतांना एम.पी.डी.ए. व मोक्का या विशेष कायद्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी केली. मटका व संघटीत गुन्हेगारी टोळ्यांवर तडीपारीची कारवाई खंबीरपणे केलेली आहे. तसेच ध्वनीप्रदूषण रोखण्यासाठी ''डॉल्बीमुक्तीतुन जलयुक्तकडे'' महिला सुरक्षेकरीता ''निर्भया सायकल रॅली'' आयोजन, महिला सुरक्षेकरीता ''निर्भया पथकाची निर्मीती'' ह्या नाविन्यपुर्ण व लोकसहभागाच्या योजना राबविल्या आहेत.

पोलीस दलासाठी आव्हानात्मक असलेल्या सर्व विभागामध्ये व विशेष दलामध्ये उत्कृष्ट कामगिरी केली आहे.



# स्वातंत्र्य दिना अगोदर वरूणराजा बरसला

### नक्षत्र बदलाच्या हालचालींनी सोलापुरात वातावरणात बदल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि १४ ऑगस्ट -**

गेल्या अनेक दिवसांपासून शहरात उन्हाळ्या सारखेच कडक ऊन होते. नागरिकांना रखरखीत उन्हाचे चटके सहन करावे लागत होते. मात्र स्वातंत्र्य दिनाच्या एक दिवस अगोदर बुधवारी सकाळ सकाळी शहर परिसरात वरूणराजा जोरदार बरसला.

नक्षत्र बदलाच्या हालचालींनी सोलापुरात वातावरणात बदल झाल्याचे दिसून आले. १६ ऑगस्ट रोजी नक्षत्र बदलणार आहे. स्वांतत्र्य दिनाच्या एक दिवसानंतर मघा नक्षत्र सुरू होत आहे त्याअगोदरच नक्षत्र बदलाच्या हालचालींनी सोलापुरातील वातावरणात बदल झाले आहे. बऱ्याच काळानंतर पावसाची दमदार हजेरी लागली आहे. सोलापूर शहर परिसरातील अनेक सखल भागात पाणी साचले. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण झाला. वाहनधारकांना तारेवरची कसरत करत वाहने चालवावी लागली. तर ऐन सकाळ सकाळी शाळेला जाण्यासाठी तयार झालेल्या विद्यार्थांना या अचानक आलेल्या पावसाचा सामना करावा लागला. जोरदार पाऊस आल्यामुळे विद्यार्थी आणि चाकरमन्यांची त्रेधातिरपिट उडाली.

### नवे नक्षत्र नवा पाऊस

स्वातंत्र दिनाच्या एक दिवसाअगोदर पावसाने दमदार हजेरी लावली आहे. त्यानंतर नक्षत्र बदलणार आहे. मघा नक्षत्र सुरू होणार आहे. मघा तर मघा ढगाकडे बघा नाहीतर चुली पुढे बसा अशी म्हण प्रचलित आहे. नक्षत्र हालचालींनी सोलापुरातील वातावरणात बदल झाल्याचे दिसून येत आहे. सकाळी पाऊस तर दुपारी ऊन असा ऊन पावसाचा लपंडाव देखील अनुभवण्यास मिळाला.

### स्मार्ट सिटीचा जोरदार पाऊसाने उडाला बोजवारा

शहरात बुधवारी सकाळी सकाळी पाऊस पडला. त्यामुळे शहरातील अनेक भागात पाणी साचून राहिल्याने वाहतुकिस अडथळा निर्माण झाला होता. त्यामुळे स्मार्टसिटीच्या कामांचा बोजवारा उडाल्याचे चित्र दिसून आले.

# भारताच्या समस्येची कारणे देशाच्या फाळणीत दडलेली : सुनील देवधर

## शिवस्मारकतर्फे अखंड भारत संकल्प दिन उत्साहात

**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

भारताच्या सद्यस्थितीतील समस्येची कारणे देशाच्या फाळणीत दडलेली आहेत. सर्व संकटांवर मात करून हिंदुस्थान पुन्हा अखंड होईल असा आशावाद माय होम इंडिया सामाजिक संस्थेचे संस्थापक सुनील देवधर यांनी व्यक्त केला. अखंड भारत संकल्प दिनानिमित्त श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मंडळ (शिवस्मारक) तर्फे गुरूवारी हुतात्मा स्मृती मंदिरात आयोजित व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते.



याप्रसंगी व्यासपीठावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा संघचालक सुनील इंगळे, शहर संघचालक राजेंद्र काटवे, शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर उपस्थित होते. भारतमातेच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक बालाजी यल्ला यांनी ओ विजय के पर्व पौरूष हे पद्य सादर केले.

श्री. देवधर म्हणाले, भारतातील जो भूभाग हिंदू अल्पसंख्य होतो तो भाग फाळणीच्या दिशेने वाटचाल करू लागतो हा आजवरचा इतिहास आहे. हिंदूंना आत्मविस्मृत करण्यासाठी कम्युनिस्ट इतिहासकारांनी चुकीचा इतिहास पुढे आणला. धार्मिक लढाईला राजकीय लढाई सांगून हिंदूंची दिशाभूल करण्यात आली. भारताचा राष्ट्रध्वज भगवा असला पाहिजे असा राष्ट्रध्वज समितीचा असूनही तो निर्णय बदलण्यात आला. हिंदूंना सर्वधर्मसभावाचे इंजेक्शन सर्व स्तरातून आजही दिले जात आहे.

छत्रपती श्री शिवाजी महाराज, वीर शिरोमणी महाराणा प्रताप यांच्यासारख्या राजांमुळे हिंदुस्थान सुरक्षित राहिला. मातृभूमी म्हणजे केव्हाही कापायला तो वाढदिवसाचा केक नव्हे. परंतु दुर्दैवाने भारतात फाळणीच्या रूपाने हे घडले. हिंदूनीच हिंदूच्या समस्या सोडवण्याचा निर्धार आणि कृती केली तर भारत अखंड व्हायला वेळ लागणार नाही, असेही वक्ते सुनील देवधर यांनी सांगितले.

शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर यांनी प्रास्ताविक आणि आभार प्रदर्शन केले. शिवस्मारकचे संचालक प्रसाद जिरांकलगीकर यांनी सूत्रसंचालन केले. योगीनाथ बिराजदार यांनी गायलेल्या संपूर्ण वंदे मातरम् ने कार्यक्रमाचा शेवट झाला. वक्ते सुनील देवधर यांचे व्याख्यान ऐकण्यासाठी हुतात्मा स्मृती मंदिर तुडुंब भरले होते. यावेळी सोलापूरकरांनी प्रचंड गर्दी केली होती.

## निधन वार्ता

### कमलादेवी माने



**अकलुज, दि. १४ ऑगस्ट**

आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या आज्जी कमलादेवी आप्पासाहेब माने (वय १०८, भीम बहादुर सरकार) यांचे बुधवारी पहाटे निधन झाले. त्यांच्यामागे ४ मुली, ३ मुले, १६ नातवंडे आणि २१ परतवंडे असा परिवार आहे. राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या त्या सासूबाई होत तर सौभाग्यवती नंदिनी देवी विजयसिंह मोहिते पाटील यांच्या त्या मातोश्री होत.

### बसलिंगप्पा हिप्परगी

**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**



सोलापूर (शेळगी) येथील रहिवासी बसलिंगप्पा मल्लाप्पा हिप्परगी (वय ७२) यांचे दि.१३ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी,एक मुलगी, दोन भाऊ, भावजय, पुतणे असा परिवार असून सोलापुरातील प्रसिद्ध बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टर गुरु हिप्परगी यांचे थोरले बंधू होत.

### विठ्ठल वाघमारे

**वैराग, दि. १४ ऑगस्ट-**



रऊळगाव (ता. बार्शी) येथील विठ्ठल मारुती वाघमारे (वय ७०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

**CHANGE IN NAME**

I hereby declare that my old name **NADIWALE JAHANARA BEGUM SHABBIR AHMED** has been changed my new name **JAHARA BEGAM SHABBIR NADEWALE** both's name's to same and one person.
- Address -
H.No-505, Juni Peth
Ngar Mutton Market
Pandharpur-413304
Asif. S. Nadewale.
9822336780

**IDFC FIRST Bank Limited**

IDFC FIRST Bank

(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

**आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि पुनर्बांधणी आणि सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 च्या अंमलबजावणीच्या कलम 13 (2)अंतर्गत सूचना**

लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाते) खाली नमूद केलेल्या कर्जदारांची आणि सहकर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्ता गहाण ठेवून सुरक्षित केली गेली आहेत. ते संबंधित कर्ज कराराच्या अटी व शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी ठरले आणि ते अनियमित झाले असल्याने, त्यांच्या कर्जाचे RBI मार्गदर्शक तत्त्वांनुसार NP म्हणून वर्गीकरण करण्यात आले. IDFC FIRST Bank Limited (पूर्वीची Capital First Limited, IDFC Bank Limited सोबत विलीन झालेली आणि सध्या IDFC First Bank Limited म्हणून ओळखली जाणारी) त्यांना देय असलेली रक्कम खालील तक्त्यामध्ये अधिक विशेषतः वर्णन केलेल्या संबंधित नोटिसांनुसार नमूद केली आहे आणि या रकमेवरील पुढील व्याज ते देखील लागू होतील आणि त्यांच्या संबंधित तारखांपासून ते कराराच्या दरानुसार आकारले जातील.

| अ. क्र. | कर्ज खाते | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना तारीख | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 97005000 | मालमत्तेवर कर्ज | १.रमजान खाजाभाई शेख<br>२.अस्मा रमजान शेख | 31.07.2024 | INR 5,39,926.34/- |

**मालमत्तेचा पत्ता:** निवासी मालमत्तेचा सर्व तुकडा आणि पार्सल बेअरिंग वेळापूर ना गट क्रमांक 1205/1/अ/1/बी/2, क्षेत्रफळ 100 चौ. मीटर, वेळापूर येथे स्थित, ता. माळशिरस, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र 413113, आणि सीमा: **पूर्वः गट क्रमांक 1206/2, पश्चिमः गेट क्रमांक 1205/11B2 प्लॉट क्रमांक 25, नॉर्थ कॉमन कॉलनी रोड, दक्षिणः गॅट क्रमांक 1205/12 आणि रस्ता**

| अ. क्र. | कर्ज खाते | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना तारीख | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 82337936 | मालमत्तेवर कर्ज | १. सागर संजय कोळेकर<br>२. संजय जनार्दन कोळेकर<br>३. विद्या सागर कोळेकर | 27.07.2024 | INR 15,61,576.59/- |

**मालमत्तेचा पत्ता:** मालमत्तेचा सर्व भाग आणि पार्सल 0 एच 02 आर, मूल्यांकन 0 रु. 06 Ps,. माळशिरस गट क्रमांक 1619 चा भाग, माळशिरस नगरपंचायत, ता. माळशिरस, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-413107, माळशिरस येथे वसलेला, आणि सीमा: - **पूर्वः गटाच्या काही भागात श्री महादेव सुल यांची मालमत्ता 1619, पश्चिमः श्री. पोपट मारुती शिंदे यांची मालमत्ता गट क्रमांक 1616, उत्तरः श्री. बबन थोरात यांची मालमत्ता गट क्रमांक 1618, दक्षिणः माळशिरस-मेदाड रोड**

तुम्हाला याद्वारे **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्रित केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे)** वरील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या तपशिलानुसार त्यानंतरच्या व्याज दरासह रक्कम भरण्याचे आवाहन केले जात आहे. या प्रकाशनाच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत त्यांच्या संबंधित तारखा आणि इतर खर्च, शुल्क इ., असे न केल्यास, गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध, SARFESI कायद्याच्या कलम 13 (4) आणि कलम 14 अंतर्गत, कार्यवाही सुरू करण्यास अधोस्वाक्षरीला प्रतिबंध केला जाईल. **IDFC FIRST Bank Limited** (पूर्वीची **Capital First Limited, IDFC Bank Limited** आणि सध्या **IDFC First Bank Limited** या नावाने विलीन झालेली) देय रक्कम वसूल करण्यासाठी येथे नमूद केले आहे. पुढे तुम्हाला उक्त अधिनियमाच्या कलम 13 (13) अंतर्गत सुरक्षित मालमत्तेचे विक्री/लीज किंवा अन्यथा हस्तांतरण करण्यास मनाई आहे.

**दिनांक : 15/08/2024**
**स्थळ : सोलापूर**

**सही/-**
**अधिकृत अधिकारी आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड**
**(पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाते)**

**जाहिर प्रसिध्दीकरण**

क्र./२०२४-जन्म-मृत्यू/एसआर/८७९/२०२४

**सोलापूर येथील मे. तहसिलदार उत्तर सोलापूर यांचे न्यायालयात**

**अत्ताउल्ला इफतेकार खतिब**
वय : ४९ वर्षे, धंदा : व्यापार
रा. तालुका पोलीस स्टेशनजवळ,
घर नं. ११०, कुर्बान हुसेन नगर, सोलापूर — **अर्जदार**

विरुध्द

**मा. अधिक्षक तथा जन्म-मृत्यू अधिकारी**
**जन्म-मृत्यू नोंदणी कार्यालय,**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर** — **सामनेवाला**

यातील अर्जदार यांचे आजोबा अब्दुलकरीम इमामोद्दीन खतिब यांचा मृत्यू दि. २०/०५/१९६१ रोजी बेगम पेठ, सोलापूर येथे राहत्या घरी झालेला आहे, तरी त्यांच्या मृत्युची नोंद सामनेवाला यांचेकडे होऊन, तसा मृत्यू दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी मे. कोर्टात सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी जर कोणास वरील अर्जदार यांचे आजोबा अब्दुलकरीम इमामोद्दीन खतिब यांचा मृत्यु दाखला देण्यास कोणाचीही हरकत अडथळा असल्यास त्यांनी मे. तहसिलदार कार्यालय, उत्तर सोलापूर यांचेकडे वर प्रकरणी आपली लेखी हरकत ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०६ (सहा) दिवसांचे आत अथवा त्यापुर्वी स्वतः अगर वकीलामार्फत लेखी म्हणणे दाखल करावे. मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास मे. तहसिलदार, उत्तर सोलापूर हे अर्जदाराच्या अर्जावर पुढील योग्य ते हुकूम करतील. त्यानंतर कोणाचीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

ही जाहीर नोटीस दिली. ता. ०२/०७/२०२४

**सही/-** **कनिष्ठ लिपीक** | (कोर्टाचा शिक्का) | **हुकूमावरुन** **सही/-** **तहसिल कार्यालय उत्तर सोलापूर**

**जाहीर प्रसिद्धीकरण**

**दि.कि. अर्ज नं. २६/२०२३ नि.नं.२२**
पुढील नेमलेली तारीख १८/०९/२०२४

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन साहेब यांचे कोर्टात**

**रुपाबाई माणिक आवारे,** वय ९० वर्षे, धंदा- घरकाम,
रा. तडवळे, ता. बार्शी, जि. सोलापूर — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

१) **कुमाबाई असुपत आवारे,** वय ६५ वर्षे, धंदा- घरकाम,
रा. तडवळे, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **हनुमंत असुपत आवारे,** वय ४० वर्षे, धंदा- शेती, रा. सदर
३) **उल्का ऊर्फ गितांजली धोंडीराम माने,** वय ४२ वर्षे, धंदा- घरकाम,
रा. तांदुळवाडी, ता. माढा, जि. सोलापूर
४) **अर्चना ऊर्फ पूजा बालाजी पवार,** वय ३८ वर्षे, धंदा- घरकाम,
रा. दारफळ (गा), ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर — **सामनेवाला**

**अर्ज- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम VIII प्रमाणे**

ज्याअर्थी, यातील अर्जदाराचा मुलगा व सामनेवाला नं. १ चे पती व सामनेवाला नं. २ ते ४ यांचे वडील असुपत माणिक आवारे हे दि. ०८/०८/२०२२ रोजी मौजे बार्शी येथे मयत झालेले आहेत. मयताचे नावे मौजे तडवळे (या) येथील शेतजमीन गट नं. २२२/२ ही मिळकत असून सदर मिळकतस अर्जदार व सामनेवाला नं. १ ते ४ हे मयत असुपत माणिक आवारे यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यांचे शिवाय मयतास अन्य कोणीही वारस नव्हते व नाहीत. सदर मिळकतीस यातील अर्जदार व सामनेवाले नंण १ ते ४ यांची नोंद होणेकरिता ते मयत असुपत माणिक आवारे यांचे कायदेशीर वारस आहेत असे ठरवून जाहीर होवून मिळणेसाठी यातील अर्जदार यांनी सदरील मे. कोर्टात सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, वर नमूद अर्जदार व सामनेवाले नं. १ ते ४ यांचे शिवाय मयत अनुपत माणिक आवारे यांना इतर कोणाचा कसल्याही प्रकारे वारस हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिसांचे आत अगर नेमलेली तारीख दि. १८/०९/२०२४ रोजी याकामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वा. हजर राहून कागदपत्रानिशी आपले म्हणणे अगर हरकत द्यावी अथवा कोणाचेही काही म्हणणे/हरकत न आल्यास सदरील अर्जदार व सामनेवाले यांना सदरील मयत असुपत माणिक आवारे यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

हे जाहीर प्रसिद्धीकरण दिले. तारीख : १३/०८/२०२४

सही/- **कनिष्ठ लिपीक** | (कोर्टाचा गोल शिक्का) | सही/- **सहाय्यक अधीक्षक** दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

**त्वरित पाहिजेत.**

**सिक्युरिटी गार्ड, ऑफिस बॉय, सुपरवायझर, हाउसकीपिंग हेल्पर त्वरित पाहिजेत.**

- पत्ता -
गांधी नगर हेरिटेज मंगलकार्य,
ज्यूस गॅलेक्सी जवळ
**संपर्क - ९१३०११२२७७**

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM RE-Tender ( 3'rd Call) Notice**

Digitally signed online bids are invited through E-tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No.7000032772 E-Tender No. SE/EHV/O&M/Circle/SHP/RE-Tender 14/2023-24., Particulars:** Work of providing of rain suit to various employees under EHV O&M Circle Solapur. Estimated **cost:** ₹ 3,43,200/- **E.M.D.** ₹ 5000/- **Tender cost in ₹** 500.00+ GST, **Sale period:** 13.08.2024 to 21.08.2024, **Last Date of Submission:** 21.08.2024 up to 23:59 Hrs., **Date of opening (Tech. bid):** 22.08.2024 at 23:59Hrs. (If possible). **Contact person:** Superintending Engineer-7447440608. Executive Engineer - 7447441041. For further details please visit to https://srmetender.mahatransco.in.

**Note:** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Superintending Engineer, EHV O&M Circle Solapur.**

**जाहीर प्रगटन**

**दि.कि. अर्ज नं. ६०/२०२४ नि.नं.०६**
पुढील नेमली तारीख : ०५/०९/२०२४

**बार्शी येथील मे. अपर जिल्हा न्यायाधीश यांचे न्यायालयात**
**(श्री. व्ही.के. मांडे सो.- डीजे-१ बार्शी)**

१) **विराज धनंजय पाटील,** वय १४ वर्षे, धंदा- शिक्षण,
रा. कृष्णाजीनगर, करमाळा, ता. करमाळा, जि. सोलापूर- अज्ञान
२) **आरोही धनंजय पाटील,** वय ११ वर्षे, धंदा- शिक्षण,
रा. सदर अज्ञान अर्जदार नं. १,२ याचे अ.पा.क. वडील
**धनंजय अर्जुन पाटील,** वय ४३ वर्षे, धंदा- नोकरी,
रा. कृष्णाजीनगर, करमाळा, ता. करमाळा, जि. सोलापूर — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**महाराष्ट्र शासन** — **सा. वाला**

ज्याअर्थी अज्ञान अर्जदार व त्यांचे अ.पा.क. वडिलाचे नावावरील डि. सोलापूर, सब डि. व ता. करमाळा पैकी करमाळा नगरपालिका हद्दीतील मिळकतीचे वर्णन- सि.स.नं. ३९७३/१ब/पी ४४ याचे क्षेत्र १६६.५० चौ.मी. यामध्ये आर.सी.सी. बांधकाम, संडास, बाथरुम, नळ, लाईट इत्यादी सोयीनीयुक्त व बाकी खुली जागा. येणेप्रमाणे मिळकत आतील तदंगभूत वस्तुसहची मिळकत अज्ञान अर्जदाराची आई छाया धनंजय पाटील व धनंजय अर्जुन पाटील यांनी एकत्रात खरेदी केली होती. पुढे अज्ञान अर्जदाराची आई मयत झालेने वारस हक्काने अज्ञान अर्जदाराची नोंद हक्कपत्रकी झालेली सदर मिळकत खरेदीवेळी बँक ऑफ इंडिया, शाखा करमाळा यांचेकडे कर्ज घेतले. परंतु सदर बँकेचे व्याज दर जादा असलेने सदर कर्ज प्रकरण स्टेट बँक ऑफ इंडिया यांचेकडे वर्ग करणेचे आहे असे कथन करुन अर्जदाराचे अ.पा.क. यांनी अज्ञान अर्जदाराचे वतीने सदर प्रकरण वर्ग करणेकरिता करावी लागणारी कायदेशीर प्रक्रिया, गहाण खताचा दस्त नोंदवणेकरीता परवानगी मिळावी, सदर प्रकरण वर्ग केलेस अज्ञान अर्जदाराचाही लाभ होणार आहे म्हणून परवानगी मागणीचा अर्ज आणलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिद्धीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांच्या वरील मागणी, कथनांसंबंधाने कोणाचे काही हरकती, तक्रारी, आक्षेप असल्यास वा सदर मिळकतीत अन्य कोणाचे काही हक्क, अधिकार असलेस संबंधितानी हे जाहीर प्रसिद्धीकरण प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत अगर पुढील नेमली तारीख ०५/०९/२०२४ रोजी या मे. कोर्टात स्वतः अगर माहितगार वकीलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे, हरकती, तक्रारी सादर कराव्यात. मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास मा. न्यायालयाचे प्रकरणी पुढील योग्य ते आदेश होतील.

हे जाहीर प्रगटन आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिद्ध केले असे.
तारीख : १३/०८/२०२४

(कोर्टाचा गोल शिक्का) | सही/- **अधीक्षक** अपर जिल्हा न्यायालय, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम जनतेस विशेषतः ता. बार्शी आसपासचे परिसरातील जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि.व ता. बार्शी पैकी मौजे उंडेगांव हद्दीतील जमीन गट नं.३३३/२ पैकी क्षेत्र ०१ हे. ६६ + पो.ख. ०० हे. ०३ आर अशी एकूण ०१ हे. ६९ आर याचा आकार ०५ रु. ४३ पैसे यासी चतु:सिमा- पूर्वेस- भोगावती नदी, दक्षिणेस- पंढरी रणशूर यांची जमीन, पश्चिमेस- नामदेव कदम यांची जमीन, उत्तरेस- ज्ञानदेव रणशूर यांची जमीन. सदर मिळकत ही शोभा प्रल्हाद रणशूर यांना बार्शी येथील मे. दिवाणी न्यायाधीश यांचेकडील रे.मु.नं. ६६/२०२१ चे तडजोडी अन्वये मालकी हक्कात प्राप्त झालेली आहे.

वरील वर्णन केलेली मिळकत ही वर नमूद इसमाने त्याचे कौटुंबिक व कायदेशीर गरजेपोटी आमचे पक्षकार यांना कायम खुशखरेदी देण्याचा ठराव करुन त्यांचेकडून इसारा दाखल रोख रक्कम घेतली आहे व सदर मिळकत आमचे पक्षकारास खरेदी देण्याचा व्यवहार ठरलेला आहे. खरेदी देणार यांनी सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याची खात्री आमचे पक्षकारास दिलेली आहे. तसेच त्यांनी सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी खरेदी देण्याचे मान्य व कबूल केले आहे.

याहीऊपर सदर मिळकतीबाबत कोणाचे कसलेही कायदेशीर अधिकार, हक्क, साठी करार, खरेदीखत, भाडेपट्टा करार, कुळ, वहिवाट, वहिवाटीचे अधिकार, मालकी हक्क, वारसा, गहाण, बटईपत्र, पोटगी, चोळी बांगडी अथवा विकसन करार इत्यादी वा अन्य कोणतेही कायदेशीर हक्क, अधिकार असल्यास त्यांनी योग्य कागदपत्रानिशी व पुराव्यासह खालील नमूद पत्त्यावर हे जाहीर प्रसिद्धीकरण प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत लेखी हरकत कळवावी. अन्यथा वरील नमूद मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास आमचे पक्षकार हे सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी, बिनबोजाची असल्याची प्रामाणिकपणे गृहीत धरुन खरेदी देणार यांचेबरोबर ठरलेल्या अटी व शर्तीप्रमाणे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली असे.

तारीख : १४/०८/२०२४

सही/-
**ॲड. प्रकाश एस. साखरे,**
२४८४, आडवा रस्ता, बार्शी, ता. बार्शी,
जि. सोलापूर. मो.नं. ९०२८४६८५०७
(अशिलातर्फे ॲडव्होकेट)

NAAC Accredited & ISO 9001:2015 Certified

**विद्या विकास प्रतिष्ठान,सोलापूर**

**व्ही व्ही पी इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, सोलापूर.**

V.V.P.I.E.T. जयतु तंत्रविज्ञानम्

७२/२ब, सोरेगांव, डोणगांव रोड, सोलापूर – ४१३००८ मो. 8380030555

**Approved By AICTE, DTE, Mumbai & Affiliated to DBATU, Lonere.**

**प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया २०२४-२५**

| कोर्सचे नाव | Intake | Choice Code |
|---|---|---|
| आर्टिफिशियल इंटिलीजेन्स् ॲन्ड डाटा सायन्स | 30 | 632199510 |
| कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरींग | 90 | 632124210 |
| सिव्हील इंजिनिअरींग | 30 | 632119110 |
| इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग | 60 | 632129310 |
| इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग | 60 | 632137210 |
| मेकॅनिकल इंजिनिअरींग | 30 | 632161210 |

**राष्ट्रीय स्तरावरील NAAC मानंकन प्राप्त असलेली संस्था**

**DTE CODE EN-06321**

* प्रथम वर्ष CAP ROUND-2 करिता ऑनलाईन ऑप्शन फॉर्म भरण्याची तारीख दि. २०/०८/२०२४ ते २२/०८/२०२४
* थेट द्वितीय वर्ष CAP ROUND-1 करिता ऑनलाईन ऑप्शन फॉर्म भरण्याची तारीख दि. १६/०८/२०२४ ते १८/०८/२०२४

**Dr. Arun N. Gaikwad** Campus Director & Principal | **Hon. Shri. Amol (Nana) Chavan** Founder Secretary | **Hon. Dr. G. K. Deshmukh** Founder Chairman

**प्रवेशासाठी संपर्क**

**प्रा. राजेंद्र सु. चव्हाण** 9822174477
**प्रा. जितेश के. रोमन** 9545935455

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# एल्ग्रीस सोलरची स्वातंत्र्य दिनानिमित्त 'हर घर सोलर' ऑफर



**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

सोलार पॉवरचे महत्त्व कळले नाही असा माणूस आता दिसणार नाही. कारण अनेकांनी आपल्या घराच्या छतावर सोलार संयंत्र बसवून घेतले आहे आणि ते मोफत विजेचा आनंद आणि दिलासा अनुभवत आहेत हे आपण पहात आहोत.

सौर ऊर्जा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणारी सोलापूरची एल्ग्रीस सोलार पॉवर सिस्टीम या क्षेत्रात भरीव योगदान देत असून एल्ग्रीस सोलारच्या दर्जेदार सिस्टिम्स आणि सर्व्हिसेसमुळे हजारों ग्राहकांचे लाईट बिल शून्यावर आले आहे. सोलरचे नाव काढले की लोक त्यासाठीच्या 'इनिशियल' म्हणजे पहिल्या मोठ्या गुंतवणुकीविषयी प्रश्न विचारतात. किमान दोन ते तीन लाख रुपये गुंतवावे लागतात तेव्हा कोठे सोलारचे सुख मिळते असे लोकांना वाटते. पण आता ती गोष्ट अडचणीची राहिलेली नाही. आता त्यासाठी बँकेकडून लोन मिळू शकते. ते लोन फक्त ६.९९ % व्याजदराने असून परतफेडीची मुदतही १० वर्षे आहे. म्हणजे मासिक हप्ता फार कमी आहे.

इनिशियल गुंतवणुकीसाठी लोन मिळाले तर त्याचा हप्ता आपण दरमहा भरतो तेवढ्या बिलापेक्षा खूप कमी येईल. म्हणजे आपले दरमहाचे बील भरत राहिलो की, काही वर्षात कर्ज फिटेल आणि सोलर प्रॉजेक्ट आपला होईल. तिथून २४ ते २५ वर्षे वीज मोफत. आपण डिझेल आणि कोळशावर अवलंबून आहोत. पण त्यापासून आपल्याला कधी ना कधी स्वातंत्र्य मिळवावे लागेलच. सुदैवाने ते आता सोपे झाले आहे. आपण आता भरता तेच बील हप्ता म्हणून भरा आणि सोलारचे मालक व्हा. स्वत:ची वीज स्वत:च तयार करा. अधिक माहितीसाठी एल्ग्रीस सोलरच्या ०२० ७१५३ ००२७ या फोन क्रमांकावर फोन करा आणि अधिक माहिती जाणून घ्या. सोलार पॉवर अमर रहे.आपली वीज आपणच तयार करू या आणि स्वावलंबनाचा तिरंगा घराघरावर फडकवू.

N.R. Dhoot Group
ELGRIS
Solar Roof Top Systems

**वीज बिलापासून 'स्वातंत्र्य - झाले एकदम सोपे**

- केवळ रुपये ९९९ मध्ये मिळवा सोलर सिस्टम.
- ७८ हजारपर्यंत सबसिडी.
- ३९ दिवस ईएमआय.
- रुपये २.९९ युनिट्स वीज दर.
- ३० वर्षे सोलर पॅनल वॉरंटी.

# मि.फिटमध्ये ५० टक्केपर्यंत मान्सून डिस्काउंट ऑफर



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

मि.फिट या फिटनेस साहित्य विक्रीच्या दालनात दर्जेदार कंपन्याचे संपूर्ण व्यायाम साहित्य मिळते. घरगुती व्यायाम साहित्या बरोबर कमर्शीयल जिम,सोसायटी जिम व शैक्षणिक संस्था ना व्यायाम साहित्य पुरवठा केला जातो.

सध्या कॉस्को आणि हरक्युलस कंपनींच्या काही मॉडेल वर २० ते ४०% सवलतीची स्किम कंपनीने दिली आहे. इतर कंपन्याच्या काही मॉडेलवर ५०%पर्यत सवलतीची स्किम चालू आहे.त्यामुळे ऑनलाईन च्या च किंमतीत मशीन मिळत असल्यामुळे ग्राहकांना त्याचा फायदा तर होतोच शिवाय सेवा सुलभ होते. हरक्यूलस कंपनीच्या मशीनवर ० %व्याज दराने बजाज चे फायनान्स उपलब्ध आहे. ग्राहकांनी एकदा भेट देऊन योजनेचा लाभ घ्यावा.






## संक्षिप्त वृत्त



## शालेय कुस्ती स्पर्धेत पानगलचा काझी अजिंक्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

श्रीकृष्ण कुस्ती केंद्र येथे झालेल्या शालेय कुस्ती स्पर्धेत एम. ए. पानगल अँग्लो उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचा मोहम्मद जकवान मुजाहिद काझीने ९७ किलो वजन गटात प्रथम क्रमांक पटकाविला. अब्दुल रहमान बागवानने द्वितीय तर अयान बागवानने तृतीय क्रमांक संपादिला. काझीने गेल्या तीन वर्षापासून शहर, जिल्हा व विभागस्तरावर प्रथम क्रमांक तर शालेय राज्य व फेडरेशन स्पर्धेत रौप्य पदक पटकाविले. त्याने गेल्या तीन वर्षात ११ पदकांची कमाई केली. त्यास क्रीडा शिक्षक अल्ताफ सिद्दिकी, नावेद मुनशी व इकबाल दलाल यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे प्राचार्य डॉ. हरून रशीद बागबान, उपमुख्याध्यापिका डॉ. सुरय्या परविन जहागीरदार, निकहत नलामंदू आदींनी अभिनंदन केले.



## ज्ञानप्रबोधिनीच्या तिघांची विभागीय शालेय कुस्ती स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

येथील ज्ञानप्रबोधिनी बालविकास मंदीरच्या वेदांत मोरे, रणवीर साळुंके व श्रीगणेश आयवळे यांची पुणे विभागीय शालेय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली. शालेय शहर कुस्ती स्पर्धेत वेदांतने ५५ किलो, रणवीरने ६० किलो तर श्रीगणेशने ९५ किलो वजनी गटात अजिंक्यपद पटकाविले. या कामगिरीवर त्यांची निवड झाली. त्यांना युवराज शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे सहकार्यवाह अमोल गांगजी, मुख्याध्यापिका सुनीता चकोत व पर्यवेक्षिका प्रवीण काळे यांनी अभिनंदन केले.



## सेंट थॉमसच्या तिघींची सिकई मार्शल आर्ट पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

येथील सेंट थॉमसच्या शुभम पाटील, ऋषिका चुंगीवडीयार व अर्नव लोंढे या तिघींची पुणे विभागीय शालेय सिकई मार्शल आर्ट स्पर्धेत विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. शालेय शहर स्पर्धेत त्यांनी अजिंक्यपद पटकाविले. या कामगिरीवर त्यांची निवड झाली. तसेच अद्विका धडांबे, आर्यन बेनगी,वरद गोलवलकर यांनी उपविजेतेपद संपादिले. त्यांना क्रीडा शिक्षक अमित येवलेकर, राजेंद्र गायकवाड, सिल्वेस्टर जॉन यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे मुख्याध्यापक फादर जिसन अँन्टोनी व व्यवस्थापक फादर पॉल यांनी अभिनंदन केले.



राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गणतंत्र मंडप, राष्ट्रपती भवन येथे पॅरिस ऑलिम्पिक २०२४ च्या भारतीय दलाची भेट घेतली. यावेळी खेळाडूंचे उत्कृष्ट प्रयत्न आणि उत्कृष्ट कामगिरीबद्दल राष्ट्रपतींनी त्यांचे अभिनंदन व कौतुक केले. सर्व भारतीय ऑलिम्पिकपटू १५ ऑगस्ट रोजी लाल किल्ला येथे होणाऱ्या स्वातंत्र्यदिनाच्या सोहळ्यात सहभागी होणार आहेत

# आता लक्ष पॅरिस पॅरालिम्पिककडे

### भारत ८४ खेळाडूंचे पथक पाठवणार
### २५ पदकांचे लक्ष्य

◆ **नवी दिल्ली, १४ ऑगस्ट**

पॅरिस उन्हाळी ऑलिम्पिक स्पर्धा आटोपल्यानंतर आता पॅरिस पॅरालिम्पिकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे. आगामी २८ ऑगस्टपासून पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेला प्रारंभ होणार आहे. २८ ऑगस्ट रोजी उद्घाटन झाल्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी स्पर्धेला सुरुवात होणार आहे.

२८ ऑगस्ट ते ८ सप्टेंबरपर्यंत चालणाऱ्या या पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेसाठी भारत ८४ खेळाडूंसह आपले सर्वात मोठे पथक पाठवणार आहे. टोकियोमध्ये भारताने केवळ १४ महिलांसह ५४ खेळाडू पाठवले होते. आता पॅरिससाठी खेळाडूंची संख्या ८४ पर्यंत वाढली असून यात ३२ महिला खेळाडूंचा समावेश आहे.

टोकियो पॅरालिम्पिकमध्ये भारताने तब्बल ५ सुवर्णांसह १९ पदके जिंकून इतिहास घडवला होता. यात पाच सुवर्णांसह ८ रौप्य व ६ कांस्यपदकांचा समावेश आहे. यावेळी भारताला पदकांची संख्या वाढवायची आहे. पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये भारतीय ॲथ्लिट्स केवळ सर्वोत्कृष्ट प्रदर्शन करणार नाही, तर त्यांनी २५ पदकांचे टप्पा ओलांडण्याचे लक्ष्य ठेवले आहे, असे भारतीय पॅरालिम्पिक समितीचे (पीसीआय) अध्यक्ष देवेंद्र झाझरिया यांनी सांगितले.

यावेळचे आमचे घोषवाक्य आहे 'अबकी बार २५ पार.' आमचे यावेळी २५ हून अधिक पदके जिंकण्याचे लक्ष्य आहे. तयारी चांगली सुरू आहे. खेळाडू केवळ शारीरिकच नाही, तर मानसिकदृष्ट्याही तंदुरुस्त आहेत. त्यांना टॉप्स योजनेअंतर्गत सर्व सुविधा मिळत आहेत, असे झाझरिया यांनी सांगितले. डोपिंग नियमाचे उल्लंघन केल्यामुळे पॅरा बॅडमिंटनपटू प्रमोद भगतला १८ महिन्यांसाठी निलंबित करण्यात आल्यामुळे तो पॅरिस पॅरालिम्पिकला मुकणार आहे.

४३ वर्षीय देवेंद्र झांझरिया हे तीन वेळचे पॅरालिम्पिक पदक विजेते असून त्यांनी २०२१ मध्ये टोकियो येथे भारतीय पॅरा ॲथ्लिट्सच्या सर्वोत्तम कामगिरीचा एक भाग होते. त्यांनी २००४ व २०१६ रिओ पॅरालिम्पिपकमध्ये एफ४६ भालाफेकमध्ये रौप्यपदक जिंकले होते. ◂(वृत्तसंस्था)

### भारतीय पॅरालिम्पिक संघ




**पॅरा तिरंदाजी** : हरविंदर सिंग, राकेश कुमार, श्याम सुंदर स्वामी, पूजा, सरिता व शीतल देवी. **पॅरा ॲथ्लेटिक्स** : दीप्ती जीवनजी, सुमित अंतिल, संदीप, अजित सिंग, सुंदरसिंग गुर्जर, रिंकू, नवदीप, योगेश कथुनिया, धरमबीर, प्रणव सूरमा, अमित कुमार, निषाद कुमार, राम पाल, मरियप्पन थांगावेलू, शैलेश कुमार, शरद, सचिन सर्जेराव खिलारी, मोहम्मद. यासर, रोहित कुमार, प्रीती पाल, भाग्यश्री माधवराव जाधव, मनू, परवीन कुमार, रवी रोंगाली, संदीप संजय गुर्जर, अरविंद, दीपेश कुमार, प्रवीण कुमार, दिलीप महादू गावित, सोमण राणा, होकातो होतोझे सेमा, साक्षी कसाना, करमज्योती, रक्षिता राजू, अमिषा रावत, भावनाबेन आजबाजी चौधरी, सिमरन, कांचन लखानी.

**पॅरा बॅडमिंटन** : मनोज सरकार, नितेश कुमार, कृष्णा नागर, शिवराजन सोलाईमलाई, सुहास यथीराज, सुकांत कदम, तरुण, मानसी जोशी, मनदीप कौर, पलक कोहली, मनीषा रामदास, तुलसीमाथी मुरुगेसन, नित्या श्री सिवन, **पॅरा डोंगी** : प्राची यादव, यश कुमार, पूजा ओझा, **पॅरा सायकलिंग** : अर्शद शेख, ज्योती गडेरिया, अंध जुडो : कपिल परमार, कोकिला, **पॅरा पॉवरलिफ्टिंग** : परमजीत कुमार, अशोक, सकिना खातून, कस्तुरी राजमणी, **पॅरा रोइंग** : अनिता, नारायण.

**पॅरा नेमबाजी** : अमीर अहमद भट, अवनी लेखरा, मोना अग्रवाल, निहाल सिंग, मनीष नरवाल, रुद्रांश खंडेलवाल, सिद्धार्थ बाबू, श्रीहर्ष देवराड्डी रामकृष्ण, स्वरूप महावीर उन्हाळकर, रुबिना फ्रान्सिस.

**पॅरा जतलतरण** : सुयश नारायण जाधव, **पॅरा टेबल टेनिस** : सोनलबेन पटेल, भाविनाबेन पटेल, **पॅरा तायक्वांडो** : अरुणा.

## मॉनी मॉर्केल भारतीय संघाचे गोलंदाजी प्रशिक्षक

◆ **नवी दिल्ली, १४ ऑगस्ट**

दक्षिण आफ्रिकेचा माजी वेगवान गोलंदाज मॉर्नी मॉर्केल याची भारतीय पुरुष क्रिकेट संघाच्या गोलंदाजी प्रशिक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे, अशी पुष्टी बीसीसीआयचे सचिव जय शाह यांनी बुधवारी केली.



मॉर्केल पारस म्हाम्ब्रेची जागा घेतील आणि १९ सप्टेंबरपासून चेन्नई येथे सुरू होणाऱ्या बांगलादेशविरुद्धच्या कसोटी मालिकेतून ते पदभार स्वीकारतील. मोर्ने मॉर्केलला वरिष्ठ भारतीय पुरुष संघाचे गोलंदाजी प्रशिक्षक म्हणून नियुक्त करण्यात आले आहे, असे बीसीसीआयचे सचिव जय शाह यांनी वृत्तसंस्थेला सांगितले.

मॉर्केल यांचा कार्यकाळ १ सप्टेंबरपासून सुरू होत आहे आणि ते पुढील महिन्याच्या सुरुवातीला बंगळुरूच्या राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये अहवाल सादर करणार आहेत. मॉर्केलने यापूर्वी मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्यासोबत लखनौ सुपर जायण्ट्समध्ये दोन वर्षे काम केले आहे. गंभीरच्या सपोर्ट स्टाफमधील इतर सदस्यांमध्ये सहायक प्रशिक्षक अभिषेक नायर, रायन टेन डोशचेट आणि क्षेत्ररक्षण प्रशिक्षक टी दिलीप यांचा समावेश होता. ◂(वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### ऑलिम्पिक रौप्यपदक विजेती व्हेकिक क्रुएगरकडून पराभूत

**मेसन** : ऑलिम्पिकमध्ये रौप्यपदक जिंकल्यानंतरच्या पहिल्याच सामन्यात डोना व्हेकिकचा पराभव झाला. सिनसिनाटी येथे आयोजित सिनसिनाटी ओपन टेनिस स्पर्धेच्या सलामीच्या सामन्यात डोना व्हेकिकला अमेरिकेच्या ॲश्लिन क्रुएगरकडून ५-७, ७-६ (४), ६-२ असा पराभव पत्करावा लागला. क्रुएगरने पात्रता फेरीत नाओमी ओसाकाचा पराभव केला व मुख्य फेरीत स्थान मिळविले. तिथे पहिल्या फेरीत तिने क्रोएशियाच्या १६ व्या मानांकित व्हेकिकवर विजय संपादन केला. पॅरिसमध्ये महिलांच्या सुवर्ण-पदकाच्या लढतीत व्हेकिकला झेंग क्विनवेनकडून पराभव पत्करावा लागला होता. पुरुष गटात ब्रॅण्डन नाकाशिमाने ११ व्या मानांकित टेलर फ्रिट्झला ६-४, ४-६, ७-६ (४) असा, तर १२ व्या मानांकित बेन शेल्टनने रेली ओपेल्काला ७-६ (३), ७-६ (३) असा पराभवाचा धक्का दिला. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये पुरुषांच्या टेनिसमध्ये कांस्यपदक जिंकणाऱ्या इटलीच्या लोरेन्झो मुसेट्टीने चिलीच्या निकोलस जॅरीला ७-६ (५), ७-६ (४) असे पराभूत केले.

## दुखापतग्रस्त बेन स्टोक्स कसोटी मालिकेतून बाहेर

◆ **लंडन, १४ ऑगस्ट**

इंग्लंड क्रिकेट संघाचा कर्णधार बेन स्टोक्स श्रीलंकेविरुद्धच्या आगामी कसोटी मालिकेतून बाहेर झाला आहे. त्याच्या पायातील स्नायू ताणल्या गेले आहे. २१ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या श्रीलंकेविरुद्धच्या इंग्लंडच्या मालिकेतील तिन्ही कसोटींना मुकणार आहे.



३३ वर्षीय स्टोक्सला रविवारी द हंड्रेड स्पर्धेत नॉर्दर्न सुपरचार्जर्सकडून फलंदाजी करताना दुखापत झाली. अष्टपैलू बेन स्टोक्स इंग्लंडच्या हिवाळी कसोटी दौऱ्यावर परतण्याची शक्यता आहे, असे इंग्लंडने एका निवेदनात म्हटले आहे. पाकिस्तानविरुद्धची पहिली कसोटी ७ ऑक्टोबर रोजी मुलतान येथे होणार आहे. श्रीलंकेविरुद्ध स्टोक्सच्या अनुपस्थितीत इंग्लंडचा उपकर्णधार ऑली पोप संघाचे नेतृत्व करेल, असे इंग्लंडच्या क्रिकेट मंडळाने सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

# बार्शीचा ध्रुव दिनेश पाटील पुत्र-पिता अजिंक्य

- जगन्नाथ शिंदे चॅम्पियन चषक बुद्धिबळ स्पर्धा
- अन्य गटात गटात वरद लिमकर, रणवीर पवार, विहान दासरी विजयी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १४ ऑगस्ट-**

जगन्नाथ शिंदे चॅम्पियन चषक आठव्या बुद्धिबळ स्पर्धेत बार्शीचा ध्रुव पाटील याने आठ पैकी साडेसात गुण घेऊन शेवटपर्यंत अजिंक्य रहात प्रथम क्रमांक तर त्याचे वडील दिनेश पाटील यांनी सात गुण मिळवून शेवटपर्यंत अपराजित राहत दुसरा क्रमांक पटकाविला. अशा प्रकारे पिता-पुत्रांनी एखाद्या बुद्धिबळ स्पर्धेत पहिला व दुसरा क्रमांक पटकावायची सोलापूर जिल्ह्यातील पहिलीच वेळ आहे.

श्री रमा जगदीश उद्देशीय महिला उत्कर्ष संस्था व सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशन यांच्या मान्यतेने जगदीश मंगल कार्यालय येथे संपन्न झालेल्या या स्पर्धे चा बक्षीस समारंभ बालरोग तज्ञ डॉ. अण्णासाहेब लोखंडे यांच्या हस्ते झाला. यावेळी सुलाखे हायस्कूल बार्शीचे शिक्षक रोहित आगरकर, बुद्धिबळ संघटक परमेश्वर सुरवसे, सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनचे सचिव शरद नाईक, करमाळा तालुका बुद्धिबळ संघटनेचे सचिव पृथ्वीराज देशमुख, धाराशिव जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे संघटक महादेव भोरे, बार्शी येथील बुद्धिबळ संघटक सोमनाथ पांडेकर, डॉ. चंद्रकांत चिलजवर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहित आगरकर व प्रस्ताविक परमेश्वर सुरवसे यांनी केले. यावेळी संघटनेचे अध्यक्ष मधुकर नाईक शिरीष नाईक प्राध्यापक डॉक्टर शैलेंद्र नाईक अर्जुन कदम श्रीमती नीता तांबोळकर राजू राजपूत यांनी



विजयी खेळाडूंचे अभिनंदन करत कौतुक केले.

**गुणानुक्रमे अंतिम निकाल : खुला गट** : ध्रुव पाटील, दिनेश पाटील, प्रज्वल कोरे, तेजस दौंड, विशाल पटवर्धन, चंद्रशेखर बसर्गिकर, स्वप्निल हदगल, भगवान जाधव, सतीश पवार, सागर पवार, चंद्रकांत पवार

२४ वर्षाखालील : वरद लिमकर, ईश्वरी गानबोटे, तन्वी कुलकर्णी, अमित मादगुंडी, गणेश घोरपडे, नाविन्या वडशेरला, स्वप्निल हुल्ले, राज जाधव.

**पंधरा वर्षे खालील** : रणवीर पवार, स्वराली हातवळणे, साईराज घोडके, श्रीपाद पाटील, अथर्व राठोड, वेद आगरकर, स्वानंद तापकिरे, अक्षरा देशमाने, आयुष्य सोनवणे.

**बारा वर्षाखालील** : विहान दासरी, समरजीत देशमुख, सार्थक उंबरे, मयुरेश स्वामी, सानवी गोरे, प्रज्वल काशीद, कार्तिक भागवत, अंश राठोड, वेदांत मुसळे.

**अकरा वर्षांखालील** : सिद्धी देशमुख, रणजीत गायकवाड, विहान राठोड, श्रीप्रबळ जिल्ला.

**दहा वर्षाखालील** : शशांक जमादार, आयुष्य गायकवाड, राजवर्धन परडे, ओम निरंजन.

**नऊ वर्षाखालील** : श्लोक चौधरी, वेदांत पांडेकर, शिवतेज पाटील, सृष्टी मुसळे.

**आठ वर्षाखालील** : आदित्य जान गवळी, नैतिक होटकर, उत्कर्ष लोखंडे, हिमांशू व्हनगावडे.

**सात वर्षाखालील** : नियन कंदीकटला, रंगरेज नमन, भांगे पार्थ, रत्नेश घाणेगावकर.

**सहा वर्षाखालील** : अभिराज पाटील, सातारकर अर्जुन, स्वप्निल सकपाळ.

**चेस इन स्कूल उत्तेजनार्थ : मुले** : शौर्य चंदनशिवे, कसबे आदित्य, अब्दुल्ला मोहोळकर, आरोही दलाल, दृष्टी लामकाने, रचना हरलग, श्रुती क्षीरसागर, विजय कुंभार.

**मुली** : श्रीनिधी शबादे, साक्षी पाटील (करमाळा), प्रतीक नामदेव, अथर्व बडदे, मानव मुसळे (धाराशिव), अफरीद शेख, प्रथमेश थोरात, विराज बुरले (पोलीस प्रशिक्षण केंद्र केगाव), नितीन भोसले, कालबांडे उमेश, शिंदे ऋषिकेश.



## खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांचा पार्कवर मॉर्निंग वॉक

**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

सोलापूर डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशनचे संयुक्त सचिव व माढा मतदार संघाचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील हे येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर सामना पाहण्यासाठी आले होते. त्याआधी सकाळी त्यांनी स्टेडियम वर मॉर्निंग वॉक केले.

यावेळी त्यांनी इंदिरा गांधी स्टेडियमवर सराव करणाऱ्या विविध क्लबच्या सरावांची पाहणी केली. त्यांनी विविध क्लबच्या प्रशिक्षकांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी पालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांना पत्र देण्याच्या सूचना संयुक्त सचिव चंद्रकांत रेंम्बर्सु यांनी सांगितले. यावेळी खासदार मोहिते पाटील यांचा स्टेडियमवरील प्रशिक्षकांनी सत्कार केला. यावेळी राजेंद्र गोटे, उदय डोके, संजय वडजे, संतोष बडवे आदी उपस्थित होते.



## बॉक्सिग स्पर्धेत गांधी नाथाच्या १० खेळाडूंची कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

शालेय बॉक्सिंग स्पर्धेत येथील गांधी नाथा विद्यालयाच्या १० खेळाडूंनी कामगिरी केली.

या खेळाडूंना क्रीडा शिक्षक शिवानंद सुतार यांचे मार्गदर्शन लाभले आहे. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष संजय गांधी, माध्यमिकच्या मुख्याध्यापिका स्मिता पुरवत व प्राथमिकच्या मुख्याध्यापिका सरोजना मुलिंटी यांनी हार्दिक अभिनंदन केले.

**कामगिरी : १९ वर्षे**: वैष्णवी ढेंगळे (५२ ते ५७ किलो, द्वितीय), साक्षी जिडगे (६९ ते ७५ किलो, द्वितीय), क्षिप्रा तडकासे (४८ ते ५१किलो, तृतीय), नंदीनी दहिहंडे (५७ ते ६० किलो, तृतीय, साक्षी नलोगल, आदिती जवान (तृतीय). **१७ वर्षे** : समृद्धी ढेरे (७० ते ७५ किलो, तृतीय), हर्षदा अलकुंटे (४६ ते ४८ किलो, तृतीय), संयुक्ता ताटे (४८ ते ५१, तृतीय), सम्राट वाघमारे (३५ ते ३८ किलो, द्वितीय).



## शालेय शहरस्तर स्क्वॅश स्पर्धेत इप्पाकायल प्रशालेचे वर्चस्व

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

शालेय शहर स्क्वॅश स्पर्धे त मुलींच्या गटात इप्पाकायल प्रशालेच्या मधुरा उप्पीन व जोया जमादार यांनी अनुक्रमे प्रथम व द्वितीय स्थान मिळविले. लोकमंगल प्रशालेच्या प्रणाली चव्हाण हिने तृतीय व सहिने प्रशालेच्या खुशी चौधरी हिन चतुर्थ स्थान मिळविले.

यात शहरातील २२ मुलींनी व ३६ मुलांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेचे उद्घाटन सोलापूर जिल्हा स्क्वॅश संघटनेचे जिल्हाध्यक्ष केतन शहा यांच्या हस्ते व सोमपा क्रीडा अधिकारी श्रीकांत घोलप यांच्या हस्ते झाले. यावेळी वीरेश अंगडी, राजाराम शितोळे, सुहास छंचुरे अजित पाटील, शिवानंद सुतार, प्रसन्न काटकर रविकांत म्हमाणे, नागेश खुने आदी उपस्थित होत. या स्पर्धेसाठी पंच म्हणून मितेश काळे यांनी काम पाहिले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# सोलापुरात ३०१ फुटी तिरंगा पदयात्रा



**अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आणि मॉडर्न हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद मध्यवर्ती नगर आणि मॉडर्न प्राथमिक व हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापूर शहरात ३०१ फ ूट तिरंगा पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे सचिव के. के. कुलकर्णी, मुख्याध्यापक शिल्पा जोशी, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक प्रज्ञा बोधे, अभाविप प्रदेश सहमंत्री आदित्य मुस्के, नगरमंत्री ब्रम्हा पाटील यांच्या हस्ते भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन करून तिरंगा पदयात्रेचे उद्घाटन करण्यात आले.

भारत माता की जय, वंदे म ातरम्, काश्मिर हो या कन्याकुमारी भारत माता एक हमारी या घोषणांनी पदयात्रा मार्ग दुमदुमून गेला होता. मॉडर्न हायस्कूल येथून पदयात्रेला प्रारंभ झाला. गांधी नगर-सात रस्ता-गोविंद मेडिकल- जगदंबा चौक मार्गे मॉडर्न हायस्कूल येथे पदयात्रेचा समारोप करण्यात आला. स्वतंत्र दिन हा उत्सव आहे. या उत्सवाची समाजामध्ये वातावरण निर्मिती व्हावी यासाठी तिरंगा पदयात्रा काढण्यात आली होती, अशी माहिती आयोजकांनी दिली. यावेळी नागरिक, प्राध्यापक, विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.

# काटीच्या शामल शिंदे-हंगरकर यांना क्रीडा भूषण पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

तुळजापूर तालुक्यातील काटीच्या कन्या व सावरगावच्या स्नुषा आणि सध्या विकासनगर देहूरोड पुणे येथे वास्तव्य असलेल्या शामल माणिकराव शिंदे-हंगरकर यांना इंडिया बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डचा क्रीडा भूषण पुरस्कार नुकताच मान्यवरांचे उपस्थितीत प्रदान करण्यात आला.




साई सोशल अँड स्पोर्ट्स फाउंडेशन व ऑल इंडिया वुमेन राइट्स असोशियन यांच्यातर्फे रक्षाबंधनानिमित्त वर्ल्ड बेस्ट सिस्टर अवॉर्ड आणि इंडिया बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड दि. १० ऑगस्ट रोजी ईस्ट कोर्ट फिनिक्स मॉल येथे आयोजित करण्यात आला होता.

व आभार फिरोज खान अध्यक्ष साई सोशल स्पोर्ट्स फाउंडेशन यांच्यावतीने करण्यात आला. शामल शिंदे यांनी क्रीडा क्षेत्रात घेतलेल्या कठोर परिश्रम व दिलेल्या भरीव योगदानाबद्दल हा क्रीडा भूषण पुरस्कार दिला आहे. त्या सध्या पुनावळे येथील अधिरा इंटरनॅशनल स्कूल या शाळेत क्रीडा शिक्षिका म्हणून कार्यरत आहे.






सोलापूर
# दिनांक
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## कुरुहिनशेट्टी समाज जत्रा कमिटीच्या अध्यक्षपदी राजू काकी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

गुरुवार पेठ येथील श्री कुरुहिनशेट्टी ज्ञाती संस्थेच्या जत्रा कमिटीच्या अध्यक्षपदी राजू काकी यांची एकमताने निवड करण्यात आली.



या समाजाचे कुलदैवत श्री नीलकंठेश्वर यांचा रथोत्सव (जत्रा महोत्सव) शनिवार दिनांक १७ ऑगस्ट रोजी साजरा होणार आहे. यासाठी जत्रा कमिटीच्या पदाधिकाऱ्यांची निवड कुरुहिनशेट्टी ज्ञाती संस्थेचे प्रेसिडेंट नारायण संगा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत करण्यात आली. यावेळी जत्रा कमिटीच्या अध्यक्षपदी राजू काकी यांची एकमताने निवड करण्यात आली. अन्य पदाधिकारी पुढीलप्रमाणे आहेत. उपाध्यक्ष दीपक गणपा, वीरेश गडगी, सचिव इरेश काकी, सहसचिव विलास गडगी, खजिनदार अमित मादगुंडी, सहखजिनदार अंबादास काकी, मिरवणूकप्रमुख मोहन कर्रे इत्यादी. या बैठकीला ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष डॉ. कृष्णाहरी मादगुंडी, उपाध्यक्ष ड. सिद्धेश्वर बुगडे, सचिव प्रा.संजय बुगडे, सहसचिव श्रीनिवास गडगी, खजिनदार श्रीनिवास जोगी, सदस्य शिवानंद मादगुंडी, प्रभाकर गोरंटी, व्यंकटेश बुट्टा, गिरीश कामुर्ती, श्रीनिवास गडगी आदी उपस्थित होते.

# शहर काँग्रेस विमुक्त जाती, भटक्या जमाती विभागाच्या शहराध्यक्षपदी युवराज जाधव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

सोलापूर शहर काँग्रेस विमुक्त जाती व भटक्या जमाती विभागाच्या शहराध्यक्षपदी युवराज जाधव यांची निवड करण्यात आली. त्यांचे निवडीचे पत्र खासदार प्रणिती शिंदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.



अनेक वर्षापासून युवराज जाधव हे काँग्रेस पक्षामध्ये सक्रिय असून प्रामाणिक आणि एकनिष्ठपणे काम करत आहेत. खासदार प्रणिती शिंदे यांच्या तीनही विधानसभा निवडणुकांमध्ये तसेच लोकसभा निवडणुकीत आपल्या भागातून जाधव यांनी चांगले मताधिक्य दिले होते. माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, खासदार प्रणिती शिंदे, सोलापूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे यांच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस विमुक्त जाती व भटक्या जमाती विभागाचे अध्यक्ष अ‍ॅड. पल्लवी बाळकृष्ण रेणके यांनी सोलापूर शहर काँग्रेस विमुक्त जाती व भटक्या जमात विभागाच्या अध्यक्षपदी युवराज जाधव यांची निवड केली आहे.

### न्याय हक्क मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू

काँग्रेस पक्षात गेल्या पंधरा वर्षांपासून कार्य करत आहे. पक्षात विमुक्त जाती व भटक्या जमाती विभागातील अनेक विमुक्त आणि भटक्या समाजासाठी विशेषत्वाने अनेक वर्षांपासून कार्य करत आहे. हे कार्य असेच सुरू ठेवणार आहे. या जमातीसाठी गृहनिर्माण प्रकल्प राबवण्याचा प्रयत्न सुरू असून त्याद्वारे समाजाला घरे मिळवून देऊ. त्याचप्रमाणे या सामाजातील मुले शिक्षणापासून वंचित आहेत, अशा मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्नशील आहे. तारेच्या कुंपणातील नऊ समाजाचा विकास करणे हेच ध्येय राहील

**- युवराज जाधव**












सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ८६१

**हां गा सूर्य काय शिळा । अग्नि म्हणों येत आहे वोंविळा ।**
**कां नित्य वाहतया गंगाजाळा । पारसेपण असे ॥**

श्रीकृष्णांचा खऱ्या अर्थाने परीचय झाल्यामुळे, अर्जुन आता श्रीकृष्णाच्या विशेष विभूती जाणून घेऊ इच्छित आहे. हे विश्व म्हणजेच परमात्मा असे जर मी समजून बसलो, तर मला चिंतनच घडणार नाही. म्हणून प्रभो, आपण आपले विभूतीस्वरुप आणि पदार्थभाव अशा प्रकारणे विभूती सांगाव्यात. आपल्या विभूती आपण मला सांगीतल्या आहेतच. तरी पण आपण त्या विभूती मला पुन्हा सांगाव्यात. पण प्रभो आपणाला असे वाटू देऊ नका की, त्याच विभूती पुन्हा-पुन्हा काय सांगाव्यात. प्रभू आपल्या विभूती ऐकल्यानंतर त्या ऐकण्याने जन्ममृत्यूची भाषा समूळ हरपून जाते आणि अंतर्बाहय आत्मानुभवाचे महासुख वाढते. पुन्हा-पुन्हा विभूती सांगीतल्या तरी त्या ऐकाव्याच वाटतील, हे सांगतांना अर्जुन म्हणाला,



**हां गा सूर्य काय शिळा । अग्नि म्हणों येत आहे वोंविळा ।**
**कां नित्य वाहतया गंगाजाळा । पारसेपण असे ॥**

अर्थात, सूर्योदय रोजरोज होतो म्हणून त्याला कोणी शिळा म्हणतो का ? सर्वांना पावन करणा-या अग्नीला आता अग्नी ओवळा झाला, असे कोणी म्हणेल का ? किंवा अखंडपणे वाहणा-या गंगाजळाला पारसेपणाचा म्हणून दोष देता येईल का ? अर्जुनाने निर्माण केलेल्या प्रश्नामुळे भगवंताना खूप आनंद वाटला. खरे म्हणजे अर्जुन हा भक्तिज्ञान पिकविण्याचा मळाच आहे, असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. अर्जुनाची, श्रीकृष्णांच्या विभूती जाणून घेण्याची इच्छा पाहून भगवंत म्हणाले, अर्जुना माझ्या विभूती इतक्या अनंत आहेत की, त्या माझ्या स्वत:च्या मतीला सुध्दा आकलन होणे कठीण आहे. अंगावर जेवढे केस आहेत, त्यापेक्षाही माझ्या जास्त विभूती आहेत. तरीपण तुझ्या समाधानासाठी कांही विभूती मी सांगतो असे म्हणून भगवंत बोलू लागले. भूतांच्या ठिकाणी असणारा आत्मा, भूतांच्या आंत बाहेरचे आवरण तसेच भूतांचा आरंभ, मध्य, शेवट, आकाश, सुर्य, वेद, ज्ञानशक्ती कुबेर, अग्नी, पर्वत, बृहस्पती, पिंपळवृक्ष, उच्चै:श्रवा, ऐरावत, कामधेनू, अनंत, वरुण, गरुड, सिंह, श्रीराम, मकर, जान्हवी इत्यादी सर्व आपल्याच विभूती आहेत. वस्त्रामध्ये उभे आडवे धागे म्हणजे एकच सुत असते, त्याप्रमाणे या सृष्टीमध्ये उत्पत्ती , स्थिती आणि नाश अशा तिन्ही अवस्था मध्ये आपणच भरल्याचे भगवंतानी सांगीतले. भगवंताच्या या विभूती सांगण्याचा हाच हेतू आहे की, आपण नाही असे ठिकाणच नाही. सर्व प्राणीमात्रांत आपणच आहोत. सर्व प्राणीमात्र एका ईश्वरापासूनच उत्पन्न झालेली आहेत. सर्व प्राणीमात्राना समान लेखावे. हा लहान-मोठा असा कसलाच भेद माणसांनी करु नये. ज्याला भूतमात्रांत भेद दिसतो, तो भगवंताला जाणूच शकत नाही. अशा भेद पाहणा-यांना आत्मसुख किंवा आत्मज्ञान मिळूच शकत नाही. दगडा-धोंडयात परमेश्वराला पाहा अथवा न पाहा पण किमान चालत्या-बोलत्या जीवमात्रामध्ये तरी ईश्वराला पाहून त्याची सेवा केली तरी भरपूर होईल. भगवंताच्या विभुती वरुन आपण भगवंताला सर्व प्राणी मात्रात पाहण्याचा धडा घेतला तरी पुरेसे होईल. संतमहात्म्यानी सुध्दा सर्व प्राणीमात्रांतच ईश्वराला पाहुन त्याची सेवा केल्याची अनेक उदाहरणे आपणाला वाचायला ऐकायला मिळतात.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : गुरुवार
दि. १५ ऑगस्ट २०२४
विक्रम संवत् २०८०,
शके - १९४६
संवत्सर - क्रोधी नाम
मास - श्रावण
शु. दशमी (१०.२६)
ऋतु - वसंत
नक्षत्र- ज्येष्ठा (१२.५२)
योग - वैधृति (१४.५७)
करण - वणिज (२२.०८)
सुर्योदय - ०६.२२
सूर्यास्त - १९.०४
दिनविशेष - स्वातंत्र्यदिन, पारशी नूतन वर्ष.

....राहू काल....
रविवार : दु.४.३० ते ६.००
सोमवार : स. ७.३० ते ९.००
मंगळवार : दु. ३ ते ४.३०
बुधवार : दु. १२ ते १.३०
गुरुवार : दु. १.३० ते ३.००
शुक्रवार : स.१०.३० ते १२
शनिवार : स. ९ ते १०.३०

### राशीभविष्य

**मेष :** सामाजिक कार्यांमुळे सुयश आणि सन्मान मिळू शकेल. मित्रांच्या सहकार्याने कामे पूर्ण होतील. उद्योगधंदा चांगला चालेल.वैवाहिक जीवनात भावनात्मक समस्या राहू शकतात.

**वृषभ :** कामकाजाची गती मध्यम राहील.लहान:मोठया अडचणींचा सामना करावा लागेल. थकित पैसे मिळण्यास अडथळे येतील. थकवा जाणवेल.पूजा:पाठात मन रमेल.

**मिथुन :** नवीन कामकाजांचे योग प्रबळ आहेत.कौटूंबिक समस्या राहू शकतात. आर्थिक परिस्थितीत सुधार होण्याची शक्यता आहे. व्यवसायात प्रगती होईल. प्रवास सुखात होईल.

**कर्क:** बुद्धि आणि मनोबलाने सुख:संपन्नतेची परिस्थिती बनेल. आळस सोडून द्या. कायदेशीर प्रकरणे सुधारतील.उद्योगधंदा फायदेशीर राहिल.

**सिंह :** काम करण्याच्या पद्धतीत सुधारणा होईल. आपली महत्वकांक्षा पूर्ण होईल. विरोधकांपासून सावधानी बाळगा.

**कन्या:** कौटूंबिक सुख आणि आर्थिक अनुकूलतेमुळे मन प्रसन्न राहिल. जमीन, वाहन, यंत्र इत्यादी पासून लाभ होऊ शकेल.

**तुळ :** अगोदर केलेल्या कामाचा चांगला परिणाम दिसण्यास सुरूवात होईल. बुद्धीमत्तेवर अडचणींवर मात कराल. नोकरीमध्ये अधिकाऱ्यांची मदत मिळेल.

**वृश्चिक:** व्यापाराच्या विस्तारासाठी केलेले प्रयत्न यशस्वी होतील. आर्थिक स्थिती चांगली राहील. धैर्य व सहनशिलता ठेवा. कौटुंबिक वातावरण चांगले राहील.

**धनु:** यश मिळाल्याने उत्साह वाढेल. श्रेष्ठ लोकांच्या भेटी होतील. नवीन योजनेमुळे फायदा होईल. आरोग्याची काळजी घ्या.

**मकर:** मानसिक तनावापासून सुटका मिळेल.उद्योगधंदा ठीक चालेल.योजनेनूसार कामे केल्यास लाभ होऊ शकेल. वैवाहिक जीवन आंनदी राहिल.

**कुंभ :** कौटुंबिक वातावरण उत्साहपूर्वक राहील. व्यापार व्यवसाय चांगला चालेल. आर्थिक योग चांगले आहेत. चांगल्या व्यक्तिंचा संबध येईल.

**मीन :** मुलांच्या कामा संदर्भात चांगली बातमी मिळेल. चैनीच्या वस्तु खरेदी करण्याचा योग आहे. प्रयत्नामुळे अडचणी दूर होतील. दुसऱ्यांच्या बोलण्याकडे लक्ष देऊ नका.

# 'अन्नपूर्णा' पात्र कुटुंबांना मिळणार मोफत तीन गॅस सिलेंडर

## लाडकी बहीण योजनेतील पात्र लाभार्थ्यांना ८३० चे अनुदान

**निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

महाराष्ट्र राज्य शासनाने दि. ३० जुलै २०२४ रोजी मुख्यमंत्री अन्नपुर्णा योजना अंमलात आणली आहे. या योजनेंतर्गत राज्यातील प्रधानमंत्री उज्वला योजना व मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेतील पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळणार आहे. तरी जिल्ह्यातील सर्व गॅस वितरकांनी त्यांच्याकडे नोंद असलेल्या परंतु ईकेवायसी न झालेल्या महिलांचे ई केवायसी त्वरित करून घ्यावे, असे निर्देश उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात या योजनेच्या अनुषंगाने आयोजित आढावा बैठकीत श्रीमती कुंभार बोलत होत्या. यावेळी जिल्ह्यातील HPCL BPCL IOCL यांच्या सेल्स ऑफिसर व जिल्हा महिला बालविकास अधिकारी आर.बी. काटकर, जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे उपस्थित होते. या योजनेंतर्गत पात्रा लाभार्थ्यांना वर्षातून ३ गॅस सिलेंडर रिफिल मोफत मिळणार आहे. त्यासाठी लाभार्थ्यांनी आगोदर स्वखर्चाने गॅस सिलेंडर रिफील करावे व त्यानंतर लाभार्थ्यांच्या बँक खात्यात शासनाचे गॅस कंपनीकडून अनुदान वर्ग करण्यात येणार आहे. त्यानुसार सोलापूर जिल्ह्यातील खालील लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे.

मुख्यमंत्री उज्वला योजना लाभार्थी संख्या १ लाख ६९ हजार ३४, गॅस सिलेंडर रिफील किंमत ८३०, (अनुदानाचे स्वरूप ३०० रूपये केंद्र सरकार व ५३० राज्य सरकार). मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेमध्ये सोलापूर जिल्ह्यामध्ये ५ लाख ८६ हजार ५०९ लाभार्थी पात्र ठरले आहेत. सदर पात्र लाभार्थ्यांचा डेटा पडताळणी करून महिलांचे नावे गॅस कनेक्शन असणाऱ्या लाभार्थ्यांना ही मुख्यमंत्री अन्नपुर्णा योजनेचा लाभ मिळणार आहे.

ई-केवायसी प्रक्रिया शिल्लक असलेले लाभार्थ्यांनी गॅस एजन्सीत जाऊन माहे ऑगस्ट-२०२४ अखेर ई-केवायसी पुर्ण करून घ्यावी अन्यथा लाभार्थ्यांना लाभ देणेस अडचण उदभवु शकते. ई-केवायसी प्रक्रिया लाभार्थ्यांना आपल्या गॅस एजन्सी मार्फत करता येणार असून ते पुर्णपणे मोफत करण्यात येणार आहे. तरी याबाबत लाभार्थ्यांना काही अडचण असल्यास जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालय, सोलापूर या कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी केले आहे.

# बालवाडी शिक्षिका व सेविकांचे थकीत मानधन द्या

## बालवाडी शिक्षिका व सेविका महिला कर्मचारी संघटनेचे मागणी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

महापालिकेकडील बालवाडी शिक्षिका व सेविकांचे थकीत मानधन द्यावे. मानधनात एक हजार रुपयांनी वाढ करावी आदी मागण्यांचे निवेदन बालवाडी शिक्षिका व सेविका महिला कर्मचारी संघटना मनपा प्राथमिक शिक्षण मंडळ सोलापूरच्या वतीने उपायुक्त तैमूर मुलाणी यांना देण्यात आले.

महानगरपालिकेच्या शाळा बंद पडत चालल्या होत्या तेव्हा १९८५ मध्ये समाज मंदिर मध्ये चालणाऱ्या बालवाड्या शिक्षण मंडळास जोडल्या. बंद पडणा-या शाळेचा पट वाढवणे, पटसंख्या टिकवणे यात बालवाडी शिक्षिका व सेविकांचा वाटा आहे. सुरुवातीला बालवाडी कर्मचाऱ्यांच्या मानधनात १ हजार रुपयांची वाढ करावी, असे निवेदनात म्हटले आहे. यावेळी राज्य अध्यक्ष शंतनू गायकवाड, गणेश अंजिखाने, रामेश्वरी बेरूणगी, अंजली कोळी, जगदेवी तोडकरी, लता शिंदे, परवीन बेलीफ, लक्ष्मी भीमर्थी, विद्या साखरे, नाझिया कोटी, शुभदा पवार, अंजली नागणे, रईसा मेगेरी आदी उपस्थित होते.

# २६५ कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेच्या लाभाचे आदेश

## आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांत आनंदाचे वातावरण




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

जिल्हा परिषद आरोग्य विभागातील २६५ कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेच्या लाभाचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांच्या स्वाक्षरीने निर्गमित झाले आहेत. अनेक दिवसांपासूनची प्रलंबित मागणी पूर्ण झाल्याने आरोग्य कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

आश्वासित प्रगती योजनेमध्ये औषधनिर्माण अधिकारी-३२, आरोग्य सहाय्यक-१३, आरोग्य सहायिका-२८, आरोग्य सेवक-४३, आरोग्य सेविका- ८०, कुष्ठरोग तंत्रज्ञ-०८ व इतर सेवानिवृत्त कर्मचारी असे एकूण २६५ पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नतीचे आदेश देण्यात आले आहेत.

याकामी आरोग्य विभाग कृति समितीच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांच्याकडे नऊ ऑगस्टपासून प्रलंबित मागण्यासाठी आमरण उपोषणाचा इशारा देण्यात आला होता. याची मनीषा आव्हाळे यांनी तात्काळ दखल घेवून २६५ पात्र कर्मचाऱ्यांच्या फायलीवर स्वाक्षरी केली आहे. आरोग्य विभाग कृति समितीच्यावतीने मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, डॉ. विजय वरवटकर, उत्कर्ष इंगळे, नागेश पाटील, गिरीष जाधव, अनुपमा पडवळे, धनंजय वाळा,विरपक्षय्या स्वामी, अविनाश गोडसे, राजेश देशपांडे, विवेक लिंगराज, दिनेश बनसोडे, सचिन मायनाळ यांचे आभार मानले.

यावेळी संजय उपरे, सी. टी. पवार, समीर शेख, पांडुरंग कोळी, अभिजीत कांबळे, विष्णु सानेपागुल, शिवाजी येडगे, रोहीणी सुगंधी, विजया राऊत, उमेश पाटील, त्रिमूर्ती राऊत, संतोष बुटे, संजय पाटील, काशिनाथ गाडे, इप्तेकार चाऊस उपस्थित होते.




# पाटील अभियांत्रिकीमध्ये ग्रंथपाल दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

ग्रंथालय शास्त्राचे आदयप्रवर्तक म्हणून डॉ. एस. आर. रंगनाथन यांना ओळखले जाते. त्यांचा जन्म १२ ऑगस्ट १८९२ रोजी तत्कालिन मद्रास प्रांतातील तंजावर जिल्हयातील शियाली या गावात झाला हा जन्मदिवस ग्रंथपाल दिवस किंवा राष्ट्रीय पुस्तकालय दिन म्हणून साजरा केला जातो. आज त्यांची १३२ वी जयंती साजरी होत आहे. असे प्रतिपादन ग्रंथपाल श्रीनाथ लोंढे यांनी केले.

ज्ञानाची कवाडं खुली करण्याचा विचार सर्वप्रथम डॉ. एस. आर. रंगनाथ यांनीच रुजवला यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य झिजवले ग्रंथपाल दिनाचे औचित्य साधून वाचक दिन म्हणून ही साजरा करण्यात आला, असे प्रतिपादन डॉ. व्ही. व्ही. पोतदार यांनी केले.

याप्रसंगी संस्थेचे सेकेटरी श्री. एस. ए. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे ट्रस्टी एस. एस. पाटील तसेच कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले, प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार, एजीपीपी आय चे उपप्राचार्य एस .के. मोहिते, कॅम्प्युटर इंजिनिअरींगचे विभाग प्रमुख प्रा. एस. व्ही. कुलकर्णी, मेकॅनिकल इंजिनिअरींगचे डॉ. एस. बी. गडवाल, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकमनिकेशन इंजीनियरिंग विभाग प्रमुख डॉ. आर. व्ही. दरेकर, लायब्ररी कमिटीचे चेअरमन प्रा. पी.एस.स्वामी आणि कमिटी मेंबर्स, विभाग प्रमुख प्रा. टि.डी. मसलेकर, एजीपीपीआयचे ग्रंथपाल एम. एम. आडम उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रा. पी.एस.स्वामी यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी बी. डी. हिरेमठ आणि एस. एस. माड्याळ यांनी विशेष परिश्रम घेतले.




# चित्रकला स्पर्धेत ३० शाळांमधील २८० स्पर्धकांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

सहकार महर्षी कै. वि.गु. शिवदारे स्मृती समारोह निमित्त डी. एस. टी. एस. मंडळ संचालित युनिक इंग्लिश मीडियम स्कूलच्या वतीने सोलापूर शहर पातळीवरील आंतरशालेय चित्रकला आणि रंगभरण स्पर्धेस विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला. यामध्ये विविध ३० शाळांमधील २८० स्पर्धकांनी सहभाग नोंदवला.

जुळे सोलापुरातील युनिक इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्रांगणात ही स्पर्धा पार पडली. कला व्यवसाय केंद्राचे मुख्याध्यापक गोपाल डोंगे यांच्या हस्ते आकाशात फुगे सोडून व दीपप्रज्वलनाने या स्पर्धेचे उद्घघाटन करण्यात आले. यावेळी शैक्षणिक सल्लागार अंजली तिवारी, सदस्या डॉ. शुभदा उपासे, डी फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. वाय. पाटील, प्राचार्य डॉ. डी. एस. सुत्रावे, प्राचार्य श्रुती गायकवाड, प्राचार्य डॉ. कापसे, मुख्याध्यापिका पूजा बाजपाई आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.संस्थेचे संस्थापक राजशेखर शिवदारे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. सूत्रसंचालन विद्यार्थिनी शुभ्रा चव्हाण हिने केले तर तन्मय वनवे यांनी आभार मानले.

# नागरी समस्या सोडवून आंदोलकांवरील गुन्हा मागे घ्या

## उपायुक्तांना निवेदन; महापालिका मुख्य प्रवेशद्वारावर पोलिसांचा बंदोबस्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

नागरी समस्या तातडीने सोडवाव्यात तसेच सोमवारच्या आंदोलन प्रकरणी दाखल गुन्हा मागे घ्यावा या मागणीचे निवेदन मातोश्री रमाई आंबेडकर नगरातील नागरिकांनी मंगळवारी महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांना दिले. दरम्यान, या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या मुख्य प्रवेशद्वारावर पोलिसांचा तगडा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



सोमवारी महापालिका आवारात नागरिक समस्यांबाबत आयुक्तांनी वेळ न दिल्याने ड्रेनेजचे घाण पाणी आयुक्तांच्या गाडीवर टाकण्याचा प्रकार घडला होता. त्यानंतर संबंधित आंदोलकांवर गुन्हा दाखल करण्यात आला. मंगळवारी रमाई आंबेडकर नगरातील नागरिकांनी महापालिकेत उपायुक्त आशिष लोकरे यांना भेटून नागरी समस्या वेळेत न सोडवल्याने आंदोलकांनी संतप्त प्रतिक्रिया उमटली आहे. आंदोलनाबाबत सहानुभूतीने विचार करून त्यांच्यावर दाखल करण्यात आलेला गुन्हा मागे घ्यावा व रमाई आंबेडकर नगरातील ड्रेनेज पाणी व स्वच्छता आदी समस्या तातडीने सोडवाव्यात अशा मागणीचे निवेदन दिले.

यावेळी उपायुक्त आशिष लोकरे यांनी तातडीने रमाई नगरातील सर्व समस्या सोडवण्याचा प्रयत्न करू व आंदोलकांवरील गुन्हासंदर्भातील मागणीबाबत महापालिका आयुक्तांशी चर्चा करण्यात येईल, असे आश्वासन नागरिकांना दिले. यावेळी धर्मेंद्र मैंदर्गीकर, क्रांतीकुमार महिंद्रकर, संतोष माने यांच्यासह रमाई आंबेडकर नगरातील महिला उपस्थित होत्या.

## बांधकाम कामगारांना संसारोपयोगी साहित्य वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

शासनाच्या योजने अंतर्गत बांधकाम कामगारांना संसार उपयोगी साहित्यांचे वितरण व्यवस्था करण्यात आली आहे. पालकमंत्री आ विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते वडार गल्ली येथे बांधकाम कामगारांना संसारोपयोगी साहित्य वाटप केले.

सोलापूर शहरातील बांधकाम कामगारांना आमदार विजयकुमार देशमुख यांनी विनायक विटकर यांनी महिला भगिनींसाठी संसार उपयोगी साहित्य कामगारांना मोफत घरपोहच देण्याचा उपक्रम स्तुत असल्याचे त्यांनी मनोगतात व्यक्त केले. याप्रसंगी नगरसेवक विनायक विटकर, सामाजिक कार्यकर्ते राजू हौशेट्टी, कामटे विचारमंचचे योगेश कुंदूर, युवा नेते अश्विन पाथ्रुडकर, देवीदास इरकल, वैभव मुद्दे, योगेश अलकुंटे, अनिल शिंगाडे, अमृत कंदलगावकर, नागेश अलकुंटे, सचिन अलकुंटे, पंकज विटकर, मनोज विटकर, विनायक कुलकर्णी आदींसह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# नोडल अधिकाऱ्यांकडून जिल्ह्यातील कामांची पाहणी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

जिल्ह्यात जलशक्ती अभियाना अंतर्गत नारीशक्तीचे जलशक्ती हे ब्रीद घेऊन मोठ्या प्रमाणावर जलसंधारणाचे कामे करण्यात येणार आहेत त्या अनुषंगाने विविध कामाचा संपूर्ण जिल्ह्याचा एक शास्त्रीय पद्धतीने आराखडा सादर करण्याबाबत केंद्रीय नोडल अधिकारी राकेश कुमार मीना यांनी जलसंधारण विभागाला सुचित केलेले आहे. आज श्री मीना यांनी पोखरापूर येथील रिचार्ज शॉफ्ट, खवणी येथील नाला खोलीनीकरणाचे काम, सोलापूर शहरातील सिद्धेश्वर वनविहार मियावाकी पद्धतीचे वृक्ष लागवड काम तसेच सोलापूर शहरातील फ्लोरा हाऊसिंग सोसायटीच्या रेन वॉटर हार्वेस्टिंग स्ट्रक्चरचे काम या सर्व कामाची पाहणी करून अनुषंगिक मार्गदर्शक सूचना दिल्या.

जिल्ह्यात जलसंधारण विभागांने अमृत सरोवर योजनेअंतर्गत दिलेल्या ७५ सरोवर दुरुस्तीच्या कामाव्यतिरिक्त खूप मोठ्या प्रमाणावर कामे करून अनेक जुनी सरोवरे पाणी साठवण योग्य केलेली आहेत. त्यातील अनेक कामांची पाहणी केंद्रीय नृढ अधिकारी श्री मीना व केंद्रीय तांत्रिक अधिकारी श्रीमती पुर्णिमा बाराहाते यांनी करून या कामाबद्दल समाधान व्यक्त केले. याच पद्धतीने सर्व जलसंधारणाचे कामे पूर्ण केल्यास सोलापूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर जलसंवर्धन होऊन पुढील काळात हा जिल्हा जलयुक्त होण्यास मदत होईल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या पाहणी दौऱ्यात जिल्हा जलसंधारण अधिकारी दयासागर दामा व जलसंधारण विभागाचे अन्य अधिकारी उपस्थित होते.




# भारतीय हिंदराज सेना तर्फेबेलाटी येथील बाळूमामा मंदिरास रोपांचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ ऑगस्ट-**

सभारतीय हिंदराज सेनेने सोलापुर व धाराशिव जिल्ह्यात रोपांचे वाटप सूरू केले आहे. बेलाटी येथील बाळूमामा मंदिरास रोपांचे वाटप केले यावेळेस बाळूमामाच्या नावाने चांघभले नारा देत याचे वाटप झाले. यावेळी भारतीय हिंदराज सेनाचे धारासिंह राजपूत, आयोजक समिती चेअरमन हणमंराव पाटील, पुजारी सूनील काटकर, वीणेकरी, विजय वाघमोडे, शेंडगे, सूनीता पाटील, सूगंधा गूजरे, समर्थ गुजरे, देवीदास कजागवाल, अरबाज शेख, सूनील सरवदे, राजू गायकवाड़ आदी उपस्थित होते

# अक्कलकोट विधानसभेवर राष्ट्रीय समाज पक्षाचा दावा

## प्रदेशाध्यक्ष काशिनाथ शेवते : बुथ प्रमुखांचा मेळावा, महायुतीकडे जागा मागणार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १४ ऑगस्ट-**

अक्कलकोट विधानसभेची जागा राष्ट्रीय समाज पक्षाला सोडण्यात यावी यासाठी महायुतीकडे मागणी करणार असल्याचे मत राष्ट्रीय समाज पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष काशिनाथ नाना शेवते यांनी राष्ट्रीय समाज पक्ष आयोजित अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील बुथप्रमुखांचा मेळावा अक्कलकोट येथे गुरुवारी सर्जेराव जाधव सभागृह येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते बोलत होते.

यावेळी मुख्य महासचिव ज्ञानेश्वर उर्फ माऊली नाना सलगर, पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष सुनील बंडगर, पश्चिम महाराष्ट्र युवक आघाडीचे अध्यक्ष तथा निरीक्षक अजितकुमार पाटील, सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष परमेश्वर पुजारी, यशवंत सोंडगे, सोलापूर शहर अध्यक्ष सतीश बुजूरके आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात अण्णा साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतीमेला पुष्पहार अर्पण करुन सुरुवात केली. प्रारंभी



उपस्थित मान्यवरांचा सत्कार अक्कलकोट तालुका व शहर कार्यकारिणीच्या वतीने करण्यात आले. यावेळी अक्कलकोट तालुका अध्यक्ष पदी दत्तात्रय माडकर, सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष सुरेश गुत्तेदार,अक्कलकोट तालुका युवक आघाडी अध्यक्ष दाजी कोळेकर, अक्कलकोट शहर अध्यक्ष स्वामीराव घोडके,अक्कलकोट शहर युवक आघाडी अध्यक्ष निलेश लवटे, अक्कलकोट महिला आघाडी तालुका अध्यक्ष अनिता घोडके, अक्कलकोट तालुका अल्पसंख्याक आघाडी अध्यक्ष मोहमद शफीक जमादार, तालुका उपाध्यक्ष महादेव पुजारी, विश्वनाथ बंदिछोडे, तालुका सरचिटणीस गजानन हिळ्ळी, युवक आघाडी उपाध्यक्ष संतोष शिंदे, उपाध्यक्ष सद्दाम तासेवाले यांची नियुक्ती करण्यात आली. यावेळी बोलताना प्रदेशाध्यक्ष काशिनाथ शेवते म्हणाले, जातीनिहाय जनगणना झाली पाहिजे तसेच ओबिसीच्या आरक्षणासाठी दिल्ली येथे जंतर मंतर मैदानात महादेव जानकर यांच्या नेतृत्वाखाली भव्य मोर्चा काढण्यात आला होता. शेतकऱ्यांना दिवसा बारा तास विज मिळाली पाहिजे या मागण्या भाजपला मान्य करायला राष्ट्रीय समाज पक्षाने भाग पाडले.

प्रमुख अतिथी म्हणून प्रदेश मुख्य महासचिव ज्ञानेश्वर उर्फ माऊली सलगर बोलताना म्हणाले की येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय समाज पक्ष महाराष्ट्रातील १०९ विधानसभा मतदारसंघात तयारी करीत असून त्याअनुषंगाने अक्कलकोट विधानसभा राष्ट्रीय समाज पक्षाची बुथ बांधणी तसेच पक्षसंघटन वाढविण्यासाठी प्रत्येक विधानसभा मतदारसंघात पक्षीनिरीक्षक नेमण्यात आले असून त्याचा आढावा पक्षश्रेष्ठींकडे पाठविण्यात येत आहे. या मेळाव्यास पुंडलिक पुजारी, दत्ता बंडगर, अप्पू हक्के, रेवणसिध्द शेरी, रवी सलगरे, शालम आमलीचुंगे, सचिन पांढरे,औदुंबर बंडगर, गंगाराम खांडेकर, तिपण्णा घोडके, बिरु माने, अशोक बंदिछोडे, विजय साखरे, शंकर कोकरे, भिमाशंकर बंदिछोडे, गजानन कोरे, विठोबा कोळेकर, यासीन शेख, मडोळय्या स्वामी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सूत्रसंचालन तालुका अध्यक्ष दत्तात्रय माडकर यांनी केले तर आभार प्रदर्शन तालुका युवक आघाडी अध्यक्ष दाजी कोळेकर यांनी केले.

### सप्टेंबरमध्ये महादेव जानकरांच्या सभा

सप्टेंबर महिन्यात संपूर्ण राज्यात पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांची सर्व जिल्ह्यात सभा घेण्याचे नियोजन चालू असून लवकरच जानकर साहेब यांची तारीख घेऊन अक्कलकोट तालुक्यात जाहीर सभेचे आयोजन करण्याची सूचना निरीक्षक यांना दिली. राष्ट्रीय समाज पक्ष सध्या महायुतीत सामील असला तरी पक्षाच्या वतीने महाराष्ट्रातील काही विधानसभा मतदारसंघात मेळावे, बुथ बांधणी, पदाधिकारी नियुक्तीचा कार्यक्रम आयोजित करण्यात येत असल्याचे सांगितले.

## बीएसएनएलने सातत्यपूर्ण, दर्जेदार सेवा द्यावी

### अशोक कामटे संघटनेची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १४ ऑगस्ट-**

बीएसएनएलने सातत्यपूर्ण, दर्जेदार सेवा द्यावी वारंवार ही सेवा खंडित, विस्कळीत होत आहे. या मागणीचे निवेदन केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांना देण्यात आल्याची माहिती शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेच्यावतीने देण्यात आली.



संपूर्ण भारतात खाजगी टेलिकॉम कंपन्यांचे रिचार्जचे दर दुप्पट वाढल्याने सामान्य नागरिक-ग्राहक बीएसएनएलच्या सेवेकडे पुन्हा आकर्षित झाला आहे. पण पूर्ण क्षमतेने देशभरातही सेवा मिळत नसल्याने जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील,ग्रामीण भागातील नेटवर्क अपुरे पडत आहे. कॉल ड्रॉप होणे, त्यातच महाराष्ट्रातील ग्रामीण भागात अनेक टॉवर बंदस्थितीत असल्याने रेंज मिळत नाही. इंटरनेट सेवेचा बोजवारा उडत आहे. त्यामुळे सर्वसामान्य लोकांची शासकीय योजनांची कामे इंटरनेट अभावी ठप्प होत आहेत. त्याचा दैनंदिन जीवनावर परिणाम होत आहे. दरमहा टेलिफोनच्या आकारणी रिचार्ज व इतर भाडे ग्राहकांना सुरू आहे. नेटवर्क नसल्याने समस्या वाढत आहेत.या बीएसएनएल कंपनीच्या नवीन जोडणी, सिम कार्डला देश, राज्यसह सोलापूर जिल्ह्यात ग्राहकांची मागणी वाढली आहे. त्यामुळे महिन्याभरात बीएसएनएलची ग्राहक संख्याही वाढली आहे. या कंपनीची अपुरी यंत्रणा व नियोजनाचा अभाव यामुळे नेटवर्क वारंवार खंडित होत आहे. या कामी संबंधित सोलापूर बीएसएनएलच्या अधिकारी, विभागास आदेश देऊन ही सेवा सातत्यपूर्ण व दर्जेदार द्यावी अशी ग्राहकांची मागणी होत आहे, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या निवेदनाच्या प्रती विभागीय जनरल मॅनेजर, भारतीय संचार निगम लिमिटेड पुणे, सोलापूर, चेतनसिंह केदार-सावंत यांनाही देण्यात आल्या आहेत.

अशोक कामटे संघटनेचे निवेदन मिळाले असून या संदर्भात केंद्रीय दूरसंचार मंत्री, बीएसएनएलच्या वरीष्ठ अधिकारी यांच्याशी संपर्क साधून दर्जेदार सेवा देण्याविषयी सूचना केली आहे. सर्व सामान्य लोकांचा जिव्हाळ्याचा प्रश्न संघटनेने वाचा फोडल्याने तात्काळ सुधारणा होऊन सदरचा विषय मार्गी लावणार. **- चेतनसिंह केदार-सावंत,**
सदस्य, सोलापूर जिल्हा टेलिफोन सल्लागार समिती



## कवठेकर प्रशालेत स्मरणिका, काचफलक, अत्याधुनिक दूरचित्रवाणी संचाचे अनावरण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १४ ऑगस्ट -**

पंढरपूर एज्युकेशन सोसायटीची कवठेकर प्रशाला ही सतत विद्यार्थीभिमुख व नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात अग्रेसर असते.त्याचाच एक भाग म्हणून सोमवारी (ता.११) या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रशालेचे मुख्याध्यापक व्ही. वाय.पाटील यांनी करून विद्यार्थ्यांच्या अंगभूत गुणांचा विकास होण्यासाठी या उपक्रमांची गरज प्रतिपादित केली. नुकत्याच महाराष्ट्र शासन पुरस्कृत शिक्षण सप्ताहास विद्यार्थ्यांच्या अलोट प्रतिसादात संपन्न झालेल्या विविध उपक्रमांनी संपन्न झाला. या बरोबरच प्रशालेचे ज्येष्ठ शिक्षक श्री. राजुरकर व श्री. गुरव यांनी अत्यंत अभ्यासपूर्वक तयार केलेल्या आकर्षक स्मरणिकेचे देखील प्रकाशन पंढरपूर एज्युकेशन सोसायटीचे मानदसचिव सु.र.पटवर्धन व पंढरपूर नगरपालिका शिक्षण विभागाचे समन्वयक श्री. बोडरे यांच्या हस्ते संयुक्तपणे करण्यात आले.विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या कविता, लेख,चित्रकला, एकांकिका किंवा अनेक प्रहसने यांच्या आविष्कारास एक समर्थ व्यासपीठ मिळावे म्हणून प्रशालेच्या प्रत्येक विविध मजल्यांवर आकर्षक अशी सहा काचफलके त्याचबरोबर पुणे रोटरी क्लब पुणे यांच्यातर्फे ४३ इंची अत्याधुनिक,शैक्षणिक सुविधांनी युक्त असा अँड्रॉइड दूरचित्रवाणी संच पंढरपूर एज्युकेशन सोसायटीचे मानद सचिव सु.र.पटवर्धन यांच्याहस्ते विद्यार्थ्यांना समर्पित करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांसमोर केलेल्या आपल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी आधुनिक जगात विद्यार्थ्यांना सर्वांगीण ज्ञान मिळविण्यासाठी आपल्या आवडी,छंद व विज्ञान जोपासून यांच्याशी जवळीक केलीच पाहिजे असे प्रतिपादन केले.

यावेळी पंढरपूर एज्युकेशन सोसायटीचे पदाधिकारी एस. पी. कुलकर्णी, पर्यवेक्षिका एस. आर. कुलकर्णी तसेच शिक्षक-पालक संघाचे उपाध्यक्ष अमोल घाटे उपस्थित होते. कार्यक्रमाचा समारोप ज्येष्ठ पर्यवेक्षक एस. एस. रुपनर यांच्या आभार प्रदर्शनाने झाला.



## आ. बबनराव शिंदे यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. १४ ऑगस्ट-**

आमदार बबनराव शिंदे यांना श्री गणेश ज्येष्ठ नागरिक संघटनेच्या वतीने 'जीवन गौरव' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

श्री स्वामी समर्थ मंगल कार्यालयात मानपत्र, विशेष ट्रॉफी, शाल, श्रीफळ फेटा बांधून 'ज्येष्ठ नागरिक जीवन गौरव' पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी श्री जोतिबा मंदिर आणि स्वामी समर्थ मंदिर परिसरात आमदार शिंदे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.डॉ. अनिल गोळवलकर, सुभाष वेदपाठक,भीमराव मोरे, शिवाजी सुर्वे यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

ज्येष्ठांना पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आले.मोडनिंब एमआयडीसी साठी विशाल मेहता यांचा सन्मान करण्यात आला. १०वी, १२ वीतील यशस्वी विद्यार्थी, गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. जय हनुमान तालीम संघाला दहा लाख रुपये निधी आमदार फंडातून दिल्याबद्दल पैलवानांच्या वतीने आमदार शिंदे यांचा सत्कार करण्यात आला.श्री महालिंगेश्वर मंदिर, श्री खंडोबा मंदिर ट्रस्ट यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.यावेळी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष डॉ. निशिगंधा माळी,माजी सभापती शिवाजी कांबळे, माजी जि. प. सदस्य भारत शिंदे, शंभुराजे मोरे, ज्येष्ठ नागरिक संघटनेचे चंद्रकांत गिड्डे, रमेश मुळीक, भीमराव मोरे, दत्तात्रय सुर्वे, किरण तोडकरी, रविकांत शहा, सतीश शहा यांसह ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण म्हणजे ज्ञानोत्री : मल्लिनाथ कल्याणशेट्टी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १४ ऑगस्ट-**

विद्यार्थ्यांना सर्वंकष ज्ञान मिळावे या उद्देशाने कार्यान्वित करण्यात आलेले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण म्हणजे अखंड ज्ञानसाधनेची ज्ञानोत्री आहे त्यातून विद्यार्थ्यांची ज्ञानसाधना परिपूर्ण होणार आहे असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले



महर्षी विवेकानंद समाज कल्याण संस्था संचलित मातोश्री गुरु बसवा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील प्राध्यापक प्रबोधिनीच्या वतीने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी उद्घाटन कार्यक्रमानंतर ते बोलत होते. व्यासपीठावर प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी, प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे, प्रा. हर्षदा गायकवाड, प्रा. डॉ. बाळासाहेब पाटील उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे यांनी केले. संसाधन व्यक्ती म्हणून प्रा. हर्षदा गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचलन प्रा. डॉ. शितल भस्मे यांनी केले तर आभार प्रबोधिनीचे चेअरमन प्रा. डॉ. बाळासाहेब पाटील यांनी मानले. कार्यक्रमास प्रा. राजेश पवार, भीम सोनकांबळे, प्रा. मनीषा शिंदे, प्रा. मधुबाला लोणारी उपस्थित होते.

# स्पर्धा परीक्षेतील यशामध्ये डीएडचा महत्त्वाचा वाटा

### पीएसआय संजीवनी काळे

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १४ ऑगस्ट-**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी करताना डीएड अभ्यासक्रमाचा मोठा उपयोग झाला. विशेषतः मुलाखत देताना आत्मविश्वासाने सामोरे गेले. जिद्द, चिकाटी व अभ्यासातील सातत्याने स्पर्धेमध्ये यश संपादन करतात येते. तसेच स्पर्धा परीक्षा देताना अपयश आल्यास खचून न जाता नव्या जोमाने पुन्हा प्रयत्न करणे आवश्यक आहे. अभ्यासात सातत्यासाठी जिद्द आवश्यक आहे, असे प्रतिपादन कु. संजीवनी काळे-तिकटे यांनी केले.




पोलीस उपनिरीक्षकपदी निवड झाल्याबद्दल त्या अध्यापिका विद्यालयात आयोजित सत्कार समारंभामध्ये त्या बोलत होत्या. बार्शी येथील बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यापिका विद्यालयामध्ये डीएलएड नवीन प्रवेशित विद्यार्थिनींच्या स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य अनुसया चौगुले होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून संजीवनी काळे-तिकटे व मेजर गजानन तिकटे होते. प्रास्ताविक प्रा. बजरंग वाघमोडे यांनी केले, तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. प्रमोद मांडे यांनी करुन दिला. अध्यापिका विद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी असलेल्या संजीवनी काळे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत कशा प्रकारे यश संपादन केले , परीक्षेची तयारी कशा प्रकारे केली याविषयी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. तसेच स्पर्धा परीक्षाविषयी विद्यार्थिनींच्या प्रश्नांची उत्तरे देखील दिली. यानंतर त्यांचे पती मेजर गजानन तिकटे यांनी देखील आपले विचार व्यक्त केले. जीवनात यशस्वी होण्यासाठी कशा प्रकारे कार्य करावे याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य चौगुले मॅडम यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. पहिल्या सत्राचे आभार प्रा. सुभाष माळी यांनी मानले.

कार्यक्रमाच्या द्वितीय सत्रांमध्ये जून २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या डीएलएड परीक्षांमध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार गुलाब पुष्प व भेटवस्तू देवून करण्यात आला. त्यामध्ये प्रथम वर्षामध्ये प्रथम पाच क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थिनी अनुक्रमे उकिरडे नम्रता, बारंगुळे संजीवनी, देशमुख मयुरी, देशमुख प्रतीक्षा, गायकवाड प्रगती व डोके सानिका तर द्वितीय वर्षामध्ये प्रथम पाच क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थिनी अनुक्रमे परदेशी अंकिता, लंकेश्वर गीता, ताटे श्रुती, घोडके भाग्यश्री व बोराडे अश्विनी यांचा समावेश होता.

### नवप्रवेशित विद्यार्थिनींचे स्वागत

नवप्रवेशित विद्यार्थिनींचे स्वागत द्वितीय वर्षातील विद्यार्थिनींच्या हस्ते गुलाब पुष्प देऊन करण्यात आले. उपस्थित विद्यार्थ्यांना प्रा. सोमनाथ देंडे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या. सूत्रसंचालन प्रा. रतिकांत हामणे यांनी तर आभार प्रा. जीवन लोखंडे यांनी मानले.

## संक्षिप्त वृत्त



### ग्रीनफिंगर्स कॉलेजमध्ये ग्रंथपाल दिन साजरा

**अकलूज, दि. १४ ऑगस्ट-**

ग्रिनफिंगर कॉलेज ऑफ कॉम्प्युटर आणि तंत्रज्ञान महाविद्यालयांमध्ये सकाळी अकरा वाजता डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या जयंतीचे निमित्त पुस्तक प्रदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयातील ग्रंथालयामध्ये करण्यात आले होते. यावेळी सर्व विद्यार्थी तसेच सर्व प्राध्यापक उपस्थित होते कार्यक्रमाची सुरुवात स्वागत गीताने झाली कार्यक्रमाचे प्रमुख उपप्राचार्य डॉ.महेश ढेंबरे सर यांनी डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन केले आणि महाविद्यालयाचे प्रा. कुंभार सर यांनी दीपप्रज्वलन केले.ग्रंथालय हि एक सामाजिक संस्था असून समाजाच्या हितासाठी ग्रंथालयाचे संवर्धन करणे आवश्यक आहे.ग्रंथालयाचे जतन करणारा ग्रंथपालही महत्वाचा घटक आहे. असे प्रतिपादन प्रा.बाळासाहेब क्षीरसागर सर यांनी केले.यावेळी डॉ.पिसाळ सर, साळुंखे सर,चौगुले सर,जोशी सर,पिसे म्याडम,चौगुले म्याडम,वाघमोडे सर उपस्थित होते. महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. कांबळे सर यांनी सदर कार्यक्रमाचे आयोजन केले होते.



### शिवाजी पॉलिटेक्निकमध्ये रक्त तपासणी शिबीर

**सांगोला, दि. १३ ऑगस्ट-**

आरोग्य विभाग,पंचायत समिती, सांगोला व शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेज यांचे संयुक्त विद्यमाने कॉलेजमधील विद्यार्थिनींसाठी रक्त तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती प्राचार्य डॉ. आर.ए. देशमुख यांनी दिली.संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड यांच्या संकल्पनेतून व तालुका आरोग्य अधिकारी डॉ.अविनाश खांडेकरतसेच डॉ. यशोदीप गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सदर रक्त तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या शिबिरांतर्गत ३०० विद्यार्थिनींची मोफत सीबीसी तपासणी करण्यात येणार आहे. शिबिर यशस्वी करण्यासाठी तालुका आरोग्य विभागाच्या लॅब टेक्निशियन ऋतुजा कुलकर्णी,अटेंडंट अमोल बनसोडे परिश्रम घेत आहेत.

### ग्रीनटिन सोल्यूशन्स लिमिटेडला सुवर्ण पुरस्कार

**पंढरपूर, दि.१४ ऑगस्ट-**




ग्रीनटिन सोल्यूशन्स प्रा. लिमिटेडला पाचव्या सीआयआय नॅशनल डिगीटेक सर्कल कॉम्पिटिशन २०२५ मध्ये सेवा क्षेत्र आणि उत्पादनासाठी डिजिटल तंत्रज्ञानातील सर्वोत्तम स्टार्टअपसाठी प्रतिष्ठित सुवर्ण पुरस्कार मिळालेला आहे. हा सन्मान दररोज आमच्या कामात प्रत्येक टीम सदस्याने दाखवलेल्या आवड, सर्जनशीलता आणि वचनबद्धतेला अधोरेखित करतो. हे ग्रीनटिन सोल्यूशन्सच्या नाविन्यपूर्ण आत्मा आणि उत्कृष्टतेच्या सततच्या प्रयत्नांचे प्रतीक आहे. हा पुरस्कार मिळाल्यामुळे आम्हाला खूप आनंद आणि अभिमान आहे, असे ग्रीनटिन सोल्यूशन्सचे सीईओ राजसिंह डुबाल यांनी सांगितले. हे यश आमच्या संपूर्ण टीमच्या कठोर परिश्रम आणि समर्पणाचे प्रतीक आहे. एकत्रितपणे, आम्ही उत्कृष्टतेचा एक नवीन मानक स्थापित केला आहे आणि आम्ही जे साध्य केले.त्याचा मला अभिमान असल्याचेही त्यांनी सांगितले.



### नातेपुतेतील पदाधिकाऱ्यांचा शिवसेनेत प्रवेश

**नातेपुते, दि. १४ ऑगस्ट-**

माळशिरस तालुखाप्रमुख तथा जिल्हा नियोजनसमिती सदस्य सतिश सपकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना शिंदे गट पक्षामध्ये माळशिरस तालुक्यासह पंढरपूर तालुक्यातील कार्यकर्त्यांनी जाहीर प्रवेश केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा निवासस्थानी शिवसेना सचिव तथा पुणे व सोलापूर जिल्हा संपर्क नेते संजय मशीलकर व सतीश सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली प्रवेश कार्यक्रम पार पडला. यावेळी नातेपुते शहर प्रमुख निखिल पलंगे, विनोद लांडगे, गोविंद माने, आकाश प्रल्हाद डबडे, दत्तात्रय कचरे, अनिल चव्हाण, ममता कचरे, नजीर मनेर, आशा चव्हाण, दिगंबर टेसाई, संदीप जाधव, शंतनू पाटील, नगराध्यक्ष म्हाळूग, श्रीपूरचे नगराध्यक्ष अशोक चव्हाण, संजय साठे, बापूराव घोडके, ग्रा. पं. सदस्य कुंडलिक साठे, करोळे, शिवाजी नाईकनवरे, सचिन सारतापे यांनी शिवसेनेत प्रवेश केला.



### विठ्ठल-रुक्मिणीमातेस भाविकाकडून १ लाखाची देणगी

**पंढरपूर, दि. १४ ऑगस्ट -**

पुणे येथील भाविक विठ्ठलराव बाबुराव मेंदनकर यांनी श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीस १ लक्ष १११ रुपयाची देणगी दिली. यावेळी मंदिर समितीच्या वतीने देणगीदार यांचा सत्कार मंदिर समितीचे विभाग प्रमुख पांडुरंग बुरांडे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा व उपरणे देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी मंदिर समितीचे लिपिक योगेश कागदे व देणगीदार यांचे कुटुंब उपस्थित होते.

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पानमंगरुळ येथे २० ऑगस्टपासून राघवेंद्र स्वामी आराधना महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**पानमंगरुळ, दि. १४ ऑगस्ट-**

अक्कलकोट तालुक्यातील पानमंगरुळ येथील श्री राघवेंद्र स्वामी मठात श्री राघवेंद्र स्वामी आराधना महोत्सवास २० ऑगस्ट ते २२ ऑगस्टपर्यंत साजरा करण्यात येणार आहे. या तीन दिवसांत धार्मिक कार्यक्रम होणार आहेत.



१९ ऑगस्ट रोजी सायंकाळी गोपूजा आणि ध्वजारोहण, २० ऑगस्ट रोजी प्रथम आराधना, पहाटे श्रींची भुपाळी, श्रींची स्थापना, पालखी ग्रामप्रदिक्षणा, पवमान अभिषेक, अष्टोत्तर वाचन, श्रींची महाआरती, महानैवेद्य, तीर्थप्रसाद,भजनसंध्या व कीर्तन, २१ ऑगस्ट रोजी मध्य आराधना-पहाटे श्रींची भुपाळी, निर्माल्य विसर्जन, श्रींना पवमान अभिषेक, पवमान स्वाहाकार व मनुसुक्त स्वाहाकार, अष्टोत्तर पारायण, श्रींची महाआरती, महानैवेद्य, तीर्थप्रसाद, दिपोत्सव भजनसंध्या, २२ ऑगस्ट रोजी उतर आराधना-पहाटे श्रींची भुपाळी, निर्माल्य विसर्जन, श्रींना पवमान अभिषेक, लक्ष तुलसी अर्चना, सामुदायिक उपनयन संस्कार, अष्टोत्तर पारायण, श्रींची महाआरती, महानैवेद्य, तीर्थप्रसाद, सत्कार समारंभ, भजनसंध्या कार्यक्रम होणार आहे.



## संक्षिप्त वृत्त...




### सोलापुरात शनिवारी संविधान जागर यात्रेचे आगमन

**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

संविधान जागर समिती महाराष्ट्र आयोजित संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त काढण्यात आलेल्या संविधान जागर यात्रेचे सोलापुरात शनिवार दि. १७ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता आगमन होणार आहे, अशी माहिती सरचिटणीस प्रा. नारायण बनसोडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. सत्याग्रह भूमी महाड ते चैत्यभूमी दादर अशी संपूर्ण महाराष्ट्रभर ही यात्रा जाणार आहे. या संविधान यात्रेचे शनिवारी सोलापुरात स्वागत करण्यात येणार आहे. सकाळच्या सत्रामध्ये ९ वाजता आगमन होणार आहे. शहरातील मान्यवरांच्या गाठीभेटी व चर्चा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. त्यानंतर सायंकाळी ४ वाजता सर्व महापुरुषांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात येणार आहे. सायंकाळी ६ वाजता न्यू बुधवार पेठ येथील बॉबी चौकात जाहीर मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या संविधान जागर यात्रेच्या कार्यक्रमास शहरातील सर्व नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संविधान जागर समिती सोलापूर, भारतीय जनता पार्टी सोलापूर शहर भाजपा अनुसूचित जाती मोर्चा यांच्या वतीने करण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेस भाजपाचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे, संयोजक राजा माने, प्रदेश कार्यकारणी सदस्य प्रवीण कांबळे, मरेप्पा कंपली, गौतम कसबे, अजित गायकवाड, समाधान आवळे आदी उपस्थित होते.




**सोलापूर : स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला सेंट ॲनी किड्स नर्सरीमध्ये झालेल्या वेशभूषा कार्यक्रमातील भारतमातेच्या प्रतिमेसमवेत स्मृती योगेश इंडी हिचे टिपलेले छायाचित्र.**

### हज यात्रेसाठी ९ सप्टेंबरपर्यंत अर्ज भरण्याचे आवाहन

**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

भारतीय हज समिती व महाराष्ट्र राज्य हज कमिटीच्या वतीने हज २०२५ची फॉर्म भरण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. सोलापूर जिल्हा खादीमुलहूजाज हज कमिटीच्या वतीने जिल्ह्यातील इच्छुक नागरिकांनी ०९ सप्टेंबरपर्यंत भारतीय हज समितीच्या दिलेल्या वेबसाईटवर फॉर्म भरावेत. अधिक माहितीसाठी सोलापूर हज कमिटीचे युनूस शेख (०९४२२४६१६४८), अल्ताफ सिद्दिकी (०९४२१०२२१३३) अथवा उस्मान जमादार सर (०९९६०५३९८५५) यांच्याशी संपर्क साधावा. ऑनलाइन फॉर्म भरण्यासाठी आंतरराष्ट्रीय पासपोर्टची व्हॅलिडीटी १५ जानेवारी २०२६ पर्यंत असावी. आधार कार्ड, पॅन कार्ड, ब्लड ग्रुप, फोटो, ब्लँक चेक, नॉमिनीची माहिती त्यात देण्यात यावी. ६५ वर्षावरील नागरिकांसाठी राखीव कोटा आहे. त्यासाठी कॅम्पेनियमचे वय १८ पासून ६०पर्यंत असेल. एका कव्हर नंबरमध्ये पाच लोक असतील. तसेच ५ वरिष्ठ व २ मुले अशा पद्धतीने अर्ज भरता येतील.

### लमाण तांडा समृद्धी योजनेच्या सदस्यपदी अशोक चव्हाण

**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**



शासनाने संत सेवालाल महाराज बंजारा लमाण तांडा समृद्धी योजनाची नव्याने निर्मिती केली आहे. या योजनेच्या सदस्यपदी अशोक कनिराम चव्हाण यांची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्रामध्ये बंजारा समाज हा मोठ्या प्रमाणात राहतो परंतु त्या समाजाचा विकास झाला नाही. आज ही अनेक तांड्यावर पिण्यासाठी पाणी नाही लाईट नाही शमशानभूमी नाही असे अनेक समस्या तांड्यावर आहेत. कोणत्या मूलभूत सुविधा नसल्याने यातील नागरिकांना मोठ्या समस्यांचा सामना करावा लागत आहे. जिल्हास्तरावर तांड्यांना मूलभूत सुविधा पुरविणे त्याचबरोबर बंजारा लमाण तांड्यांना महसूल दर्जा देऊन स्वातंत्र ग्रामपंचायत निर्माण करण्याचे काम ही समिती करणार आहे या समितीवर महाराष्ट्रातील १४० बंजारा समाजातील कार्यकर्त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या समितीचे अध्यक्ष जिल्हा परिषद कार्यकारी अधिकारी हे राहणार असून कार्यकर्ते हे अशासकीय सदस्य म्हणून राहणार आहेत यात सोलापूर जिल्ह्यातून प्रताप नगर तांडा उत्तर सोलापूर येथील रहिवाशी अशोक कनिराम चव्हाण व अक्कलकोट तालुक्याचे किरण राठोड डिगेवाडी यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. या झालेल्या निवडीबद्धल त्यांचे सर्व क्षेत्रातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# अनेक घडामोडीनंतर मोडनिंबमध्ये अतिक्रमणावर हातोडा

## वाहनधारकांमधून समाधान; गुदमरलेले रस्ते झाले मोकळे

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. १४ ऑगस्ट-**

मोडनिंबमधील अतिक्रमणावर हातोडा फिरवण्यास सुरुवात झाल्याने अरुंद झालेले व गुदमरलेले रस्त्यांनी मोकळा श्वास घेण्यास सुरुवात केली आहे. यामुळे वाहनधारकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.



मोडनिंब (ता. माढा) येथील सहा महिन्यांपासून रखडलेला रस्ता तातडीने सुरू करून नागरिकांची गैरसोय दर करामी, अशी मागणी होत आहे. दरम्यान, मंगळवारी सायंकाळी सहाच्या सुमारास अतिक्रमणधारकांनी अतिक्रमण काढावे, अन्यथा पोलिस बंदोबस्तात अतिक्रमण काढण्यात येईल, असे आवाहन ध्वनिक्षेपकावरून करण्यात आले होते. त्यानुसार काही नागरिकांनी याला प्रतिसाद दिला. रविवारी आमदार बबनराव शिंदे हे एका कार्यक्रमाला मोडनिंब येथे आले असता नागरिकांनी आणि नागरिक यांनी रस्त्याबाबत आमदार शिंदे यांना विचारणा केली होती. कोणत्याही परिस्थितीत तातडीने काम हाती घेण्यात येईल, अशी माहिती त्यांनी दिली होती. संबंधित अधिकाऱ्यांना त्यांनी ताबडतोब काम हाती घेण्यासाठी मोबाईलवरून सूचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने अतिक्रमण करण्याचे काम सुरू झाले आहे. मोटनिंब स्टेशन रोडवर व्यापाऱ्यांनी दुकानाचे बोर्ड लावले आहेत. काही ठिकाणी पत्राचे शेड उभे केले आहेत तर बयाच ठिकाणी पक्की बांधकामेही केली आहेत. अनेक ठिकाणी पेव्हर ब्लॉक टाकले आहेत. व्यावसायिकांनी विकायाचे साहित्य रस्त्यावरच मांडले आहे. अतिक्रमणामुळे रस्त्याची रुंदी कमी झाली आहे. परिणामी, वाहनधारकांना वाहन चालवताना अनेकदा अपघात झाले आहेत.

### आ. शिंदे यांचे आश्वासन, दुसऱ्याच दिवशी कामाला सुरुवात

मोडनिंब येथील अनेक दिवसापासून रखडलेल्या मुख्य रस्त्याच्या कामाला कोणत्याही परिस्थितीत आठ दिवसांत सुरू करू, पोलिस आ. बबनराव शिंदे बंदोबस्तामध्ये अतिक्रमण काढू, लवकरात लवकर नागरिकांची होणारी गैरसोय थांबवू असे आश्वासन आमदार शिंदे यांनी दिले होते. त्यांनी याच ज्येष्ठ नागरिक संघटनेच्या कार्यक्रमात सर्वसमक्ष सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्याना फोनवरून सूचना दिल्या. त्यानंतर दुसऱ्याच दिवसापासून अतिक्रमण आणि रस्त्याच्या कामाला वेग आला

# लोणारी समाज सेवा संघाचे आमरण उपोषणास सुरु

## आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यासह विविध मागण्या प्रलंबित

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १४ ऑगस्ट-**

सांगोला तालुका लोणारी समाज सेवा संघाच्या वतीने आपल्या विविध मागण्यासाठी मंगळवारपासून सांगोला तहसील कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषणास प्रारंभ केला आहे. या उपोषणास लोणारी समाज सेवा संघाचे तालुका अध्यक्ष संतोष करांडे, सचिव प्रा. दत्ता नरळे व तालुका संघटक बाबासाहेब खांडेकर हे बसले आहेत.



लोणारी समाजाचे समाजरत्न पितामह विष्णुपंत दादरे आर्थिक विकास महामंडळ स्थापन व्हावे, सांगोला शहराच्या मुख्य चौकात विष्णुपंत दादरे यांचे स्मारक व्हावे, सांगोला शहरात नगरपालिका हद्दीत पाच गुंठे जागा मिळून समाज भवन मिळावे व पुणे आणि मुंबई शहरात विद्यार्थी व विद्यार्थिनी करिता सुसज्ज अभ्यासिका मिळावी,या प्रमुख मागण्यासाठी हे बेमुदत आमरण उपोषण लोणारी समाजाच्या वतीने पुकारले आहे.

दरम्यान आ. शहाजीबापू पाटील, डॉ. बाबासाहेब देशमुख, चेतनसिंह केदार-सावंत, डॉ. पियुष साळुंखे पाटील, ॲड. सचिन देशमुख, तानाजी पाटील, संतोष देवकते, आनंदा माने, माऊली तेली, प्रा. लक्ष्मण हाके, उल्हास धायगुडे, परमेश्वर कोळेकर, खंडू सातपुते यांनी उपोषण स्थळी भेट देऊन पाठिंबा दिला.

### मंत्री अतुल सावे यांनी साधला संवाद

मुंबई येथे मंगळवारी आ. गोपीचंद पडळकर यांनी लोणारी समाज सेवा संघाच्या वतीने लोणारी समाजाच्या मागण्यांसंदर्भात सुरु असलेल्या उपोषणाची माहिती गृहनिर्माण व इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांना देऊन उपोषणकर्त्यांशी फोनवरुन संवाद साधला. तसेच मागण्यांबाबत निवेदन दिले. यावेळी दौलतनाना शितोळे उपस्थित होते.



## चिखरडे येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयातील कुस्ती स्पर्धेतील मल्लांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १४ ऑगस्ट-**

तालुक्यातील चिखरडे येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयातील कुस्ती स्पर्धेतील मल्लांचा सत्कार आज श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव पंडित तात्या लोहोकरे व संचालक बाळासाहेब काकडे, डॉ. संतोष भड सर तसेच चिखर्डे गावचे सरपंच अमित सुभाष कोंढारे यांच्या हस्ते पार पडला. यावेळी ग्रीको कुस्ती प्रकारात अजय अमित कोंढारे हा तालुक्यात प्रथम १७ वर्षे वयोगटात तर मुलींमध्ये फ्री स्टाइल प्रकारात दीक्षा गावडे ही तालुक्यातून प्रथम आली व शंभू गावडे हा तालुक्यात दुसरा आला. यावेळी विनायक बप्पा गरड, पंडित लोहोकरे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. यावेळी प्रकाश पाटील, जीवन नाना गावडे, धनंजय कोंढारे, आयुब शेख, ज्ञानेश्वर जगताप, मुख्याध्यापक उमेश पाटील उपस्थित होते. प्रास्ताविक पायघन यांनी केले. सूत्रसंचालन जानराव यांनी केले आभार कासार यांनी मानले.

# मेहबुब शेख यांचे आरोप बिनबुडाचे

## राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा कार्यकारी अध्यक्ष अक्षय भांड यांचे स्पष्टीकरण

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. १४ ऑगस्ट-**

मोहोळ मतदारसंघात पण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची मोठी ताकत आहे. राजन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार यशवंत माने यांनी २,५०० कोटी निधी मोहळ मतदारसंघाच्या विकासासाठी आणला आहे व तेथील विकासकामे पण गतीने सुरु आहेत. पण मेहबूब शेख हे प्रसिद्धीसाठी हापापलेले नेतृत्व आहे. त्यामुळे ते बालिशपणाची वक्तव्ये नेहमी करत असतात. मोहोळची जनता हुशार आहे, ती विकास करणाऱ्या नेतृत्वाच्या पाठीशी राहील. त्यांचे आरोप बिनबुडाचे आहेत, असे स्पष्टीकरण राष्ट्रवादी युवक काँग्रेस अजित पवार गटाचे जिल्हा कार्यकारी अध्यक्ष अशोक भांड यांनी केले.



सुपारी घेऊन तुतारी वाजवण्याचे काम मेहबूब शेख करत आहेत. अजितदादांनी महाराष्ट्रातील महिलांच्या हिताच्या दृष्टीने लाडकी बहिण योजना सुरू केली आहे. या योजनेमुळे अनेक महिलांना लाभ मिळणार आहे, संसाराचा गाडा चालवत असताना महिलांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. पण लाडकी बहिण योजनेमुळे महिलांना बळ मिळणार आहे. मेहबुब शेखसारखे अनेक सावत्र भाऊ या योजनेला विरोध करत आहेत. पण त्यांने काही फरक पडणार नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेचे राज्य उभारले. सर्व जाती-धर्माचे लोक बरोबर घेऊन स्वराज्य स्थापन केले. याचा आदर्श आपण आज पण घेतो. काहीजण आज शिवस्वराज्य यात्रा काढत आहेत. ज्यामुळे स्वतःचा पक्ष वाढेल, ही अपक्षा ठेवून हे गावोगावी फिरत आहेत. त्यामध्ये कोणतेही जनतेचे हित नाही, युवकांच्या प्रश्नांची उत्तरे नाहीत, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा कार्यकारी अध्यक्ष अक्षय भांड यांनी दिली. महिलांबाबतचे कोणते धोरण नाही. फक्त स्वतःचा पक्ष मोठा करण्याचा स्वार्थ मनात ठेऊन ही शिवस्वराज्य यात्रा आहे. दुसरीकडे आमचे नेते अजितदादा जनसन्मान यात्रेच्या माध्यमातून महाराष्ट्रभर फिरत आहेत. महिलांशी सवांद साधत आहेत. महिलांचे प्रश्न तातडीने सोडवत आहेत. कदाचित हे काम मेहबूब शेख आणि त्यांच्या गटातील नेत्यांना बघवत नाही म्हणून त्यांची घुसमट होत आहे.

# करकंबमध्ये शाडूचे गणपती बनवण्यासाठी कार्यशाळा

## नादब्रह्म कला फाऊंडेशनचा उपक्रम; १०० विद्यार्थ्यांनाच मिळणार प्रवेश

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. १४ ऑगस्ट-**

नादब्रह्म कला फाऊंडेशन करकंब यांचेवतीने इयत्ता ४थी पासून पुढील वर्गातील विद्यार्थ्यांसाठी करकंब येथे रविवार दि.१८ऑगस्ट रोजी स. ११:०० ते ४:०० या वेळेत श्री.चौंडेश्वरी मंदिर करकंब येथे शाडूच्या मातीचे गणपती तयार करण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आल्याचे संस्थापक अध्यक्ष ज्ञानेश्वर दुधाणे यांनी सांगितले.

गणेशोत्सव जवळ येत आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने बहुतांश गणेशभक्त प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेश मूर्तीची स्थापना करतात.गणेश उत्सवानंतर या गणेशमूर्ती पाण्यात विसर्जन केल्या जातात परंतु त्या पाण्यात विरघळत नाहीत. त्यामुळे पाण्यामध्ये प्रदुषण मोठ्या प्रमाणात होते.यावर पर्याय म्हणून यावर्षी करकंब येथे प्रथमच शाडूच्या मातीचे गणपती तयार करण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली असून या कार्यशाळेमध्ये ख्यातनाम कलाकार प्रवीण नगरे सर पंढरपूर,ज्ञानेश्वर कुंभार, रामभाऊ जोशी हायस्कूल कला शिक्षक यांचे कृतीयुक्त प्रशिक्षण मिळणार आहे. करकंब व पंचक्रोशीतील विद्यार्थी,विद्यार्थिनीनी या कार्यशाळेमध्ये सहभागी होऊन आपण तयार केलेल्या गणेशमूर्तींचीच प्राणप्रतिष्ठा करावी आणि पर्यावरणाचे रक्षण करावे, असे आवाहन नादब्रह्म कला फाऊंडेशन यांच्यावतीने करण्यात आले आहे.सदर कार्यशाळा मोफत असून नादब्रह्म कला फाऊंडेशनच्यावतीने माती देण्यात येणार असून यासाठी लागणारे साहित्य ब्रश, प्लायवूडचा पाट, पट्टी, आईस्क्रीमचा चमचा, पाण्याची बाटली आदी साहित्य विद्यार्थ्यांनी घेऊन यायच आहे.




### सहभागी होण्याचे आवाहन

या अभिनव कार्यशाळेत विद्यार्थांनी सहभागी व्हावे. प्रथम येणाऱ्या १०० विद्यार्थ्यांनाच सहभागी होता येणार आहे. नाव नोंदणी ज्ञानेश्वर दुधाणे यांच्याकडे ९७६७७७६८५८ या मोबाईल नंबरवर करावी.

# पिलीव परिसरातील शेतकऱ्यांचे परतीच्या पावसाकडे लक्ष

## पूर्वेकडच्या भागाला दिलासा; दमदार पावसाशिवाय पाण्याचा प्रश्न मिटणार नाही

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १४ ऑगस्ट-**

माळशिरस तालुक्यासह पिलीव परिसरातील शेतकऱ्यांना अद्यापही जोरदार पावसाची प्रतीक्षा आहे.

यंदा मे-जून महीन्याच्या सुरुवातीलाच समाधानकारक पाऊस झाल्यामुळे खरीप हंगामात वेळेवर बाजरी, मका व इतर पिकांची पेरणी अगदी वेळेत झाली. सध्या थोडा थोडा पाऊस पडत असल्याने बाजरी व मका व इतर पिके सध्या चांगली बहरात आहेत. पण या भागात अदयापही मोठा पाऊस झाला नाही. अद्यापही तलाव, तळे किंवा बंधारे भरलेच नाहीत. ओढे नाले अद्यापही वाहिलेच नाहीत. यामुळे अद्यापही जमिनीतील पाणयाची पातळी वाढली नाही. या भागातील शेतकऱ्यांना परतीच्या जोरदार पावसाची अपेक्षा आहे. येत्या १९ ऑगस्ट म्हणजेच रक्षाबंधन या दिवशी समुद्रात नारळ पडल्यानंतर



कोकणात गेलेला पाऊस परत आपल्या भागात येतो, असा प्रचलित समज व परंपरा गेल्या अनेक वर्षांपासून आहे. पिलीव परिसरात थोड्याफार पावसामुळे खरीप हंगाम पार पडेल अशी अपेक्षा या भागातील शेतकऱ्यांना सध्या वाटत आहे. पण परतीचा जोरदार पाऊस न झाल्यास पुढील हंगामात शेतीच्या पाण्यासह, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होऊ शकतो.विशेषतः पिलीवचा पश्चिमेकडील भाग, सुळेवाडी, बचेरी, शिंगोर्णी, चांदापुरी, पठाणवस्ती, गारवाड या भागातील बंधारे, तलाव, ओढे, नाले भरुन वाहिल्याशिवाय वर्षभर पाणयाचा प्रश्न मिटत नाही. या भागात थोडा थोडा वरचेवर पाऊस होत आहे. मात्र अद्यापही एकही जोरदार पाऊस या भागात झालेला नाही. यामुळे सध्या बळीराजा मोठ्या चिंतेत आहे. सध्या त्याचे लक्ष आहे ते परतीचा पाऊस जोरदार होईल अशी अपेक्षा बळीराजाला आहे. पिलीवच्या पूर्वेकडील गावांना नीरा उजव्या कालव्यातून पाणी आल्यामुळे व सर्वच धरणे शंभर टक्के भरल्यामुळे फारशी चिंता नाही.

### कालव्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा

कालव्यालगत असणारे बंधारे, तलाव कालव्यातील पाण्याने भरणे सुरू असल्याने या भागातील शेतकऱ्यांना थोडासा दिलासा मिळणार आहे. पण पिलीव परीसरातील सर्व गावातील शेतकऱ्यांना सध्या परतीच्या जोरदार पावसाची अपेक्षा आहे.

CMYK

सोलापूर **तरुण भारत**

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT



आपला माणूस आपल्यासाठी



Multiple Action Advanced Research Group

MAARG FOUNDATION

शिस्त - सेवा - विश्वास

## युवा प्रतिमा, प्रगल्भ प्रतिभा

# आ.श्री. संतोष पवार साहेब

संस्थापक अध्यक्ष

मार्ग फाऊंडेशन

सोलापूर दैनिक तरुण भारत

वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !



## कार्य विश्वासाचं ...



### समाजासाठी यशस्वी पाठ पुरावा.

महाराष्ट्र शासनाचे मनःपूर्वक आभार...! समस्त बंजारा समाजाचे अभिनंदन. गवसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधारणा योजना व यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना समिती घटक करण्यासाठी यशस्वी पाठ पुरवठा केला.

### शिक्षक सन्मान सोहळा २०२४

मार्ग फाउंडेशन व ड्रिम फाउंडेशन यांच्या संयुक्ता विद्यमाने गुरुपौर्णिमे निमित्त "शिक्षक सन्मान" सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. शिक्षण हा कोणत्याही देशाच्या विकासाचा पाया असतो आणि शिक्षक हे शिक्षणाचे आधारस्तंभ असतात.





### विद्यार्थी गुणगौरव सोहळा

मार्ग फाउंडेशन तर्फे १० वी आणि १२ वी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.मान्यवरांच्या हस्ते वर्षभर जिद्द,कष्ट अन् मेहनतीने अभ्यास करून शैक्षणिक आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा पार करून यशाला गवसणी घालणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

### सन्मान नारीशक्तीचा

मार्ग फाउंडेशन तर्फे नारी सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता ह्या मध्ये आपल्या जीवाची बाजी लावून कोरोना महामारीत काम केलं व देवदूत बनून अनेकांचे प्राण वाचविणाऱ्या व .राज्य शासनाचं कोणतंही काम असो गावात वाडी-वस्तीवर जाऊन काम करून आपलं कर्तव्य बजावणाऱ्या अंगणवाडी सेविका व आशा सेविका यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान सन्मान करण्यात आला





### पोलीस पाटीलांचा सन्मान

पोलीस पाटलांच्या सन्मान सोहळ्याचे" आयोजन करण्यात आले होते.दक्षिण सोलापूर मधील विविध गावातील पोलीस पाटलांचा सन्मान मा.श्री.दीपक अर्वे साहेब यांच्या हस्ते करण्यात आला. सण असो किंवा उत्सव गावातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखून शांतता प्रस्थापित करण्याचं काम पोलीस पाटील करतात.

### कुस्ती खेळाला प्रोत्साहन

मातीतले खेळ व ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी गावच्या कुस्ती स्पर्धेत येताना चांदीची गदा दिली जाते. काळ कितीही बदलत गेला असला तरी यात्रौत्सवात होणाऱ्या जंगी कुस्त्याच्या आखाड्याचे महत्त्व आणि उत्साह तसूभरही कमी झालेला नाही.





### एक राखी सिमेवरील जवानांसाठी

एक राखी सेमीवरील जवानांसाठी "ऋणानुबंध जवान बांधवांसाठी" ह्या उपक्रमाअंतर्गत मार्ग फाऊंडेशन सीमेवर उभं राहून आपलं कर्तव्य बजावणाऱ्या भारत मातेच्या वीर जवानांसाठी १०,००० खास राख्या पाठवून रक्षाबंधनाचा सण साजरा केला आहे.




### लढा सोलापूर विकासाचा

सोलापूरचे ज्वलंत प्रश्न आणि समस्या घेऊन सोलापूरच्या उज्ज्वल भविष्यासाठी "लढा सोलापूर विकासाचा" या अभियानाद्वारे शहरात जनजागृती करुन मोठं व्यापक आंदोलन केलं.सोलापूरची अधोगती का होत आहे याला कोणते घटक कारणीभूत आहेत आणि सर्वांनी यासाठी काय केलं पाहिजे यावर विचारमंथन करून यावर "मार्ग" काढण्यासाठी कार्य सुरू आहे.

### महिला बचत गट व मुख्यमंत्री रोजगार निर्मीती

मार्ग फाउंडेशन च्या वतीने "महिला बचत गट सक्षमीकरण आणि मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यशाळा व पंडित दीनदयाळ उपाध्याय आणि ग्रामीण कौशल्य विकास योजना" ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.





### एस.पी. चषक ट्रॉफी व टी शर्ट अनावरण

भव्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचा "ट्रॉफी व टी-शर्ट अनावरण" सोहळा प्रमुख मान्यवर व विविध संघमालकांच्या उपस्थितीत सुंदर मल्टिपर्पज हॉल येथे दिमाखदार आणि जल्लोषपूर्ण वातावरणात संपन्न झाला.ह्या स्पर्धेमुळे सोलापूरातील क्रिकेट खेळणाऱ्या खेळाडूंना हक्काचं व्यासपीठ उपलब्ध झालं.

### महापालिका प्रशासना विरूध्द आंदोलन

सोलापूर शहरात उद्भवणारी कचऱ्याच्याची समस्या फार मोठी आहे. अनेक परिसरात वेळेवर घंटागाडी उपलब्ध होत नाही तसेच शहरात सर्वत्र उघड्यावर साचलेल्या कचऱ्या बाबत वारंवार तक्रार व निवेदन देऊनही दखल घेतली नाही म्हणून शहरातील विविध भागातील नागरिकांना घेऊन "कचरा फेको" आंदोलन करण्यात आले.






### जन सन्मान सभा

तालुक्याचा विकास झाला नाही सिंचनाचे क्षेत्र, तालुक्यासाठी स्वंतत्र MIDC,मंद्रूप तालुका निर्मिती व सरकारची विभागीय कार्यालये नाहीत,अश्या विविध प्रश्नांची जनजागृती करण्यासाठी संबंध दक्षिण सोलापूर तालुक्यात आम्ही जनसन्मान सभा घेणार आहोत.

### भजन संध्या

महाराष्ट्राची भक्ती परंपरा आणि संत संप्रदायाची शिकवणीचा प्रचार अन प्रसार करणाऱ्या भक्तीरसाचा हा सांस्कृतिक वारसा असणाऱ्या "भजन" स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं होत..भागवत संप्रदायाची वारसा जपण्याचा व वृद्धिंगतकरण्याचं कार्य करण्यात आलं.





### महासेवा शिबीर

दक्षिण सोलापूर तालुक्यातील सर्व गावांत महासेवा शिबीराचे आयोजन करून माता-भगिनींना ".मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना" तसेच विश्वकर्मा योजना, आयुष्यमान भारत योजना ह्या योजनांचा लाभ गावच्या नागरिकांना मिळवून दिला.

maargfoundation.online | santoshpawar.online | helpline #7507743019

**व्हाईट हाऊस, म्हाडा कॉलनी, हॉटेल सावन समोर, जुळे सोलापूर.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## क्राईम वृत्त

### सोशल मिडीयावर ओळख करून विनयभंग करणाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट -**

सोशल मिडीयावर महिलेशी ओळख करून तिचा पाठलाग करून विनयभंग करणाऱ्याविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पिडीत महिलेच्या फिर्यादीवरुन केतनदेवी उर्फ बाबा (रा. सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जून २०२४ मध्ये यातील पिडीत महिलेशी केतनदेवी याने सोशल मिडीयावर ओळख केली होती. या दोघांमध्ये मैत्री झाल्यावर केतनदेवी याच्या सांगण्यावरून पिडीत महिला या ५ ऑगस्ट २०२४ रोजी रात्री त्यास भेटली होत्या. त्यावेळी केतनदेवी याने पिडीत महिलेस तु खूप छान दिसतेस, माझे तुझ्यावर प्रेम आहे असे म्हणाला. त्यावेळी पिडीतेने मी विवाहित असून तुझ्यासोबत मैत्री केली होती असे म्हणून त्यास भेटण्यास टाळू लागल्या. त्यानंतर १० ऑगस्ट रोजी पिडीता व त्यांचे पती हे गावी सासरी गेले असताना केतनदेवी याने त्यांचा पाठलाग करून पाठीमागे आला. म्हणून पिडीतेच्या फिर्यादीवरुन केतनदेवी याच्याविरुध्द विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला सहायक पोलिस निरीक्षक मोरे-पाटील पुढील तपास करीत आहेत.




### शाळकरी मुलीचा विनयभंग; तिघांविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट -**

शाळकरी मुलीचा पाठलाग करून तिचा विनयभंग करणाऱ्या तिघांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात पोक्सो कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आदित्य (वय १८) व त्याचे दोन साथीदार यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पिडीत शाळकरी मुलीने फिर्याद दाखल केली आहे. यातील पिडीत शाळकरी मुलीचा आदित्य व त्याच्या साथीदारांनी पाठलाग करून तिचा लैंगिक छळ केला. तसेच पिडीत मुलीच्या शाळेसमोर उभे राहून आवाज काढत असताना दोन व्यक्तींनी त्यांना समजविण्याचा प्रयत्न केला असता त्या दोघांना आदित्य व त्याच्या साथीदारांनी मारहाण करून जखमी केले. म्हणून पिडीतेच्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात पोक्सो कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला सहायक पोलिस निरीक्षक केंद्रे पुढील तपास करीत आहेत.

### तरूणावर चाकूने वार करणाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट -**

काम न केल्याने दारूच्या नशेत तरूणावर चाकूने वार करून जखमी करणाऱ्याविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत जखमी नामदेव भारत जाधव (वय ३१, रा. एन जी मिल चाळ, मुरारजी पेठ, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन अभिनंदन उर्फ भैय्या आळंदकर (रा. एन जी मिल चाळ, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ११ ऑगस्ट रोजी साडेआकराच्या सुमारास नामदेव जाधव हा जेवण करून एन जी मिल-सरस्वती चौक-रामलाल चौक या रस्त्यावरून रस्त्याच्या कडेला बसलेला होता. त्यावेळी जाधव याच्या ओळखीचा अभिनंदन आळंदकर हा आला. त्याने जाधव याने सिव्हील हॉस्पीटल येथील काम न केल्याने दारूच्या नशेत जाधव यास शिवीगाळ करून हातातील चावीला असलेल्या किचनच्या चाकूने मारहाण करून जखमी केले. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस नाईक कामुर्ती पुढील तपास करीत आहेत.

### गुरूनानक नगरातून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट -**

शहरातील गुरुनानक नगरातून चोरट्याने २० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत विजय संतोष निरंकारी (रा. ब्लॉक नं. ७, गुरुनानक नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ९ ऑगस्ट रोजी दुपारी विजय निरंकारी यांनी घरासमोर त्यांची एमएच १३ बीटी ३२२५ क्रमांकाची दुचाकी हॅन्डल लॉक करून ठेवली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद जोडभावी पेठ पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार शिवशरण पुढील तपास करीत आहेत.

### बाळीवेसमधून २० हजारांची दुचाकी लंपास

**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट -**

शहरातील बाळीवेस येथून चोरट्याने २० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत नागेश पंडीत पाटील (वय ४१, रा. अरबळी, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १२ ऑगस्ट रोजी दुपारी नागेश पाटील यांनी त्यांची एमएच २५ एसी ५३५२ क्रमांकाची दुचाकी बाळीवेस हॅन्डल लॉक करून ठेवली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद जोडभावी पेठ पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार आरेनवरू पुढील तपास करीत आहेत.



**सोलापूर : नेहरूनगर येथील श्री सुशीलकुमार शिंदे शारीरिक शिक्षण महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा तसेच महाविद्यालयाच्या कार्यपुस्तिकेचे प्रकाशनप्रसंगी उपस्थित सोलापूर विद्यापीठाचे माजी क्रीडा संचालक डॉ. सुरेश पवार, संस्थेचे अध्यक्ष चव्हाण, व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा सचिन गायकवाड, प्रा.डॉ. अनिल कांबळे, डॉ. आनंद चव्हाण, प्रा. संतोष गवळी, डॉ. किरण चोकाकर, प्रा. बाळासाहेब वाघचौरे, प्रा.डॉ. भंडारकवठे.**

# पारतंत्र्यातही तिरंगा ध्वज फडकलेली ऐतिहासिक वास्तू विद्युत रोषणाईने उजळली

## फोटो काढण्यासाठी नवी पेठेत नागरिकांची गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

पारतंत्र्यातही तिरंगा ध्वज फडकलेल्या ऐतिहासिक अशा नवी पेठेतील महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाची हेरिटेज इमारत अखेर तिरंगा विद्युत रोषणाईने उजळली. स्वातंत्र्यलढ्याचा क्रांतिकारी इतिहास असलेल्या या प्रेरणादायी इमारतीसमोर फोटो काढण्यासाठी अनेकांनी गर्दी केल्याचे दिसून आले.




जुन्या नगरपालिकेची ही ऐतिहासिक इमारत आहे. हेरिटेज वास्तू , स्वातंत्र्यलढ्याची साक्ष देणारी ही इमारत आहे. मे १९३० मध्ये पारतंत्र्यातही तिरंगा ध्वज डौलाने फडकविण्यात आला होता. दि. ६ एप्रिल १९३० रोजी सोलापूर नगरपालिकेवर राष्ट्रीय झेंडा फडकवण्यात यावा असा ठराव करण्यात आला. त्यानुसार देशभक्त अण्णासाहेब भोपटकर यांच्या हस्ते सध्याच्या नवी पेठ येथील नगरपालिकेच्या इमारतीवर राष्ट्रीय निशाण फडकवण्यात आले. पारतंत्र्यातही दि. ९ ते १२ मे १९३० दरम्यान सोलापूरकरांनी स्वातंत्र्य उपभोगले. आक्रमक क्रांतिकारी लढा उभारल्याने ब्रिटिशांनी सोलापुरात मार्शल लॉ पुकारला. मार्शल लॉच्या काळात नगरपालिकेवर उभारण्यात आलेले राष्ट्रीय निशाण उतरावे असे फर्मान ब्रिटिश अधिकाऱ्यांनी सोडले मात्र त्याला न जुमानता सभासदांनी सर्वानुमते केलेली कृती त्यांच्या संमतीशिवाय मी म ागे घेऊ शकत नाही असे बाणेदार उत्तर देऊन निशाण उतरवण्यास तत्कालीन नगराध्यक्ष माणिकचंद शहा यांनी स्पष्ट नकार दिला. त्याबद्दल त्यांना कारावास आणि दंडाची शिक्षा भोगावी लागली असा हा क्रांतिकारी इतिहास या ऐतिहासिक वास्तूचा आहे. आजही ही वास्तू सर्वांना प्रेरणा देत आहे. क्रांतिकारी इतिहास असल्याने या हेरिटेज इमारतीवर स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने तत्कालीन आयुक्त पि शिवशंकर यांनी विद्युत रोषणाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर या ऐतिहासिक वास्तूवर विद्युत रोषणाई करण्याची ही परंपरा सुरू ठेवण्यात आली.

दरम्यान, स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने शहरातील सर्व महत्त्वाच्या इमारती तिरंगा विद्युत रोषणाईने प्रकाशमय झाल्या असल्या तरी नवी पेठेतील ही हेरिटेज इमारत मात्र आज संध्याकाळपर्यंत दुर्लक्षित होती. या संदर्भात महापालिकेचे विद्युत अभियंता महादेव इंगळे यांना माहिती मिळाल्यानंतर या ऐतिहासिक वास्तूचे महत्त्व ओळखून अभियंता इंगळे यांनी तात्काळ संबंधितांना तातडीने त्या इमारतीवर तिरंगा विद्युत रोषणाई करण्याची सक्त सूचना केली. आणि तासभरात तिरंगा विद्युत रोषणाईने ही ऐतिहासिक इमारत उजळली. विद्युत विभागाचे अभियंता महादेव इंगळे यांनी या ऐतिहासिक वास्तूची शान आणि मान राखली. मनोहरी विद्युत रोषणाईमुळे ही वास्तू अधिकच आकर्षक अशी दिसत आहे. यामुळे नवी पेठ येथील अनेकांनी या वास्तूसमोर आपल्या मोबाईल मधून फोटो तसेच सेल्फी काढले.



# विविध मागण्यांबाबत आ. देशमुखांनी घेतली आयुक्तांची भेट

## समस्यांचे त्वरित निराकरण करण्याच्या अधिकाऱ्यांना सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

शहर हद्दवाढ भागातील खासगी नळ आकारणी शुल्क रद्द करावे, आरोग्य निरीक्षक व सफाई कामगारांची संख्या वाढवावी, सुंदरम नगर येथील स्विमिंग पूल क्रीडा विभागास हस्तांतरण करावे यासह विविध मागण्यांसाठी आमदार सुभाष देशमुख यांनी महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांची भेट घेतली. याची अमंलबाजवणी तातडीने करण्याच्या सूचनाही त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

यावेळी आमदार देशमुख यांनी हद्दवाढ भागातील अमृत-२ योजनेअंतर्गत ड्रेनेज व पाणीपुरवठा संदर्भात प्रारुप आराखडा, नगरोत्थान, दलित वस्तीचे रस्ते व ड्रेनेजचे प्रलंबित कामाचा आढावा घेतला. आसरा पुलाचे काम अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे, त्या कामाची सध्यस्थिती आमदार देशमुख यांनी अधिकाऱ्यांकडून जाणून घेतली.

हद्दवाढ भागात अनेक समस्या आहेत. रस्त्याची समस्या, पाण्याची समस्या तसेच ड्रेनेज आणि कचऱ्याची समस्या आहे. याबाबत नागरिकांच्या तक्रारी येत आहेत. या सर्व समस्यांचे निराकरण लवकर करण्याच्या सूचना महापालिका अधिकाऱ्यांना दिल्याचे आ.देशमुख यांनी सांगितले. महापालिकेच्याही काही तांत्रिक अडचणी आहेत. १५ व्या वित्त आयोगाचीही निधी आलेला नाही. तरी या सर्व अडचणी दूर करून आयुक्तांनी समस्या दूर करण्यात येतील, असे आश्वासन दिल्याचे आ.देशमुख यांनी सांगितले.

## लाड कमिटी अंतर्गत महापालिका आयुक्तांनी काढले आदेश

# ७८व्या स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला ७८ वारसांना नियुक्ती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

लाड कमिटी वारसा हक्क अंतर्गत सोलापूर महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी ७८ व्या स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला ७८ वारसांच्या नियुक्तीचे आदेश काढले आहेत. न्यायालयाने आदेश दिल्यानंतर युद्ध पातळीवर प्रक्रिया राबवून लाड कमिटी अंतर्गत नियुक्ती आदेश काढण्यात सोलापूर महापालिका अग्रेसर असल्याचे दिसून येते.

लाड कमिटी अंतर्गत नियुक्ती संदर्भात औरंगाबाद खंडपीठ न्यायालयामध्ये प्रकरण न्यायप्रविष्ठ होते. दरम्यान न्यायालयाने या संदर्भात आदेश दिल्यानंतर त्यानुसार पुन्हा या योजनेअंतर्गत नियुक्ती प्रक्रिया राबविण्यास सुरुवात झाली. महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांच्या आदेशानुसार आणि उपायुक्त आशिष लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सामान्य प्रशासन



विभागाचे अधीक्षक लक्ष्मीनारायण दोंतुल यांच्या माध्यमातून या विभागाने युद्ध पातळीवर या नियुक्तीसाठीची प्रक्रिया राबवली. यामुळे स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला ७८ कर्मचाऱ्यांच्या वारसांना लाड कमिटी अंतर्गत नियुक्ती आदेश महापालिका आयुक्तांनी काढले आहेत. तातडीने ही प्रक्रिया राबवून नियुक्ती आदेश काढणारी सोलापूर महापालिका ही राज्यातील इतर महापालिकेच्या तुलनेत अग्रेसर अशी ठरली आहे. नियुक्ती आदेश काढल्यामुळे संबंधित वारस कुटुंबीयांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. स्वातंत्र्यदिनानिमित्त ही भेट महापालिका आयुक्तांनी दिली आहे. शुक्रवार दि. १६ ऑगस्ट २०२४ पासून दोन वर्षाच्या परीविक्षा कालावधी करिता अटी व



शर्तीस अधीन राहून महापालिकेतील संबंधित कार्यालयाकडे या कर्मचाऱ्यांना नियुक्त करण्यात येत असल्याचे आदेशात म्हटले आहे. एकूण ७८ वारसांना हे नियुक्ती आदेश देण्यात येत आहे. यामध्ये सफाई कामगार -७, झाडूवाला -२ , झाडूवाली- ५१, बिगारी -१४, ड्रेनेज मजूर - ४ यांचा समावेश आहे.

# गुंठेवारी खरेदी-विक्री प्रक्रिया सुरु होण्यासाठी संभाजी आरमारचा मोर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

लाखो मिळकतधारकांच्या दृष्टीने जिव्हाळ्याचा असलेल्या गुंठेवारी खरेदी-विक्री प्रक्रिया सुरु होण्यासह अन्य मागण्यांसाठी संभाजी आरमारने संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढला.




गुंठेवारी खरेदी-विक्री प्रक्रिया सुरु व्हावी या मागणीसाठी मागील ३ वर्षांपासून संभाजी आरमार सातत्याने आवाज उठवत आहे. चार हुतात्मा चौकातून राजमाता अहिल्यादेवी होळकर तसेच सोलापूरच्या क्रांतिवीरांना पुष्पहार अर्पण करून या मोर्चाची सुरुवात करण्यात आली. चार हुतात्मा चौक - डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक - सिद्धेश्वर मंदिर मार्गे पूनम गेट येथे मोर्चाचा समारोप करण्यात आला. मोर्चा समारोपप्रसंगी बोलताना संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे यांनी जनतेच्या या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर लढणारी संभाजी आरमार ही एकमेव संघटना असल्याचे सांगत सोलापूरच्या लोकप्रितिनिधींनी या प्रश्नी घेतलेली उदासीन भूमिका घातक असल्याची टीका केली. विधानसभा निवडणुकीपूर्वी हा प्रश्नी मार्गी लागावा यासाठी यापुढील काळात लोकप्रतिनिधींच्या घरासम ोर आंदोलन करणार असल्याचा इशारा देखील दिला. लाखो मि ळकतधारकांच्या लाख मोलाच्या मिळकती कवडीमोल होण्यापूर्वी जनते देखील सजगपणे संभाजी आरमारच्या या लढ्यात सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले.

या धडक मोर्चात संभाजी आरमारचे कार्याध्यक्ष शिवाजी वाघमोडे, प्रदेश संघटक प्रकाश डांगे, सरचिटणीस गजानन जमदाडे, जिल्हाप्रमुख अनंतराव नीळ, जिल्हा संघटक अमित कदम, शहरप्रमुख सागर ढगे, अर्जुन शिवसिंगवाले, गुरू निंबाळे,उपशहरप्रमुख राज जगताप, उपजिल्हाप्रमुख सागर संगवे, प्रमोद जगताप, दक्षिण तालुकाप्रमुख ज्ञानेश्वर डोंबाळे, महिला आघाडीच्या उमा रजपूत, शोभा घंटे, अश्विनी गायकवाड, मनीषा महाडिक,वर्षा ढगे, प्राजक्ता चव्हाण,महेश घोडके, सोमनाथ मस्के रोहित मन्सावाले राजू आखाडे, अविनाश विटकर, पिंटू औरंगे, आनंद थिटे, कृष्णा थोरात, लक्ष्मीकांत बंडगर, संतोष काळे,व्यंकणा भिमनपल्ली,सागर दासी,राजू रच्चा, व्दारकेश बबलादीकर,वासु होंनकोबडे आदींसह कार्यकर्ते व नागरिक सामील झाले होते.




# हिमोग्लोबिन तपासणी शिबीरात ६१९ जणांची तपासणी

**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

सहकार महर्षी कै. वि. गु शिवदारे स्मृती समारोह निमित्त दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाचे कॉलेज ऑफ फार्मसी येथे शिवदारे शैक्षणिक संकुलातील सर्व विद्यार्थिनी व सर्व महिला शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या हिमोग्लोबिन शिबिरात ६१९ जणांची मोफत तपासणी करण्यात आली.

शिबिराचे उद्घाटन इंडियन रेडक्रॉस सोसायटीचे जयेश पटेल यांच्या हस्ते आणि फॅमिली प्लॅनिंग असोसिएशनचे मार्गदर्शक डॉ. श्रीकांत येळेगांवकर यांच्या अध्यक्षतेखाली झाले. यावेळी दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे, रोटरी क्लब ऑफ सोलापूरचे अध्यक्ष सुनील माहेश्वरी, ब्रिजमोहन गोयधानी, सोलापूर सिद्धेश्वर सहकारी बँकेचे चेअरमन नरेंद्र गंभीरे, डॉ. सिद्धेश्वर वाले, संगम रघोजी, अण्णासाहेब कोतली, अंजली तिवारी, एफपीएआयचे डॉ. एन. बी. तेली उपस्थित होते.

# फाळणीच्या वेळी लाखो लोकांचे जीव वाचविण्यात रेल्वे सेवा महत्वपूर्ण : परिहार

## विभाजन स्मृती दिन आणि स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर मल्टीमिडिया प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट -**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव मोठया उत्साहाने साजरा करत असताना आपल्याला १४ ऑगस्ट १९४७ रोजी घडलेल्या फाळणीच्या वेदना देखील मनाला खिन्न करून जातात. देशाला भोगाव्या लागलेल्या फाळणीच्या वेदना कधीही विसरता येणार नाहीत. द्वेष आणि हिंसाचारामुळे घडलेल्या दंगलीत लाखो लोकांचे प्राण वाचविण्यात रेल्वेने अत्यांत महत्वाची भूमिका निभावली आहे. आपल्या लोकांच्या संघर्ष आणि बलिदानाच्या स्मरणार्थ १४ ऑगस्ट हा ''फाळणी स्मृती दिन'' म्हणून देशभर पाळला जात आहे. असे प्रतिपादन रेल्वेचे मुख्य प्रकल्प व्यवस्थापक शैलेंद्र सिंह परिहार यांनी केले.



फाळणी वेदना स्मृतीदिन, हर घर तिरंगा आणि भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रीय संचार ब्यूरो, सोलापूर व मध्य रेल्वे सोलापूर विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रदर्शनाचे उदघाटन हैद्राबाद मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्यसैनिक दत्तात्रय हिबारे यांचे हस्ते फीत कापून करण्यात आले. भारत-पाक फाळणीत घडलेल्या घटना, घडामोडी आणि भारतीय स्वातंत्र्य संग्रामात घडलेल्या महत्वपूर्ण घटना, ऐतिहासिक स्थळे, ज्ञात व अज्ञात क्रांतिकारक आणि राष्ट्रपुरुषांची माहिती देणाऱ्या दुर्मिळ छायाचित्रांचे मल्टीमीडिया प्रदर्शन रेल्वे स्टेशन येथे भरविण्यात आले आहे. चित्र प्रदर्शनाचे उद्घाटनप्रसंगी परिहार बोलत होते.

यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकूर, क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंकुश चव्हाण, वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक योगेश पाटील, वरिष्ठ विभागीय कार्मिक अधिकारी ए पी भगत, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर मिलिंद तुंगार, रेल्वेचे सिव्हील अभियंता अरुण गणेरे, सहायक वाणिज्य व्यवस्थापक लखनजी झा, सहायक कार्मिक अधिकारी शेख मस्तान, रेल्वे हॉस्पिटलचे वैद्यकीय अधीक्षक डॉ आनंद कांबळे, सुभेदार शिवाजी माने, अखिल भारतीय माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष अरुणकुमार तळीखेडे, रेल्वे जनसंपर्क अधिकारी यश जनबंधू आणि सहायक क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंबादास यादव आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक अंकुश चव्हाण यांनी केले.

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ''भारत-पाक विभाजन आणि भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील प्रत्योक घडामोडीवर लावणेत आलेल्या दुर्मिळ छायचित्रांचे अतिशय अभ्यासपूर्ण माहिती उपस्थित मान्यवर आणि प्रेक्षकांना सहायक क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंबादास यादव यांनी दिली. माजी सैनिक अरुण तळीखेडे यांनी भारतीय सैन्याचे कार्य आणि स्वातंत्र्य संग्रामाविषयी आपले मनोगत व्यक्त केले. रेल्वे स्टेशनवरील प्रदर्शन १६ ऑगस्टपर्यंत सकाळी १० ते रात्री ९ वाजेपर्यंत सर्वांसाठी विनामूल्य खुले राहणार आहे.

सूत्रसंचालन व आभार अंबादास यादव यांनी केले. भैरव मार्तंड कला पथक पंढरपूर यांनी विविध देशभक्तीपर गीते गाऊन प्रबोधन केले.

### प्रदर्शनात महत्वपूर्ण छायाचित्रांचा समावेश

सदर प्रदर्शनामध्ये १९४७ वेळी झालेल्या फाळणीचे चित्र, १७५७ ची प्लासीची लढाई, संन्यासी विद्रोह, कित्तूर विद्रोह, १८५७ लढ्यातील महान क्रांतिकारक राणी लक्ष्मीबाई, झलकारी बाई, मंगल पांडे, तात्या टोपे, नानासाहेब पेशवे, बेगम हजरत महल यांचे छायाचित्र व मजकूर, राजाराममोहन रॉय, महात्मा फुले, लोकमान्य टिळक, रवींद्रनाथ टागोर, डॉ ॲनी बेझंट, पंडिता रमाबाई, मॅडम भिकाजी कामा, डॉ श्यामजी कृष्णा वर्मा, लाला हरदयाळ, अरविंद घोष, लाला लजपतराय, दादाभाई नौरोजी, फिरोजशाह मेहता, चाफेकर बंधू, सरदार वल्लभभाई पटेल, महात्मा गांधी, पंडित नेहरू, डॉ बाबासाहेब आंबेडकर, वीर सावरकर, खान अब्दुल गफार खान, नेताजी सुभाषचंद्र बोस, चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, अश्फाक उल्ला, सरोजिनी नायडू, अरुणा असफली, उषा मेहता इत्यादी स्वातंत्र्य सैनिकांच्या जीवनातील महत्वपूर्ण घटना. चंपारण सत्याग्रह, खेडा सत्याग्रह, असहयोग आणि खिलाफत चळवळ, बार्डोली सत्याग्रह, चौराचौरी, काकोरी काण्ड, चितगाव शस्त्रागार, हिन्दुस्तान सोशलिस्ट रिपब्लिकन असोसिएशन, सविनय कायदेभंग, दांडी यात्रा, चलेजाव आंदोलन, भारत-पाक फाळणी, स्वातंत्र्यदिन, संस्थानचे विलीनीकरण आणि संविधान सभा आदी महत्वपूर्ण घटनांचे दुर्मिळ छायाचित्र आणि मजकूरांचे प्रदर्शन लावण्यात आले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### सात-बारावर सोयाबीन पिकाची नोंद; शेतकरी अनुदानापासून वंचित

**बार्शी, दि. १४ ऑगस्ट-**

बार्शी तालुक्यात सोयाबीन पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते, सन २०२३ मध्ये बहुतांश भागात पावसाचे प्रमाण कमी होते. त्याचबरोबर सोयाबीन व कापसाचे भाव पडल्याने शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागले होते. शासनाने या शेतकऱ्यांना अर्थसाह्य देण्याचे जाहीर केले, राज्यातील सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना किमान १००० रुपये तर २ हेक्टरच्या मर्यादित प्रति हेक्टरी ५ हजार रुपये याप्रमाणे अर्थसाह्य दिले जाणार आहे. ज्या शेतकऱ्यांनी ई पीक पाहणी अंतर्गत सोयाबीन व कापूस या पिकाची सातबारा वर नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना खरीप हंगाम २०२३ साठी अनुदान मिळणार आहे. कृषी विभागामार्फत तालुक्यातील गावोगावी प्रसिद्ध केलेल्या यादीमध्ये सातबारामध्ये सोयाबीन या पिकाची नोंद असूनही बार्शी तालुक्यातील असंख्य शेतकऱ्यांची नावे अनुदानाच्या यादीमध्ये नाहीत. अशा शेतकऱ्यांची नावे समावेश करुन त्यांनाही अनुदान देण्यासाठी प्रस्ताव जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तात्रय गवसने व तालुका कृषी अधिकारी संतोष कोयले यांनी कृषी मंत्रालय यांना पाठवावा, अशा आशयाचे निवेदन लोकासमावेश देण्यात आले. निवेदन देते वेळी राहुल भड, अशोक माळी, किरण संकपाळ, विजयकुमार पाटील, दशरथ उकिरडे, चंद्रकांत मुंबरे आदी तालुक्यातील शेतकरी उपस्थित होते.



### सांगोला तालुका कृषी विभागाच्या वतीने रानभाजी महोत्सव साजरा

**सांगोला, दि. १४ ऑगस्ट-**

सांगोला तालुका कृषी विभागाच्या वतीने आदिवासी दिन,ऑगस्ट क्रांती दिन व स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून सांगोला आठवडी बाजार तळावर रानभाजी महोत्सव साजरा करण्यात आला.पावसाच्या पहिल्या सरीवर उगवणाऱ्या,अत्यंत दुर्मिळ आणि प्रकृतीला पोषक तांदूळजा,घोळ,शेवगा, टाकळा,पाथरी,पातुर, आळू केना,पानांचा ओवा,कुरडू आघाडा,काटेमाट,चिघळ भाजी, अंबाडी,पिंपळ,उंबर, रानभेंडी,उंबर,कपाळ फोडी,अंबाडी, कर्टोल अशा वीस ते पंचवीस प्रकारच्या रानभाज्या या महोत्सवात मांडण्यात आल्या होत्या.याप्रसंगी तहसीलदार संतोष कणसे व मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांनी रानभाज्या मधील औषधी गुणधर्म सांगितले. प्रास्तविकामध्ये तालुका कृषी अधिकारी शिवाजी शिंदे यांनी रानभाजी महोत्सवाचे महत्त्व विशद केले.कार्यक्रमासाठी युवासेना जिल्हा संपर्क प्रमुख सागर पाटिल,नायब तहसीलदार साळुंखे,पं.स.कृषी विभागाच्या कृषी अधिकारी शेंडे,पवार,पशुधन विकास अधिकारी डॉ.गव्हाणे,प्रगतशील शेतकरी अनिरुद्ध पुजारी,संजय दिघे,शेतकरी,नागरिक,कृषि विभागाचा स्टाफ उपस्थित होता.सूत्रसंचालन उत्कर्ष चंदनशिवे यांनी तर आभार कृषी पर्यवेक्षक श्रीधर शेजवळ यांनी मानले.

### हत्तूर-वडकबाळ येथील मल्लिकार्जुनलिंग मंदिरात आज विविध कार्यक्रम

**अक्कलकोट दि. १४ ऑगस्ट**



सोलापूर-विजापूर या राष्ट्रीय महामार्गावरील हत्तूर आणि वडकबाळ सरहद्दीवर वसलेले श्रीक्षेत्र मल्लिकार्जुनलिंग मल्लिनाथ महाराज देवस्थान येथे जय भारत माता सेवा समिती नवी दिल्लीचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष सदगुरू श्री ॐ हवा मल्लिनाथ महाराज यांच्या दिव्य सानिध्यात १५ ऑगस्ट वार्षिक यात्रा महोत्सवनिमित्त देशभक्तीपर कार्यक्रमांसह विविध धार्मिक कर्यक्रम होणार आहेत. या १५ ऑगस्ट यात्रेस प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही देश भरातील शेकडो भाविक भक्त मोठ्या प्रमाणात येणार असल्याने यात्रा कमिटीच्या वतीने यात्रेची जयत्त तयारी करण्यात आली आहे. गुरूवारी १५ ऑगस्ट रोजी रोजी पहाटे श्रीची महापूजा, महारुद्राभिषेक, नवग्रह पूजा, होमहवन इत्यादी कार्यक्रम होणार आहेत. सकाळी आठ वाजता श्रीची भव्य पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. गुरूवार दिवसभर भक्ताचा राजा सदगुरु श्री ॐ हवा मल्लिनाथ महाराजाचा दर्शन सोहळा आहे. भाविक भक्त आणि देश भक्तांनी उपस्थित राहून सद्गुरूंचे दर्शन, महाप्रसादाचा आणि देशसेवेचा आवश्य लाभ घ्यावा असे आवाहन यात्रा कमिटी वतीने करण्यात आले आहे.

### पंढरपूर तहसील कार्यालयात शासकीय ध्वजारोहण समारंभाचे आयोजन

**पंढरपूर, दि. १४ ऑगस्ट-**

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या ७७ व्या वर्धापनानिमित्त तहसिल कार्यालय, पंढरपूर येथे गुरुवार दिनांक १५ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ९.०५ वाजता ध्वजारोहणाचा शासकीय समारंभ होणार आहे. उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांच्या हस्ते शासकीय ध्वजारोहणाचा समारंभ संपन्न होणार असून, या समारंभास मान्यवर नागरीक, स्वातंत्र्य सैनिक तसेच शासकीय-निमशासकीय कर्मचाऱ्यांनी उपस्थित रहावे असे, आवाहन तहसिलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे.

# १६ ऑगस्टपासून सरपंच बेमुदत संपावर

## अडीच लाख लोकांचा सहभाग ; राज्यातील २८ हजार ग्रामपंचायतींवर होणार परिणाम

**२८ ऑगस्ट रोजी मुंबईतील आझाद मैदानावर धरणे आंदोलन करण्याचा इशारा**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १४ ऑगस्ट-**

गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मागण्यांसाठी आता सरपंच, ग्रामसेवक आणि ग्रामपंचायत कर्मचारी रस्त्यावर उतरले आहेत. येत्या १६ ऑगस्ट २०२४ पासून सरपंच, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कर्मचारी, ग्रामरोजगार सेवक, संगणक परिचालक बेमुदत काम बंद आंदोलन करणार आहेत. तसेच जर मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर येत्या २८ ऑगस्ट २०२४ रोजी मुंबईतील आझाद मैदानावर धरणे आंदोलन करण्यात येईल,




असा इशाराही देण्यात आला आहे.

अखिल भारतीय सरपंच परिषदेचे अध्यक्ष जयंत पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, सरपंचांना १५ हजार, उपसरपंचांना १० हजार, तर सदस्याला तीन हजार मानधन मिळावे, या प्रमुख मागणीसाठी सरपंच, ग्रामसेवक आणि ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांकडून आंदोलन करण्यात येत आहे. मुख्यमंत्री आणि ग्रामविकास मंत्र्यांकडे याबद्दल वारंवार पाठपुरावा केला जात आहे. मात्र तरीही आमच्या अनेक मागण्यांकडे दुर्लक्ष होत आहे. यामुळे आता आंदोलनाशिवाय पर्याय उरलेला नाही, असे जयंत पाटील यांनी म्हटले. तसेच ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी संकटमोचक होऊन आमच्या समस्या सोडवाव्यात, अशी मागणी अखिल भारतीय सरपंच परिषदेचे अध्यक्ष जयंत पाटील यांनी केली.

### नागरिकांना होणार त्रास

येत्या १६ ऑगस्ट २०२४ पासून सरपंच, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कर्मचारी, ग्रामरोजगार सेवक, संगणक परिचालक बेमुदत काम बंद आंदोलन करणार आहेत. या आंदोलनात सुमारे अडीच लाख लोक सहभागी होणार आहेत. याचा परिणाम राज्यातील २८ हजार ग्रामपंचायतींवर होणार आहे. यामुळे लाडकी बहीण योजना, पीक विमा अर्ज भरण्याचे काम थांबणार आहे. तसेच एकाच वेळी अनेक ग्राम पंचायतींचा कारभार बंद झाल्यास नागरिकांना विविध अडचणींचा सामना करावा लागणार आहे.

### ग्रामपंचायत घटकांच्या प्रमुख मागण्या

नियमित व सन्मानजनक मानधन, भत्ते मिळावे, सरपंचांना १५ हजार, उपसरपंचांना १० हजार, तर सदस्याला तीन हजार मानधन मिळावे, ग्रामपंचायत संबंधित सर्व घटकांना विमा, पेन्शन, निश्चित वेतन लागू करावे, मुंबईत सरपंच भवनाची स्थापना करावी, ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी पद एकत्रित करून पंचायत विकास अधिकारी म्हणावे, ग्रामरोजगार सेवकाची नेमणूक पूर्णवेळ करून वेतननिश्चिती करावी, संगणक परिचालकांना ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या आकृतिबंधात आणावे, यावर समितीचा अहवाल त्वरित लागू करावा, संगणक परिचालकांचा भार ग्रामपंचायतीऐवजी शासनाने उचलावा, ग्रामपंचायतींना स्वायत्त संस्थेचा अधिकार देऊन विकासकामे करण्याचा अधिकार द्यावा,

# बार्शीत ५ हजार वृक्ष लागवडीचा शुभारंभ
## लायन्स क्लब ऑफ बार्शी टाऊनचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १४ ऑगस्ट-**

लायन्स क्लब बार्शी टाऊन यांच्यावतीने बार्शी शहराच्या विविध भागात १० ऑक्सिजन पार्क करण्यात येत असून या मोहिमेअंतर्गत ५ हजार वृक्षारोपण करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात बार्शीतील ढगे मळा भागातील पहिल्या ऑक्सिजन पार्कमध्ये रविवारी वृक्षारोपण करुन या ५ हजार वृक्ष लागवड मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला.




प्रास्ताविकात लायन्स क्लब ऑफ बार्शी टाऊनचे अध्यक्ष महावीर कदम म्हणाले, पर्यावरण संवर्धनाची गरज लक्षात घेवून हा समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येत आहे. केवळ वृक्षरोपण करुन आम्ही थांबणार नसून हे सर्व ५ हजार वृक्ष जगले पाहिजेत या दृष्टिकोनातून काळजी देखील घेवू.

माजी पक्षनेते तथा मॉर्निंग सोशल क्लबचे अध्यक्ष विजय राऊत म्हणाले, एखाद्या भागात झाडे नसतील तर तो परिसर उजाड, भकास दिसतो. झाडांमुळे परिसराला हिरवागार व समृद्धता येते. पर्यावरण संतुलन साधण्यास मदत होते. क्लबचा हा उपक्रम स्तुत्य असून अध्यक्ष महावीर कदम व त्यांची टीम जिद्दी असून ते हा संकल्प तडीस नेतील, असा विश्वास व्यक्त करत उन्हाळ्यात झाडे जगवण्यास टँकर, पाणी याची गरज भासल्यास आपण क्लबला मदत करु, अशी ग्वाही दिली. लायन्स क्लब ऑफ बार्शी टाऊन मेगा इव्हेंटचे डिस्ट्रिक्ट कॅबिनेट अमित इंगोले यांनी याप्रसंगी मनोगत व्यक्त केले.

प्रारंभी विजय राऊत यांच्या हस्ते वृक्षारोपण करुन या मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. अतुल सोनिग्रा, वासुदेव ढगे, मुकुंद तांबारे, गौतम कांकरिया, डॉ. सागर हाजगुडे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. क्लबचे सचिव हेमंत जमदाडे यांनी सूत्रसंचालन केले. खजिनदार किरण आवटे यांनी आभार मानले.

# माजी आ. परिचारक यांच्या पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१४ ऑगस्ट-**



माजी आमदार सुधाकरपंत परिचारक यांच्या चतुर्थ पुण्यतिथी निमित्त पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यात पांडुरंग परिवाराच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या १९ ऑगस्ट रोजी (कै.) सुधाकरपंत परिचारक यांचे चतुर्थ पुण्यस्मरण आहे. या निमित्त पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यात पांडुरंग परिवारा वतीने आरोग्य तपासणी शिबिर, नेत्र तपासणी शिबिर, विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा, महिलांसाठी विशेष कार्यक्रम तसेच कार्यकर्ता जोडो संपर्क अभियान राबविण्यात येणार आहे. पांडुरंग परिवाराच्या वतीने महिलांसाठी लाडकी बहिण किंवा लेक लाडकी आदी सरकारी योजनेचा अर्ज भरून देण्यात येणार आहेत. या बरोबरच महिलांना आधार कार्ड काढून देणे आदी विविध कार्यक्रमांचे देखील आयोजन करण्यात आले असल्याचे पांडुरंग परिवाराच्या वतीने सांगण्यात आलेले आहे.

# सांगोल्यात ऑन दी स्पॉट ३४५ तरुणांना नोकरी

## आ. शहाजीबापू पाटील यांच्या संकल्पनेतून नोकरी महोत्सव



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १४ ऑगस्ट-**

राजर्षी शाहू महाराज क्रीडा व शिक्षण प्रसारक मंडळ,चिकमहुद यांच्या वतीने तसेच आ. शहाजीबापू पाटील यांच्या संकल्पनेतून सांगोल्यात रविवारी इयत्ता पाचवी ते पदवी पर्यंतच्या बेरोजगार तरुणांसाठी भव्य नोकरी महोत्सवात ७८५ बेरोजगार तरुणांनी नोदणी केली होती. मुलाखती नंतर ३४५ तरुणांना ऑन दि स्पॉट नोकरीचे पत्र देण्यात आले. त्यांना १५ हजारांपासून ४० हजारांपर्यंत प्रती महिना वेतन मिळणार आहे. यावेळी नवी मुंबईचे जिल्हाप्रमुख तथा सांगोला विधानसभा निवडणूक प्रभारी विजय चौगुले म्हणाले, बेरोजगार तरुणांना नोकरीची संधी उपलब्ध करून देण्यासाठी नोकरी महोत्सवाचे आयोजन करून शेकडो कुटुंबांचे संसार उभे करण्याचा प्रयत्न आ.शहाजीबापू पाटील यांनी केला आहे. यामुळे शेकडो तरुणांच्या आई वडिलांचे स्वप्न साकार होणार आहे.विकास कामांच्या जोरावर शहाजीबापू तुमचा विजय पक्का आहे असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी आ.शहाजीबापू पाटील यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दादासाहेब लवटे यांनी केले. यावेळी माजी नगराध्यक्ष रफिकभाई नदाफ, दिग्विजय पाटील, धनंजय काळे, दादासाहेब लवटे, सागर पाटील, गुंडादादा खटकाळे, प्रीतीश दिघे, प्रा.संजय देशमुख, समीर पाटील, आनंदा माने, शिवाजी घेरडे, मुबिना मुलाणी, राणी माने, छाया मेटकरी, अप्सरा ठोकळे, अस्मिर तांबोळी, ज्ञानेश्वर तेली, अभिजीत नलवडे, सुभाष इगोले, दादासाहेब वाघमोडे, अजिंक्य शिंदे, सोमेश यावलकर, शिवाजीराव बाबर, जगदीश पाटील, धनंजय बागल, सत्यवान मोरे, विजय इंगोले, दीपक ऐवळे यांच्यासह शिवसेनेचे कार्यकर्ते उपस्थित होते.

### ३५ हजार वह्या वाटपाचा शुभारंभ

आ.शहाजीबापू पाटील यांनी ३५ वर्षाच्या राजकीय प्रवासात गोरगरीब, गरजू, कष्टकरी, कामगार, मजूर, दीनदलित, उपेक्षित, वंचित घटकांसह शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यास प्राधान्य दिले. आ.शहाजीबापू पाटील यांच्या कार्याचा वारसा जोपासण्यासाठी तसेच शिवसेना विद्यार्थी संघटनेच्या संकल्पनेतून शिवसेना विद्यार्थी संघटनेचे जिल्हाप्रमुख प्रितेश दिघे यांच्या वतीने स्वखर्चातून जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना ३५ हजार वह्यांचे वाटप करण्यात येणार आहेत.

# सुरत-चेन्नई एक्स्प्रेस; संपूर्ण गावच हायकोर्टात

## परांडा तालुक्यातील शेतकरी एकवटले; भूसंपादन विरोधात देशातील पहिली घटना

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ऑगस्ट**



परांडा तालुक्यातील संपूर्ण जाके पिंपरी येथील शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सुरत-चेन्नई ग्रीनफील्ड एक्सप्रेस हायवे प्रकल्पाला उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे.

सुरत-चेन्नई ग्रीनफील्ड एक्स्प्रेस हायवे प्रकल्पाला आव्हान देणारी याचिका महाराष्ट्रातील एका गावातील ४१ शेतकऱ्यांनी एकत्र येऊन उच्च न्यायालयात दाखल केली आहे. अधिवक्ता जाधव आणि सुरत-चेन्नई ग्रीनफिल्ड एक्सप्रेस हायवे शेतकरी संघर्ष समितीच्या माध्यमातून दाखल करण्यात आलेल्या याचिकेत प्रकल्पाच्या अंमलबजावणीमध्ये अनेक विसंगती असल्याचा आरोप करण्यात आला आहे. उपस्थित केलेले प्रमुख मुद्दे- बाजार भावाने दर व थेट वाटाघाटीचे भूसंपादन हवे. जमिनीच्या मोजमापात तफावत. बागायती आणि बिगर बागायती जमिनीचा हिशेब नाही. शेतकऱ्यांनी दाखल केलेल्या हरकती फेटाळल्या. अवॉर्ड चुकीची तयारी. मोजमाप नकाशांमध्ये इमारती, विहिरी आणि झाडांच्या खुणा यासारखे आवश्यक तपशील वगळणे. तालुक्यात गाव बाधित असल्याने अन्यायकारक वागणूक. याचिकाकर्ते त्यांच्या जमिनीला न्याय आणि योग्य मोबदला मिळावा, अशी मागणी करत आहेत. हे प्रकरण उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात प्रलंबित असून त्यावर लवकरच सुनावणी अपेक्षित आहे. शेतकऱ्यांचा हा एकत्रित प्रयत्न प्रकल्पाच्या अंमलबजावणीतील कथित अन्यायाविरुद्ध लढण्याचा त्यांचा निर्धार दर्शवतो. सुरत-चेन्नई ग्रीनफिल्ड एक्सप्रेस हायवेमध्ये अखे गाव एकवटले. तब्बल ४१ शेतकरी हायकोर्टामध्ये याचिका दखल केली. लवकरच सुनावणी होणार आहे. या गावचे वैशिष्ट्य म्हणजे परंडा तालुक्यातील जाके पिंपरी हे गाव असून या गावातील बरीचशी मंडळी मुंबई, पुणे ,लातूर अशा शहरांमध्ये स्थायिक आहेत. तसेच अनेक शेतकरी सुशिक्षित असून गावांमधील अनेक लोक सरकारी नोकरीमध्ये आहेत. राईट टू प्रॉपर्टी या संविधानातील अधिकारानुसार याचिका दाखल आहे.

### लवकरच होणार सुनावणी

तालुक्यातील एकमेव सजग गाव ठरलेले आहे. सदर याचिकेचे कामकाज प्रसिद्ध ॲड. जाधव व सुरत-चेन्नई ग्रीन फील्ड एक्सप्रेस हायवे शेतकरी संघर्ष समिती यांच्यावतीने उच्च न्यायालय संभाजीनगर खंडपीठामध्ये दाखल असून सुनावणीच्या प्रतिक्षेत आहे. लवकर सुनावणी होणार आहे.

# माढा विधानसभेचा तीस वर्षात विकास खुंटला

## चेअरमन अभिजीत पाटील : माढा तालुक्यात यूपीएससी आणि एमपीएससी उपळाई पॅटर्न राबवणार

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर,दि.१४ ऑगस्ट-**

गेल्या काही महिन्यापासून आपण माढा विधानसभा मतदार संघात दौरे करीत आहोत ते करताना माढा विधानसभा मतदार संघाचा गेल्या तीस वर्षात म्हणावा तसा विकास झाला नसल्याचे दिसून येत आहे. यामुळे आगामी काळात माढा विधानसभा मतदार संघात परिवर्तन घडविण्यासाठी मतदार निश्चितपणे आपणास सहकार्य करतील, असे विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी सांगितले.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर चेअरमन अभिजीत पाटील यांनी पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघ व माढा विधानसभा मतदार संघावर आपले लक्ष केंद्रित केले आहे. दोन्ही विधानसभा मतदार संघात त्यांनी दौरे सुरू केले आहेत. मात्र नक्की ते कोणत्या विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविणार याबाबत अद्याप निर्णय जाहीर केलेला नाही. या पार्श्वभूमीवर दैनिक सोलापूर तरुणभारतशी बोलताना चेअरमन अभिजीत पाटील यांनी माढा मतदार संघातील एक ना अनेक समस्यांचा जणू पाढाच वाचुन दाखविला. अभिजीत पाटील म्हणाले, विठ्ठल सहकारी साखर कारखान्यास माढा विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्याकडून मोठ्या प्रमाणात ऊसपुरवठा करण्यात आलेला आहे. त्यावेळी अनेक शेतकऱ्यांनी माढा विधानसभा मतदार संघात शेतकऱ्यांची गळचेपी केली जात असल्याचे आपणाला सांगितले आहे. या बरोबरच विद्यमान लोकप्रतिनिधींकडून



उसाचे राजकारण करण्यात येत आहे. त्यामुळे या भागातील शेतकरी त्रस्त झाला असल्याचे सांगितले.

माढा विधानसभा मतदारसंघात नागरिकांना अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा मिळाव्यात म्हणून मोठे हॉस्पिटल नाही. शिक्षणासाठी मोठमोठे महाविद्यालये नाहीत त्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी सोलापूर, पुणे आणि मुंबई अशा मोठ्या शहरात जावे लागत आहे.

निसर्गाच्या सौंदर्यात फिरण्यासाठी नागरिकांना एखादा बगीचाही नाही. यामुळे माढा विधानसभा मतदार संघाचा म्हणावा तसा विकास झाला नाही. आदी बाबींमुळे माढा भागातील शेतकरी व नागरिक त्रस्त झाले आहेत.

माढा विधानसभा मतदार संघातील उपळाई गावातील अनेक तरुण एमपीएससी आणि यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण झाले असून ते शासकीय सेवेत काम करीत आहेत. याचा फायदा घेऊन उपळाई गावात लोकप्रतिनिधींनी एखादे केंद्र सुरू करून या ठिकाणी यूपीएससी व एमपीएससी परीक्षेत बसलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन सुरू केले असते तर या भागातील तरुण आज मोठ्या संख्येने प्रशासकीय सेवेत दिसले असते. या बरोबरच या तरुणांकडून माढा आणि परिसराच्या विकासास हातभार लागला असता. या भागात जर मार्गदर्शन केंद्र सुरु झाले असते तर देशभरातून विद्यार्थी या ठिकाणी शिक्षणासाठी आले असते यातून उपळाईची वेगळी ओळख निर्माण झाली असती असेही अभिजीत पाटील यांनी सांगितले.

### आगामी निवडणुकीत बदल घडविण्याचे मतदारराजाचे संकेत

विद्यमान लोकप्रतिनिधींच्या उदासीन भूमिकेमुळे माढा विधानसभा मतदार संघात कोणतेही विकासाचे काम झाले नाही. पाणी व ऊस एवढ्या पुरतेच इथल्या लोकप्रतिनिधींकडून राजकारण करण्यात आले आहे. यामुळे शेतकरी व नागरिक त्रस्त झाला असून आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बदल घडविण्याचे त्यांच्या कडून संकेत दिले आहेत असेही चेअरमन पाटील यांनी सांगितले.



सोलापूर : दैनिक तरुण भारतच्या मुख्य संपादकपदी पदोन्नती झाल्याबद्दल प्रशांत माने यांना शुभेच्छा देताना मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष प्रा. जी. के. देशमुख, निवृत्त वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा शहराध्यक्ष सूर्यकांत पाटील, जिल्हा सदस्य नानासाहेब साठे.



सोलापूर : दैनिक तरुण भारतच्या मुख्य संपादकपदी पदोन्नती झाल्याबद्दल प्रशांत माने यांचा सत्कार करताना ज्येष्ठ पत्रकार श्रीकांत कांबळे आणि ॲड. गोविंद पाटील



सोलापूर : दैनिक तरुण भारतच्या मुख्य संपादकपदी पदोन्नती झाल्याबद्दल मुख्य संपादक प्रशांत माने यांचा सत्कार करताना कुंभारीचे उद्योजक व आडत व्यापारी गजानन होनराव, पत्रकार ईरण्णा गंचिनगोटे, मनोहर बायणी.



पंढरपूर: स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर विठ्ठल मंदिरावर तिरंगी रोषणाई करण्यात आली आहे.


# स्वातंत्र्य दिनीही विद्यार्थी गणवेशाविनाच

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १४ ऑगस्ट-**

महाराष्ट्र शासनाने यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून एक राज्य एकच गणवेश हे धोरण अमलात आणले.सदर गणवेशाचे कापड देऊन ते शिवण्याचे टेंडर बचत गटांना देण्यात आले. परंतु बचत गटाकडून तालुकास्तरावर शाळांच्या मागणीनुसार गणवेशच उपलब्ध झालेच नाहीत.



स्वातंत्र्य दिनाच्या अगोदर एक दिवस सदरचे गणवेश शाळेत पोहच करण्यात आले खरे पण अनेक शाळेतील विद्यार्थी संख्येनुसार गणवेश मिळालेच नाहीत. यामुळे अनेक विद्यार्थी गणवेशापासून वंचीतच राहिले आहेत. तसेच अनेक विदयार्थीना योग्य मापाचे गणवेश मिळालेच नाहीत तर गणवेशाचे कापड अतिशय हलके आहे. यामुळे याचा दर्जा अतिशय निकृष्ट आहे. अनेक शाळांना गणवेश कमी मिळाल्यामुळे अनेक शाळेतील विद्यार्थ्यांना यंदाचा स्वातंत्र्य दिन गणवेशाविनाच होणार आहे हे निश्चित आहे. शासनाने गणवेशाविषयी घेतलेले एक राज्य एक गणवेश हे पूर्णपणे अपयशी ठरले असुन शासनाच्या या धोरणामुळे पालक, विद्यार्थी यामध्ये मोठि नाराजी पसरली आहे. पुर्वी शाळेच्या खात्यावर पैसे पाठवुन शालेय स्तरावर गणवेश खरेदी केले जात होते. यामुळे सर्व विद्यार्थ्यां दर्जेदार गणवेश मिळत होते. पण शासनाच्या हया धोरणामुळे अनेक विद्यार्थी ऐन स्वातंत्र्य दिनादिवशी गणवेशाविना वंचित राहिले. शासनाची ही योजना पूर्णपणे फसली आहे.


















CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## भूम नगर परिषदेच्या वतीने हर घर तिरंगाची जनजागृती

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१४ ऑगस्ट -**

येथील नगर पालिका कार्यालयाच्या वतीने हर घर तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नगर पालिके पासून या रैलीची सुरुवात करण्यात आली.

भूम शहरातील विविध भागातून ही रॅली काढण्यात आली. केंद्र शासनाच्या वतीने हर घर तिरंगा हे अभियान राबविण्यात येत आहे. त्यानिमित्त जनजागृती करण्यात येत आहे.

यावेळी नगर अभियंता गणेश जगदाळे, केशव पवार, विवेक बिराजदार, तुकाराम माळी, प्रकाश गाढवे, राजेंद्र आहेरकर, तारकेश्वरी शिराळकर यांच्यासह नगर पालिका, अंगणवाडी सेविका, पाणी पुरवठा, स्वच्छता विभाग कर्मचारी व कार्यालयीन कर्मचारी हजर होते.





https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

### ▶▶ संक्षिप्त वृत्त...



#### तेर येथे विधी साक्षरता शिबिर संपन्न

**तेर, दि.१४ ऑगस्ट -**

डॉ. बापूजी साळुंखे विधी महाविद्यालय धाराशिव व स्विसेड प्रकल्प यांच्या वतीने धाराशिव तालुक्यातील तेर येथील महाराष्ट्र संत विद्यालय येथे बालविवाह प्रतिबंध कायदा जनजागृतीपर विधी साक्षरता शिबिर १३ ऑगष्टला आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र संत विद्यालयाचे मुख्याध्यापक जे.के. बेदरे होते. यावेळी बालविवाह प्रतिबंधक कायद्याविषयी कृतिखेळाद्वारे मार्गदर्शन विद्यार्थिनींना करण्यात आले. यावेळी डॉ. संजय आंबेकर, एस.एस. पाटील, चव्हाण लक्ष्मण यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रमुख वक्ता म्हणून श्रुती जाधव हिने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच आरती जाधव, गौरी ढोबळे, ऋतुजा तावरे यांनी संवादद्वारे बालविवाह विषयी माहिती दिली. कार्यक्रमाचे आभार तनिष्क कुंभार यांनी मानले. यावेळी सुदर्शन ढोबळे, चैतन्य ढोबळे, बालाजी गुरव, अपेक्षा माळी व विद्यार्थींनी उपस्थित होत्या.

#### गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी गायकवाड

**नळदुर्ग, दि.१४ ऑगस्ट -**



नळदुर्ग येथील जय हिंद तरुण गणेश मंडळाच्या (व्यासनगर) अध्यक्षपदी संदीप गायकवाड यांची निवड करण्यात आली असुन त्यांच्या निवडीचे सर्वांनी स्वागत केले आहे. आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभुमीवर नळदुर्ग येथील जय हिंद तरुण गणेश मंडळाची (व्यासनगर) बैठक नुकतीच संपन्न झाली. यात मंडळाची नविन कार्यकारीणी निवडण्यात आली. उपाध्यक्ष वैभव पाटील, बंटी बताले, खजिनदार नितीन कुलकर्णी, पिंटु जाधव, सचिव पिटू पुराणिक यांची निवड करण्यात आली. या बैठकीस मंडळाचे सदस्य शंकर भाळे, नवल जाधव, सचिन गायकवाड, प्रविण चव्हाण, अमोल वऱ्हाडे, अमोल मेंडके, प्रसन्न कदम सुरज गायकवाड, राहुल चव्हाण, अभिजित लाटे, विशाल कलशेट्टी यांच्यासह मंडळाचे सदस्य उपस्थित होते.



#### जयप्रकाश विद्यालयात मोफत एसटी पासचे वाटप

**धाराशिव, दि.१४ ऑगस्ट -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे विद्यार्थिनींना मोफत एस.टी. पासचे वाटप करण्यात आले. डॉ. आंबेडकर बालविकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षणमहर्षी सुभाष कोळगे, धाराशिवचे आगार प्रमुख बालाजी भांगे, राजनारायण कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, यांच्या हस्ते एस.टी. पासचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी रामदास कोळगे, बालाजी कोळगे, प्राचार्य संतोष कपाळे, वाहतूक नियंत्रक कोळी डी.डी., माने पी.आर., कस्पटे, बनसोडे, क्षिरसागर, चांदणे, प्रशासकिय अधिकारी शिवकन्या साळुंके, मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक डोंगरे के.ए., शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपास्थित होते.

#### जळकोट ग्राम पंचायत कार्यालयात ध्वजारोहण

**जळकोट, दि.१४ ऑगस्ट -**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथे ग्रामपंचायत कार्यालयाच्या प्रांगणात ग्रामपंचायत सदस्य जीवन लिंबाजी कुंभार यांच्या हस्ते सकाळी ८.१५ वाजता ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी सरपंच, ग्रा.वि. अधिकारी, ग्रा.पं.सदस्य, माजी सैनिक, ज्येष्ठ नागरिक व सर्व ग्रामस्थ होते.



#### एकलव्य आश्रम शाळेचा कबड्डी संघ तालुक्यातून पहिला

**तुळजापूर, दि.१४ ऑगस्ट -**

तालुकास्तरीय शालेय कबड्डी क्रीडा स्पर्धा दि.१२ ऑगस्ट रोजी सैनिकी विद्यालय तुळजापूर येथे पार पडल्या. या स्पर्धेमध्ये आपल्या एकलव्य विद्या संकुलातील विद्यार्थ्यांनी १४ वर्ष वयोगट मुलांमध्ये प्रथम क्रमांक व १७ वर्ष वयोगट मुलांमध्ये तृतीय क्रमांक मिळवून यश संपादन केले. प्रथम क्रमांक मिळवलेल्या संघाची पुढे होणाऱ्या जिल्हा स्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या सर्व खेळाडूंचे व क्रीडा शिक्षक ज्ञानेश्वर भुतेकर, कबड्डी प्रशिक्षक यशवंत निंबाळकर, बालाजी क्षीरसागर यांचे संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र वैदू, कार्यवाह, विवेक आयचीत, उपाध्यक्ष डॉ. अभय शहापूरकर, मुख्याध्यापक अण्णासाहेब कोल्हटकर, विठ्ठल म्हेत्रे, संस्थेचे संचालक मंडळ व क्रीडा समितीचे सर्व सदस्य व सर्व कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

## नविन पाणीपुरवठा योजनेच्या कामाचा आ. राणादादांच्या हस्ते शुभारंभ



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१४ ऑगस्ट -**

नळदुर्ग शहरात येत्या कांही दिवसात अतिरीक्त तहसिल कार्यालय सुरु करण्यासाठी काम सुरु असुन ही गोड बातमी नळदुर्गकरांना लवकरच ऐकायला मिळणार आहे. त्याचबरोबर ऐतिहासिक नळदुर्ग शहराला तालुक्याचा दर्जा मिळावा यासाठी आपला प्रयत्न असल्याचे आमदार राणाजगजिसिंह पाटील यांनी नळदुर्ग येथे नविन पाणीपुरवठा योजनेचा शुभारंभ करताना सांगितले.

आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या अथक प्रयत्नातुन नळदुर्ग शहरासाठी केंद्र व राज्य सरकार पुरस्कृत अमृत २.० या योजनेअंतर्गत ४३ कोटी ६१ लाख रुपये खर्चाची नविन पाणीपुरवठा योजना मंजुर झाली आहे. या पाणीपुरवठा योजनेमुळे नळदुर्ग शहराचा अनेक वर्षांपासुन प्रलंबित असलेला पाण्याचा प्रश्न कायमचा मिटणार आहे. आज नळदुर्ग शहरात आठ ते दहा दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. मात्र ही योजना पुर्ण झाल्यानंतर नळदुर्ग शहरात दररोज पाणीपुरवठा होणार आहे. दि.१३ ऑगस्ट रोजी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते नळदुर्ग शहर नविन पाणीपुरवठा योजनेच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमच्या अध्यक्षस्थानी नळदुर्ग शहरातील जेष्ठ नागरीक राजाभाऊ ठाकुर हे होते.



तर प्रमुख पाहुणे म्हणुन भाजपचे सुशांत भुमकर, संजय बताले, नय्यर जहागिरदार, सुधीर हजारे, गणेश सोनटक्के, ॲड. दीपक आलुरे, सिद्धेश्वर कोरे, श्रमिक पोतदार, धिमाजी घुगे, संजय जाधव, विनायक पुदाले आदीजन उपस्थित होते. प्रारंभी नळदुर्ग शहरवासियांच्या वतीने शहरासाठी नविन पाणीपुरवठा योजना मंजुर करून आणल्याबद्दल आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले की, नळदुर्ग शहराच्या सर्वांगिण विकासासाठी आणखी भरपुर काम करायचे हे करण्यासाठी नळदुर्गकरांनी मला साथ द्यावी. लोकसभा निवडणुकीत झालेल्या मतदानंतर मन व्यथित झाले होते. मात्र ज्या चार लाखापेक्षा जास्त मतदारांनी आम्हाला मतदान केले. त्यांच्यासाठी पुन्हा जोमाने काम करण्यास सुरवात केले. येणाऱ्या काळात नळदुर्ग शहरात बसवसृष्टी, माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक व शहीद जवान बचित्तर सिंह यांचे स्मारक उभारणीचे काम होणार आहे. त्याचबरोबर नळदुर्ग येथील ऐतिहासिक किल्ल्यात मोठ्या संख्येने पर्यटक यावेत यासाठीही काम करण्यात येणार असुन या सर्व कामांमुळे नळदुर्गचा कायापालट होणार आहे. तसेच होर्टी येथे २५० एकर जागेवर लवकरच औद्योगिक वसाहत उभारण्यात येणार आहे. त्याचबरोबर नळदुर्ग शहरालगत लहान औद्योगिक वसाहात उभारण्यासाठी काम सुरु असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

नळदुर्ग शहराला मंजुर झालेल्या नविन पाणीपुरवठा योजनेचे काम दर्जेदार व लवकर पुर्ण होण्यासाठी आमचा प्रयत्न आहे. या योजनेचे काम चांगले व्हावे यासाठी शहरातील प्रत्येक नागरीकांने लक्ष देणे गरजेचे आहे असेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार सुनिल बनसोडे यांनी मानले. या कार्यक्रमास नागरीक उपस्थित होते.

## जनतेच्या सेवेसाठी विधानसभा निवडणूक लढविणार : स्वामी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ ऑगस्ट -**

उमरगा व लोहारा तालुक्यामध्ये शासकीय योजना पोहोचविण्यात आजपर्यंतचे आमदार असमर्थ ठरले आहेत. ते फक्त इतक्या कोटी रुपयांचा निधी आणला अशी पत्र दाखवीत आहेत. मात्र त्या निधीतून कोणाचा व कोणत्या भागाचा विकास झाला? हे अद्याप जनतेला दिसलेले नाही. शासकीय नोकरीत असल्यापासूनच मी सर्वसामान्य जनतेशी जोडलेला असून त्यांचे अनेक प्रश्न सोडविले आहेत. ते सोडविण्यासाठी काय करावे लागते ? याची मला पूर्णपणे जाणीव आहे. त्यामुळे तळागाळातील जनतेच्या सेवेसाठी मी उमरगा-लोहारा विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविणार असल्याची घोषणा सातलिंग स्वामी यांनी केली.

धाराशिव येथील शासकीय विश्राम गृहात १४ ऑगस्ट रोजी पत्रकार परिषदेत त्यांनी ही घोषणा केली. यावेळी संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष अण्णासाहेब पवार, भीमाशंकर यादगौडा, विजय स्वामी व संजय रेणुके आदी उपस्थित होते. पुढे बोलताना स्वामी म्हणाले की, उमरगा व लोहारा तालुक्यातील शेतकरी, कष्टकरी, महिला, कामगार व दिव्यांग यांना शासकीय योजनेचा आजपर्यंत लाभ मिळालेला नाही किंवा त्यासाठी संबंधितांनी प्रयत्न केलेले नाहीत. त्यामुळे या दोन्ही तालुक्यातील हजारो नागरिक विकासापासून वंचित राहिलेले आहेत. जनतेच्या विविध कामासाठी आजपर्यंत मदत केली असल्यामुळे सर्व समाजाच्या नागरिकांशी माझा थेट संपर्क असून त्या योजना त्यांना कशा मिळवून द्यायच्या? याची मला पूर्णपणे जाणीव असल्याचे त्यांनी नमूद केले.

लोहारा तालुक्याची निर्मिती होऊन बरीच वर्षे झाली असली तरी त्या ठिकाणी अनेक शासकीय कार्यालये व बस स्थानक नाही. तर उमरगा येथील एमआयडीसीत उद्योग नसल्यामुळे मी निवडून आल्यास या भागाचा विकास करण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करून ते काम पूर्णत्वास नेणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच दोन्ही तालुक्यात विविध विकासाच्या योजना आणण्याबरोबरच एमआयडीसीमध्ये उद्योग उभा करून तरुणांच्या हाताला रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी मी निश्चितपणे शेवटपर्यंत पाठपुरावा करणार असल्याचे आश्वासन त्यांनी दिले.

## बांग्लादेशातील हिंदूवरील अत्याचाराच्या निषेधार्थ शिराढोण ग्रामस्थांकडून निषेध रॅली



**तभा वृत्तसेवा**
**शिराढोण, दि.१४ ऑगस्ट -**

बांगलादेशात हिंदू महिला, तरुण, आणि बालकांवर होणाऱ्या पाशवी अत्याचारांच्या निषेधार्थ आज कळंब तालुक्यातील शिराढोण येथे सकल हिंदू समाजाच्या वतीने शांतता रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. गावातील प्रतिष्ठित नागरिकांनी पुढाकार घेत या रॅलीतून हिंदू समाजाला जागरूक करण्याचे महत्वपूर्ण काम केले.

रॅलीची सुरुवात शिराढोण नगरीचे ग्रामदैवत श्री ढोनेश्वर बाबा मंदिरापासून झाली आणि ती ग्रामपंचायतपर्यंत शांततेत पार पडली. या रॅलीच्या माध्यमातून गावकऱ्यांनी एकत्र येऊन हिंदू बांधवांवरील अत्याचारांचा तीव्र विरोध दर्शवला. या प्रसंगी, बांगलादेशातील हिंदूंच्या पुनर्वसनासाठी भारत सरकारने NRC आणि C कायद्याअंतर्गत त्वरित पावले उचलावीत, अशी प्रमुख मागणी करण्यात आली.

गावातील मोठ्या संख्येने हिंदु बांधव व प्रमुख व्यक्तींनी उपस्थित राहून सकल हिंदू समाजाच्या एकात्मतेचे प्रतीक म्हणून रॅलीत सहभाग घेतला. शिराढोण गावातील महिला, पुरूष मोठ्या संख्येने यात रॅलीत सहभागी झाले होते.

## पत्रकारांना न्याय मिळवून देण्यासाठी 'पत्रकार संवाद यात्रा' : वसंत मुंडे



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.१४ ऑगस्ट -**

ग्रामीण भागातील माध्यम व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने दीक्षाभूमी ते मंत्रालय अशी ४००० किलोमीटर अंतराची पत्रकार संवाद यात्रा काढण्यात आली आहे, अशी माहिती पत्रकार संघाचे अध्यक्ष वसंत मुंडे यांनी दिली.

येरमाळा येथे विद्यानिकेतन इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये आयोजित पत्रकार संवाद मेळाव्यात ते बोलत होते. पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, मराठवाडा विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी, कळंब तालुका अध्यक्ष दिपक बारकुल, सचिन पाटील, अशोक शिंदे, बाळासाहेब जाधवर, सचिन बारकुल, दत्ता बारकुल, दीपक बारकुल, संतोष बारकुल, सुधीर लोमटे, सुखदेव गायके, दत्ता गायके, तानाजी बारकुल आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

यावेळी प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे व राज्य सरचिटणीस डॉ. विश्वास आरोटे यांचा सत्कार करण्यात आला. येरमाळा येथील येडेश्वरी देवीचे दर्शन घेऊन ही पत्रकार संवाद यात्रा पुढे तुळजापूर येथे रवाना झाली.

### जळकोट येथे महिला ग्रा.पं. सदस्यांच्या हस्ते ध्वजारोहण

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.१४ ऑगस्ट -**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथे गावच्या इतिहासात प्रथमच एका महिला ग्रामपंचायत सदस्याला ध्वजारोहणाचा मान देण्यात आला.

हर घर तिरंगा कार्यक्रमांतर्गत येथील ग्रामपंचायत कार्यालयाच्या प्रांगणात दुसऱ्या दिवशीचा ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला. सकाळी ८.१५ वाजता गावच्या इतिहासात प्रथमच महिला ग्रामपंचायत सदस्य सुरेखा माळगे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. एक प्रकारे महिलांना सन्मान देण्यात आला. या ध्वजारोहण कार्यक्रमास सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शाळेचे विद्यार्थी, शाळेचे शिक्षक, मुख्याध्यापक, युवक, महिला, शेतकरी, आशा कार्यकर्त्या, ग्रामस्थ, ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

## एकही सोयाबीन उत्पादक शेतकरी अनुदानापासून वंचित राहू नये याची दक्षता घ्या : आ. चौगुले

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१४ ऑगस्ट -**

खरीप हंगाम २०२३ मधील सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. यासाठी आवश्यक ई-पीक पाहणी केलेल्या सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या याद्या शासनामार्फत कृषी विभागास पाठविण्यात आल्या आहेत.



या अनुषंगाने आमदार ज्ञानराज चौगुले यांनी बुधवार दि.१४ रोजी व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारे रोजी ज्ञानोबा रितापुरे, तालुका कृषी अधिकारी, उमरगा व बी.एन. देवकते, प्रभारी तालुका कृषी अधिकारी लोहारा यांच्या समवेत बैठक घेत सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याच्या कामाचा आढावा घेतला. शेतकऱ्यांकडून अर्ज गोळा करण्याचे काम तात्काळ पूर्ण करावे व डाटा एन्ट्रीचे काम ही लागलीच सुरू करावे जेणेकरून आर्थिक सहाय्य शेतकऱ्यांच्या खात्यावर वेळेत वर्ग करता येईल अशा सूचना यावेळी त्यांनी दिल्या.

यावेळी कृषी विभागाच्या दोन्ही तालुका अधिकाऱ्यांनी राज्य सरकारकडून प्राप्त याद्या ग्राम पंचायत स्तरावर सूचना फलकावर डकविण्यात आल्याचे सांगितले व पात्र शेतकऱ्यांकडून आधार कार्ड व संमती पत्र, संयुक्त खातेदाराचे ना हरकत पत्र गोळा करण्याचे काम सुरू असल्याचे सांगितले. तसेच ई पिक पाहणी केली परंतु यादीमध्ये नाव नसल्या बाबत शेतकऱ्यांकडून विचारणा होत असल्याचे संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितले. याबाबत आ. ज्ञानराज चौगुले यांनी विभाग प्रमुखांना संबंधित शेतकऱ्यांचे विनंती अर्ज, ई-पिक पाहणी केलेला पुरावा म्हणून सातबारा उतारा, संमती पत्र व संयुक्त खातेदार असल्यास ना हरकत पत्र आपले स्तरावर घेण्याच्या सूचना दिल्या व याबाबत राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच कृषी धनंजय मुंडे यांचे निदर्शनास ही बाब आणून दिलेली आहे.सदरील शेतकऱ्यांनाही आर्थिक मदत मिळण्यासाठी पाठपुरावा करण्यार असल्याचे आ. ज्ञानराज चौगुले यांनी सांगितले आहे.

## आमचे सरकार आल्यावर दुधाला, कांद्याला, सोयाबीनला हमीभाव देवू : खा. सुप्रिया सुळे




**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१४ ऑगस्ट -**

प्रत्येक शेतकऱ्यांना सांगते आमचे सरकार आल्यावर तुमच्या दुधाला, कांद्याला, सोयाबीनला आम्ही भाव देऊ असा शब्द देते. या महाराष्ट्रात सगळ्यात जास्त भ्रष्टाचार झालेला आहे. भ्रष्टाचार मुक्त महाराष्ट्र करण्यासाठी जे काय करावे लागेल ते करेल. तुमच्या कुठल्याही रस्त्याला मी खड्डा पडू देणार नाही असे मत राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केले. दि.१३ ऑगस्ट रोजी परंडा येथे राजवीरा मंगल कार्यालय या ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या शिवस्वराज्य यात्रेच्या निमित्ताने आयोजित केलेल्या जाहीर सभेत सुळे बोलत होत्या.

त्यापुढे म्हणाल्या की, प्रत्येकाच्या सुख दुःखात वैशाली आणि राहुल मोटे हे अनेक वर्षे राहुन समाजकारण या भागात करतात. दुर्दैवाने मागच्या वेळेस अपेक्षित अस यश आले नाही आणि आधीच्या सगळ्या भाषणांमधून एक गोष्ट प्रकर्षाने लक्षात आली की राहुल मोटे तुम्ही आमदार झाल्या नसल्यामुळे आपल्या मतदारसंघात विकासाची गंगा जी वाहत होती, ती दुर्दैवाने थांबली आहे. हा बदल आपल्याला २०२४ मध्ये करावा लागेल, असेही खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या.

खा.डॉ. अमोल कोल्हे म्हणाले, देव देतोय संपत्ती भरपूर देतोय पण तिथली सरस्वती काय काम करीत नाही आणि मग काहीजण म्हणतात त्यांच्या खिशामध्ये एवढी संपत्ती आहे. महाराष्ट्र सुद्धा विकत घेण्याची भाषा करणारी लोक या ठिकाणी दिसतात असा टोला पालकमंत्री तानाजी सावंत यांना लगावला.

माजी आमदार राहुल मोटे म्हणाले परंडा मतदारसंघात तरुणांना एकत्रितपणे आपण घेऊन राजकारण केले. सर्व जाती-धर्माच्या लोकांना बरोबर घेऊन आपण राजकारण केले म्हणून तीन वेळा आमदार होण्याची संधी आपल्याला या ठिकाणी मिळाली असल्याची सांगत त्या काळामध्ये मतदारसंघात सिंचनाचे क्षेत्र वाढविण्यासाठी आपण प्रयत्न केला. या पाच वर्षांमध्ये आपल्या मतदारसंघात एक तरी नवीन पाझर तलाव स्टोरीज टँक झालेला आहे का? झालेला असेल तर मला सांगा असे म्हणत तानाजी सावंतवर सडकून टीका केली.

यावेळी खा. अमोल कोल्हे, माजी आमदार राहुल मोटे, युवक प्रदेश अध्यक्ष महेबूब शेख, वैशाली मोटे, जिवनराव गोरे, तात्यासाहेब गोरे, दादासाहेब पाटील, डॉ. प्रतापसिंह पाटील, सामाजिक न्याय विभागाचे प्रदेशाध्यक्ष पंडित कांबळे, ॲड. हेमा पिंपळे, तालुकाध्यक्ष संदिप पाटील, राहुल बनसोडे, नसीर शहाबर्फीवाले, श्रीहरी नाईकवाडी, नंदू शिंदे, गनिभाई हावरे, घणशाम शिंदे, अमोल जगताप, रविन्द्र जगताप, राखी देशमुख, खय्युम तुटके आदिसह राष्ट्रवादी पक्षाचे अनेक नेते उपस्थित होते.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### खा.सुप्रिया सुळे यांनी घेतले श्री तुळजाभवानी मातेचे दर्शन

**तुळजापूर, दि.१४ ऑगस्ट -**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या शिवस्वराज्य यात्रेनिमित्ताने तिर्थक्षेत्र तुळजापूर येथे आलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्याध्यक्षा सुप्रिया सुळे, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खा.अमोल कोल्हे यांनी श्रीतुळजाभवानी मंदीरात जावुन देविचा कुलधर्म कुलाचार करुन देविचरणी नतमस्तक होवुन मनोभावे दर्शन घेतले. यावेळी त्यांचे पुजेचे पौराहित्य पुजारी सुदर्शन पवार यांनी केले. यावेळी जेष्ठ नेते जीवनरव गोरे, राष्ट्रवादी युवतीच्या प्रदेशाध्यक्षा सक्षणा सलगर, जिल्हाध्यक्ष संजय दुधगावकर, संजय निंबाळकर, वैशालीताई मोटे, धर्यशिल पाटील नांदुरीकर, अमर मगर, दिलीप मगर, धनंजय पाटील अदि पदाधिकारी उपस्थित होते. श्रीतुळजाभवानी दर्शनानंतर बोलताना म्हणाल्या की, मी नित्यनियमाने दरवर्षी येते दर्शन घेते. श्रीतुळजाभवानी ही कर्ती करवती असल्याने मी तीला काय मागणार मी देविला नेहमीच प्रार्थना करते. राज्यात भरपूर पाऊस पडून माझा बळीराज्याला सुखी ठेव कारण बळीराजा सुखी असला तर सर्वकाही सुखी असतात.

### पालकमंत्री प्रा.डॉ.तानाजीराव सावंत यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण

**धाराशिव, दि.१४ ऑगस्ट -**



७८ व्या भारतीय स्वातंत्र्य दिनाचा मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रम जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणावर १५ ऑगस्ट रोजी सकाळी ९.०५ वाजता होणार आहे. पालकमंत्री प्रा.डॉ.तानाजीराव सावंत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येणार आहे. यावेळी स्वातंत्र्य सैनिक, लोकप्रतिनिधी, अधिकारी-कर्मचारी, पत्रकार बांधव,नागरिक व विद्यार्थी उपस्थित राहणार आहे.उपस्थितांना पालकमंत्री प्रा.डॉ.सावंत हे संबोधित करून स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा देतील.




### स्वातंत्र्य दिनानिमित्त एकलव्य विद्या संकुलात भाषण स्पर्धा संपन्न

**धाराशिव, दि.१४ ऑगस्ट -**

एकलव्य विद्या संकुल येथे स्वातंत्र्यदिनानिमित्त भाषण स्पधचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला परीक्षक व प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोरेवाडी या शाळेचे मुख्याध्यापक नागनाथ वाडणे होते.या स्पर्धेमध्ये इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलेला होता. इयत्ता पहिली ते चौथी या गटामध्ये प्रथम क्रमांक ज्ञानेश्वरी दत्ता भोजने, द्वितीय क्रमांक श्रावणी संतोष पाटोळे, तृतीय क्रमांक पियुष हरीष मगदूम इयत्ता पाचवी ते सातवी या गटात गटांमध्ये प्रथम क्रमांक आलेली आहे पार्वती मार्कड इयत्ता आठवी ते दहावी या गटामध्ये प्रथम क्रमांक आलेली आहे. सृष्टी गेनसिद्ध कोळी द्वितीय क्रमांक आलेली आहे. आरती मेंडके तृतीय क्रमांक आलेला आहे. शिवशंकर चव्हाण या कार्यक्रमाचे नियोजन निर्मला हुग्गे व प्रणिता शेटकार यांनी केले होते. तसेच या कार्यक्रमाची संकल्पना एकलव्य प्राथमिक आश्रम शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल म्हेत्रे व एकलव्य माध्यमिक आश्रम शाळेचे मुख्याध्यापक अण्णासाहेब कोल्हटकर यांची होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राची संतोष पाटोळे, साक्षी दुपार घोडे या दोघींनी केले. तर या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन चंचल पवार हिने मानले.



### शिवसेना उबाठाचे विभाग प्रमुख राहुल पाटील यांच्या वाढदिनी सामाजिक उपक्रम

**येरमाळा, दि.१४ ऑगस्ट -**

शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे युवक नेते तथा येरमाळा विभाग प्रमुख राहुल पाटील यांच्या वाढदिवसानिमीत्त जि.प.शाळेतील विद्यार्थ्याना टिफीन डब्बा भेट देऊन कार्यकर्त्यांनी त्यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा केला. जि.पच्या मुलांच्या आणि मुलींच्या शाळेमध्ये ३०० विद्यार्थ्यांना टिफीन डब्बे वाटप केले. फटाके, डिजीटल या अवांतर खर्चाला बगल देत व सामाजिक बांधीलकी ठेवुन समाजापुढे एक आदर्श वाढदिवस साजरा करण्यात आला याचा ग्रामस्थांनी आनंद व समाधान व्यक्त केले. यावेळी अनिल पवार, अमोल बापूसाहेब पाटील, गणराज देशमुख, परमेश्वर आगलावे, विभाग प्रमुख राहुल पाटील, हरुण तांबोळी, मुन्ना मोरे, अशोक साळुंखे, नदीम मुलानी, सचिन शिरसागर, दत्ता बारकुल, अनिल बारकूल, मुख्याध्यापक व शिक्षक कर्मचारी उपस्थित होते.

### बोस कॉलेजच्या विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड

**लोहारा, दि.१४ ऑगस्ट -**

लोहारा येथे झालेल्या तालुकाष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत नेताजी सुभाषचंद्र बोस कनिष्ठ महाविद्यालयातील प्रवीण पवार, संघदीप कांबळे सुमित भंडारे विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. विजयी खेळाडूंचा सत्कार प्राचार्या श्रीमती उर्मिला पाटील यांनी केला. संस्थेचे सचिव व प्राचार्य डॉ शेषेराव जावळे पाटील यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी क्रीडा विभाग प्रमुख प्रा.प्रशांत काळे, नागनाथ पांढरे, प्रा.विद्यासागर बुवा, प्रा गणेश कांबळे, प्रा.राजेंद्र साळुंके श्री अंकुश शिंदे, प्रा सचिन शिंदे,प्रा राजेशा अष्टेकर, प्रा.दगडू साठे, दत्तात्रय पांचाळ यांच्यासह सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# विधानसभा निवडणुकीत विरोधकांना चारीमुंड्या चीत करा : रावसाहेब दानवे

## धाराशिवत भाजपाचे जिल्हास्तरीय अधिवेशन व विस्तारित कार्यकारिणी बैठकीत दानवे यांचे आवाहन....



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ ऑगस्ट-**

विरोधकांनी अपप्रचार करुन जनतेत संभ्रम निर्माण केल्यामुळे लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रासह मराठवाड्यात भारतीय जनता पार्टीला अपेक्षित यश मिळाले नाही. हा जनादेश आपण स्वीकारला पाहिजे. त्याचबरोबर कार्यकर्त्यांनी येत्या विधानसभा निवडणुकीत विरोधकांना चारीमुंड्या चीत करण्यासाठी आता मोठ्या ताकदीने कामाला लागावे, असे आवाहन माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे पाटील यांनी केले.

धाराशिव येथे भाजपाचे जिल्हास्तरीय अधिवेशन व विस्तारित कार्यकारिणीची बैठक बुधवारी (दि.१४) स्वास्तिक मंगल कार्यालयात पार पडली. यावेळी ते बोलत होते. जिल्हाध्यक्ष संताजीराव चालुक्य पाटील यांच्या अध्यक्षतेखाली या अधिवेशन व विस्तारित कार्यकारिणी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी राज्यमंत्री तथा तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार राणाजगजितसिंह पाटील, मा.आ. सुजितसिंह ठाकूर, जिल्हाध्यक्ष संताजीराव चालुक्य पाटील, प्रदेश कार्यकारिणी सदस्य ॲड. मिलिंद पाटील, ॲड. अनिल काळे, ॲड. खंडेराव चौरे, ॲड. व्यंकटराव गुंड, भाजपाचे माजी प्रदेश उपाध्यक्ष बसवराज मंगरुळे, माजी जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, नितीन काळे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष, नेताजी पाटील, अस्मिता कांबळे, माजी उपाध्यक्ष सुधाकरराव गुंड, ज्येष्ठ नेते कोंडाप्पा कोरे, सुरेश देशमुख, माजी नगराध्यक्ष मधुकर तावडे, संपतराव डोके, मिलिंद पांगरकर, राहुल पाटील सास्तूरकर, प्रभाकर मुळे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष राजसिंह राजेनिंबाळकर व इतर मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना दानवे पाटील म्हणाले की, भारतीय जनता पार्टीला जिंकवायची ताकद कार्यकर्त्यांमध्ये आहे. लोकसभा निवडणुकीत अपेक्षित यश मिळाले नाही. त्यामुळे महाविकास आघाडी सत्ता आमचीच असल्याच्या अविर्भावात आहे. आता भाजपा कार्यकर्त्यांच्या मनात आणखी ताकद लावली असती तर यश मिळाले असते अशी भावना आहे. आतापर्यंत अनेक यश-अपयश पाहिलेली भारतीय जनता पार्टी आहे. एक गावचा सरपंच ते पंचायत समिती सदस्य, सभापती, आमदार, राज्यात आणि केंद्रात मंत्री असा माझा प्रवास केवळ भारतीय जनता पार्टीमुळेच झाला. भारतीय जनता पार्टीच सर्वसामान्य कार्यकर्त्याला न्याय देते. म्हणून कार्यकर्त्यांनी स्वयंप्रकाशित होऊन भारतीय जनता पार्टीच्या सरकारचे कार्य जनतेपर्यंत पोहचविले पाहिजे. त्यासाठी कार्यकर्त्यांनी स्वतःची ओळख निर्माण केली पाहिजे.

महायुती सरकारने लाडकी बहीण योजना राज्यात लागू केल्यानंतर विरोधक पैसे कुठून आणणार? असा सवाल करत आहेत. आम्ही लाडक्या बहिणीला दीड हजार रुपये महिन्याला देणार आहोत. त्याची तरतूद केलेली आहे. पण तुम्ही सत्तेत नसताना खटाखट खटाखट साडेआठ हजार रुपये कुठून देणार होतात? असा खडा सवालही यावेळी श्री.दानवे पाटील यांनी केला. पंडित नेहरु यांच्यानंतर सलग तिसर्यांदा देशाच्या प्रधानमंत्रीपदाचा बहुमान भारतीय जनता पार्टीला मिळालेला आहे हेच आपले यश असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनीही कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, पंडित दीनदयाळ उपाध्याय, डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी व भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करुन विस्तारित कार्यकारिणी बैठक व जिल्हास्तरीय अधिवेशनाचे उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाजपचे जिल्हाध्यक्ष संताजीराव चालुक्य पाटील यांनी केले. सूत्रसंचालन विकास कुलकर्णी तर आभारप्रदर्शन बाळासाहेब क्षीरसागर यांनी केले. अधिवेशनास भाजपा नेते सतीश दंडनाईक, इंद्रजित देवकते, प्रवीण पाठक, प्रदीप शिंदे, युवराज नळे, पांडुरंग लाटे, शिवाजीराव गवळी, रोहित देशमुख, ॲड.दीपक आलुरे, अभय इंगळे, उदय देशमुख, गणेश इंगळगी, सुनील पंगुडवाले, महिला मोर्चाच्या नंदाताई पुनगडे, मीना सोमाजी यांच्यासह धाराशिव, तुळजापूर, कळंब, वाशी, भूम, परंडा, उमरगा, लोहारा तालुक्यातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

### धाराशिवची जागा भाजपाच्या वाट्याला...

धाराशिव विधानसभा मतदारसंघाची जागा भारतीय जनता पार्टीला घेण्याचा एकमुखी ठराव या अधिवेशनात घेण्यात आला. धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर विधानसभा मतदार संघाची जागा भारतीय जनता पार्टीकडे असून तेथे राणाजगजितसिंह पाटील हे विद्यमान आमदार आहेत. धाराशिव-कळंब विधानसभा मतदारसंघातही भारतीय जनता पार्टीचे मोठे कार्य आणि प्राबल्य असल्यामुळे आणखी एक जागा भारतीय जनता पार्टीला मिळावी यासाठी या अधिवेशनात माजी प्रदेशाध्यक्ष रावसाहेब दानवे यांच्या उपस्थितीत हा ठराव घेण्यात आला. त्यामुळे धाराशिव व कळंब तालुक्यातील भाजपा कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. टाळ्यांच्या कडकडाटात या ठरावाचे कार्यकर्त्यांनी स्वागत केले.

### जिव्हाळ्याचे प्रश्न मार्गी लावले : सुजितसिंह ठाकूर

माझ्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्याला भारतीय जनता पार्टीने आमदारकीची संधी दिली. प्रदेश सरचिटणीस पदावरही काम केले. या काळात धाराशिव जिल्ह्याच्या जिव्हाळ्याचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी सतत पाठपुरावा केला. हे प्रश्न मार्गी लावण्यात रावसाहेब दानवे पाटील यांचा मोठा वाटा आहे.

धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वे मार्ग, मेडिकल कॉलेज, २५ वर्षापासून रखडलेल्या कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पाला पुनरुज्जीवन देण्याचे श्रेय भारतीय जनता पार्टीलाच आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांनी केंद्र व राज्य सरकारच्या लोकाभिमुख योजना जनतेपर्यंत पोहचवाव्यात, असे आवाहन माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांनी केले.

### भरघोस निधी मिळवून आणला : आ. राणादादा

धाराशिव जिल्ह्याच्या विकासासाठी भरघोस निधी मिळवून आणण्याचा प्रयत्न महायुती सरकारच्या काळात केला. त्यात मोठे यश मिळाले आहे. धाराशिव-तुळजापूर रेल्वे मार्गाचे काम सप्टेंबर महिन्यात सुरु होऊन तुळजापूर तीर्थक्षेत्र रेल्वेमार्गावर येईल. टेक्निकल टेक्स्टाईल पार्कचा विषयही मार्गी लागला आहे. त्याचबरोबर तामलवाडी, वाशी, होर्टी येथील एमआयडीसी प्रकल्पही लवकरच सुरु होतील. पर्यटनाच्या माध्यमातूनही मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करण्याचा प्रयत्न आहे. मराठवाड्यातील वर्ग २ मध्ये घेतलेल्या जमिनी पुन्हा वर्ग १ मध्ये घेण्याच्या महायुती सरकारने घेतल्याच्या निर्णयाचे त्यांनी यावेळी स्वागत केले.

# स्वाती शंकरराव बोरकर यांची शिवसेना (उबाठा) जिल्हा लोकसभा मतदारसंघ युवासेनेच्या युवती विस्तारकपदी निवड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ ऑगस्ट-**



शिवसेना (उबाठा) धाराशिव जिल्हा लोकसभा मतदार संघ युवासेना (युवती) विस्तारकपदी स्वाती शंकरराव बोरकर यांची निवड करण्यात आली आहे.

शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या मार्गदर्शनाने शिवसेना नेते, युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात युवासेना पदाधिकारी व युवती सेना विस्तारक निवडी जाहीर केल्या आहेत. यामध्ये स्वाती शंकरराव बोरकर यांना धाराशिव जिल्ह्यातून संधी मिळाली असून या निवडीचे कार्यकर्त्यांमधून स्वागत होत आहे.

धाराशिव जिल्ह्यातील लोकसभा मतदार संघांतील अकरा तालुक्यात मोठ्या प्रमाणात युवासेना (युवती) वाढविण्यासाठी स्वाती शंकरराव बोरकर यांची युवासेना युवती विस्तारक प्रमुखपदी निवड करण्यात आली आहे.

स्वाती ह्या शिवसेना पक्षाशी ते एकनिष्ठ असलेले प्रसिद्ध उद्योजक शंकरराव बोरकर यांच्या कन्या आहेत.

शंकरराव बोरकर यांनी वाशी तालुक्यातील इंदापूर येथे नृसिंह सहकारी साखर कारखान्याची उभारणी केली होती.

तेव्हा शिवसेनेच्या नेतृत्वाचा महाराष्ट्रातील पहिला साखर कारखाना म्हणून हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी शंकरराव बोरकर यांचे कौतुक केले होते. त्यामुळे शिवसेना आणि ठाकरे कुटुंबीयांशी बोरकर यांचे जवळीकीचे नाते आहे.

उद्योग सांभाळून शिवसेनेचे काम करत असताना आता बोरकर कुटुंबातील आणखी एक व्यक्ती शिवसेनेत सक्रिय झाली आहे.

शंकरराव बोरकर यांच्या कन्या स्वाती बोरकर त्यांच्या निवडीमुळे धाराशिव जिल्ह्यात शिवसेना (उबाठा) पक्षाचे संघटन अधिक मजबूत होईल, असा विश्वास कार्यकर्त्यांमधून व्यक्त होत आहे.

# डिजीटल क्रांतीवर स्वार होण्यासाठी युवकांनो सज्ज व्हा : ॲड.चौगुले

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१४ ऑगस्ट-**

जगामध्ये होत असलेल्या डिजीटल क्रांतीवर स्वार होण्यासाठी युवकांनी सज्ज राहीले पाहीजे. यापासुन आपल्याला आर्थिक व सामाजीक विकास घडवुन आणता येतो. महाराष्ट्र शासनाच्या वतीने गरजु युवकांसाठी संगणक कौशल्यावर आधारित अनेक अभ्यासक्रम मोफत स्वरूपात राबवले जातात. शासनाने युवकांच्या भविष्यासाठी संगणकाच्या माध्यमातुन 'सारथी' दिला आहे. याचा प्रत्येक विद्यार्थ्यांनी लाभ घेऊन आपले करिअर घडवावे, असे मत ज्ञानज्योती सामाजीक संस्थेच्या अध्यक्षा ॲड. आकांक्षाताई चौगुले यांनी व्यक्त केले.

मायक्रोकॉमच्या वतीने मराठा समाजासाठी असलेल्या सारथीच्या वतीने सुरू असलेल्या छत्रपती संभाजी महाराज सारथी डिजिटल एम्प्लॉयबिलिटी एन्हांसमेंट प्रोग्राम (उडचड-अएएझ) हा सहा महीने कालावधीचा डिप्लोमा यशस्वीरीत्या पुर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र वितरण सोहळा मायक्रोकॉम सभागृहात घेण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी रमेजा मोमीन, सुमय्या जमादार, प्रदीप साळूंके, करण राठोड, करीम तांबोळी, अनुपमा पाटील, प्रज्ञा मुलगे, स्वाती मुलगे, सानिया मुजावर, मानसी नंदर्गे, प्रतिक्षा बिराजदार, श्रावणी आम्ले, आकांक्षा पाटील, पुजा माने आदींनी यासाठी पुढाकार घेतला. यावेळी विद्यार्थी-पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सामाजिक विज्ञान विभागाकडून एका प्रदर्शनाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ ऑगस्ट-**


भारत-पाकिस्तान फाळणी स्मृति दिवसानिमित्त तुळजापूर येथील नवोदय विद्यालय येथे सामाजिक विज्ञान विभागाव्दारे एका प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रदर्शनात फाळणीच्या आठवणी चित्र बॅनर्सद्वारे शिवाय व्हिडिओ, पीपीटीद्वारे महिती सर्व विध्यार्थी, स्टाफ यांना दाखविण्यात आली. समाज प्रबोधनासाठी तुळजापूर येथील मान्यवर मंडळी, इतिहास संशोधक तसेच तुळजामाता इंग्रजी शाळेची ७९ मुले हे प्रदर्शन पाहण्यासाठी आली होती.

प्राचार्य के.वाय.इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे उद्घाटन व त्यात मार्गदर्शन तुळजापूर येथील प्रसिद्ध इतिहास संशोधक डॉ.सतिश कदम, अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. कार्तिक पौळ यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन सामजिक विज्ञान विभागाचे चक्रपाणि गोमारे आणि आभारप्रदर्शन डॉ.किशोर चौधरी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वरिष्ठ अध्यापक सचिन खोब्रागडे, संगीत अध्यापक पुरुषोत्तम जोशी, कला अध्यापक बस्वराज, निषाद भूत्ते यांनी सहकार्य केले.

# धाराशिवात तीन दिवसीय सौंदर्य कार्यशाळा उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ ऑगस्ट-**



धाराशिव येथील सौंदर्य एजन्सीच्या वतीने आयोजित तीन दिवसीय ब्युटी वर्कशॉप उत्साहात आणि यशस्वीरीत्या संपन्न झाले. या कार्यशाळेचे आयोजन ११ ते १३ ऑगस्ट दरम्यान श्री समर्थ हॉटेल येथे करण्यात आले होते.

कार्यशाळेचे विशेष आकर्षण म्हणजे प्रसिद्ध स्किन स्पेशलिस्ट मंजूसिंग यांचे उपस्थितीत प्रशिक्षण. मंजूसिंग यांच्या मार्गदर्शनाने महिलांना त्वचेसंबंधित विविध समस्यांचे समाधान तसेच सौंदर्यसाधनांच्या योग्य वापराच्या टिप्स मिळाल्या. धाराशिव सारख्या छोट्या शहरात देखील तज्ञांच्या मार्गदर्शनाची गरज ओळखून, सौंदर्य एजन्सीचे प्रमुख रमेश पाटील यांनी या वर्कशॉपचे आयोजन केले. धाराशिव जिल्ह्यातील महिलांसाठी हे वर्कशॉप एक सुवर्णसंधी ठरले. अशा प्रकारच्या कार्यक्रमांतून महिलांना प्रशिक्षित होण्याची संधी मिळाली आहे. एकूण २५ महिलांनी या कार्यशाळेत सहभाग घेतला.

कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनाबद्दल सहभागी महिलांनी आणि उपस्थितांनी सौंदर्य एजन्सीचे आभार मानले.

# जलशक्ती अभियानाच्या कॅच द रेन उपक्रमात सर्व यंत्रणांनी सहभाग नोंदवावा

### जलशक्ती अभियानाचे संचालक अशोककुमार यांचे निर्देश

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ ऑगस्ट-**



पाण्यासाठी एका सामुदायिक दृष्टिकोन तयार करुन परंपरागत जलस्त्रोतांच्या विकासाबरोबरच पाणी पुनर्भरण, पुनः उपयोग, ग्रे वाटर मॅनेजमेंट, जल संरक्षण, पर्जन्य जल संचयन आदि पद्धतींचा विकास अवलंब करुन जलशक्ती अभियानातंर्गत सुरु असलेल्या कॅच द रेन मोहिमेत सर्व यंत्रणांनी सहभागी होवून जिल्हयात ती सक्षमपणे राबवावी,असे निर्देश जलशक्ती अभियानाचे संचालक अशोककुमार यांनी दिले आहेत.

१४ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत अशोककुमार बोलत होते.

यावेळी प्रभारी अप्पर जिल्हाधिकारी शिरीष यादव, निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव, जलशक्ती अभियानच्या तांत्रिक अधिकारी सायली टेंभुर्णीकर, रोहयोचे उपजिल्हाधिकारी प्रविण धरमकर, मृद व जलसंधारण अधिकारी पी.के.महामुनी, वरिष्ठ भूवैज्ञानिक डॉ.मेघा शिंदे, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) शाम गोडभरले यांची प्रमुख उपस्थिती होती.

मान्सून हंगामात पाण्याचे संवर्धन करण्यासाठी कृती आराखड्याच्या अंमलबजावणीसह सध्याच्या पाण्याच्या स्थितीबाबत जिल्हयाने घेतलेल्या पुढाकाराचा आढावा घेण्यात आला.

अशोककुमार पुढे म्हणाले की, कॅच द रेन म्हणजे पाणी जिथे पडते तेथेच अडवून ते जिरवणे होय. जिल्हयात जमिनीचा भाग मैदानी नसून डोंगरदऱ्यांचा असल्याने पाणी जिरवण्यासाठी भौगोलिक परिस्थिती उत्तम आहे.

यामुळे सर्व विभागांनी यासाठी केवळ निश्चय करणे महत्वाचे आहे. शासकीय इमारती, घरावरील पडणारे पाणी अडवून पाण्याचे संवर्धन करणे महत्वाचे आहे. जुन्या बोअरवेल्सना, विहीरांना, बंधाऱ्यांना रिचार्ज करण्यासाठी प्रयत्न करावेत. जिल्ह्यात वृक्षलागवड मोठ्या प्रमाणात होणे गरजेचे आहे असे ते म्हणाले.

सामाजिक वनीकरण विभाग आणि पंचायत विभागाच्या माध्यमातून त्यांच्याकडील मोकळया जागांवर वृक्षलागवड मोठया प्रमाणात करावी असे सांगून अशोककुमार पुढे म्हणाले, जिल्हयात पाण्याची टंचाई पाहता ठिंबक सिंचन, तुषार सिंचनाचा वापर वाढविणे गरजेचे असून नवीन तलाव, बंधारे बांधण्यासाठी मोठया प्रमाणात निधी उभा करावा असेही ते म्हणाले.

तसेच योजनेस गती प्राप्त करुन देण्यासाठी महिलांचा सहभाग वाढविणे गरजेचे असल्याचे सांगून अशोककुमार पुढे म्हणाले, जनतेनेही जागरुक होवून जलसंवर्धनासाठी प्रयत्न करावेत.

बैठकीला पाटबंधारे विभागाचे उप.कार्यकारी अभियंता दि.म. नाईकनवरे,ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता बी.व्ही. ढवळे,मत्स्यव्यवसाय सहाय्यक आयुक्त जे.एस.पटेल,मध्यम प्रकल्प धाराशिवचे कनिष्ठ अभियंता गौरी दुबास आदींची उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### चन्नबसवेश्वर फार्मसी महाविद्यालयामध्ये डॉ. एस.आर.रंगनाथन यांची जयंती साजरी

**लातूर, दि.१४ ऑगस्ट-**

भारतीय ग्रंथालय क्षेत्रामध्ये अमूल्य योगदान देऊन क्रांती करणारे ग्रंथालय क्षेत्राचा दर्जा सुधारण्यासाठी ज्यांनी आयुष्य वेचले ते पदमश्रि डॉ एस.आर. रंगनाथन यांचा जन्मदिवस अखिल भारतीय स्तरावर्ती राष्ट्रीय ग्रंथपाल दिन म्हणून साजरा केला जातो. या निमित्याने ग्रंथालय आणि माहिती शास्त्राचे जनक पदमश्री डॉ. एस.आर. रंगनाथन याचा प्रतिमेस प्राचार्याच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून, चन्नबसवेश्वर फार्मसी महाविद्यालयामध्ये मोठ्या उत्सवात साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य डॉ. विजेंद्र स्वामी, प्राचार्य संजय थोंटे, वरिष्ठ प्राध्यापक प्रताप भोसले, सुगावे आर.व्ही., सुगावे बी. के. राजूरकर आर एम. डॉ. देशपांडे अनंत, डॉ. भुसनुरे डॉ नागोबा डॉ साखरे डॉ. पंचभाई डॉ नासिर शेख डॉ. हिंदोळे सुनील प्रा. कौडेवार दत्तहारी प्रा. हूंचे बी एस, प्रा.मानके महेश प्रा. अत्तर एम एस प्रा. डॉ गिराम पी एस. प्रा. ठावरे पी.पी. प्रा. मुगळे व्हि. प्रा.अजगुंडे बालाजी ,प्रा.कोंबडे रोहित, ग्रंथपाल रामेगावकर प्रदीप, कार्यालयीन अधीक्षक विभुते शिवहार, कर्मचारी गर्जे मनोज स्वामी नागेश सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### विलासराव देशमुख यांच्या स्मृतीदिनानिमित्त शेडोळ येथे ६०० रुग्णांची मोफत तपासणी

**निलंगा, दि. १४ ऑगस्ट-**

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा माजी केंद्रीय मंत्री लोकनेते स्व. विलासराव देशमुख यांच्या स्मृतीदिनानिमित्त निलंगा विधानसभा मतदारसंघातील तालुक्यातील शेडोळ येथे मोफत मधुमेह,रक्तदाब, नेत्ररोग तपासणी व मोफत चष्मे वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ६३० जणांचे मोफत आरोग्य तपासणी करण्यात आले. काँग्रेसच्या डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष तथा निलंगा विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेसचे नेते डॉ. अरविंद भातांब्रे यांच्या पुढाकाराने माजी मुख्यमंत्री स्व.विलासरावजी देशमुख यांच्या स्मृतीदिनानिमित्त, लातूर जिल्हा काँग्रेस डॉक्टर सेल व साई क्रिटिकेअर हॉस्पिटल, निलंगा यांच्या संयुक्त विद्यमाने निलंगा तालुक्यातील शेडोळ येथे मोफत आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. अरविंद भातांब्रे व पंचायत समिती सदस्य महेश देशमुख यांच्या हस्ते या शिबिराचे उदघाटन करण्यात आले. सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला अभिवादन करून व माजी मुख्यमंत्री स्व.विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन करून शिबिराला सुरुवात करण्यात आले. या शिबिरासाठी डॉ.अरविंद भातांब्रे, डॉ. स्नेहा कांबळे, शिवकन्या कांबळे, राहूल गावकरे, सिध्दनाथ आंग्रे,विनायक थोरमोठे आदी उपस्थित होते. शिबिरामध्ये शेडोळ व परिसरातील ६३० रुग्णांनी तपासणी केली व २५६ रुग्णांनी नेत्र तपासणी केली,त्या मध्ये ४८ रुग्ण हे मोतिबिंदू शास्त्रकियेसाठी सज्ज आहेत, व २०८ रुग्णांना चष्मा लागलेला आहे त्या रुग्णांना मोफत चष्मे दिले जातील असा शब्द गावकऱ्यांना डॉ.भातांब्रे यांनी दिला. या वेळी विकास पाटील, अविनाश कलशेट्टे ,दामोदर पाटील,सचिन दोडके,धोंडीराम बाळा धुमाळ,वीरभद्र कलशेट्टे,शुभम पाटील, योगेश धुमाळ,जगनाथ पाटील, देविदास दोडके,शंकर धुमाळ, सुधीर धुमाळ,बसवेश्वर स्वामी, विठ्ठल धुमाळ, दशरथ कांबळे,कमलाकर लोंढे, कृष्णा फुलबोने, काकासाहेब धुमाळ, रामराव धुमाळ, तानाजी कदम, श्रीहरी कदम,बसवराज कलशेट्टे, कमलाकर धुमाळ आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

### समृद्धी योजनेच्या जिल्हास्तरीय समितीवर सदस्यपदी पवन चव्हाण

**उदगीर, दि. १४ ऑगस्ट-**



महाराष्ट्रात शासनाच्या वतीने नव्याने निर्मिती केलेल्या संत सेवालाल महाराज बंजारा, लमाण तांडा समृद्धी योजने अंतर्गत ग्राम पंचायती कडून प्राप्त झालेल्या कामाचा प्राधान्यक्रम व निकष लक्षात घेऊन कामाची निवड करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लातूर यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीमध्ये पवन चव्हाण मल्लापुरकर यांची अशासकीय सदस्य म्हणून ३ वर्षाकरिता निवड करण्यात आलेली आहे. या योजनेअंतर्गत बंजारा/लमाण तांड्यांना स्वतंत्र महसूली गावाचा दर्जा देणे व तांड्यामध्ये स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करुन बंजारा समाजाला राजकीय प्रवाहात अणणे.यासाठी पुनर्वसित गावाच्या धतीवर महसूली गावाचा दजा देणे, ग्रामपंचायत स्थापन करणे,पाणी, वीज, शाळा, अंगणवाड्या, आरोग्य, पथवदवे,गटारे, अंतर्गत रस्ते इ.प्राथमिक मूलभूत सुविधा निर्माण करण्यासाठी तांडाच्या विकास आराखड्याप्रमाणे निधी उपलब्ध करून देणे तसेच प्रत्येक तांड्यासाठी किमान ३० लाख निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्यात बंजारा/लमाण समाजाचे अनेक तांडे असून, अशा तांड्यामध्ये बंजारा समाज अनेक वर्षापासून राहत असला तरी बंजारा/लमाण तांड्यामध्ये प्राथमिक मुलभूत सुविधा उपलब्ध झालेल्या नाहीत. त्यासाठी बंजारा/लमाण तांड्याच्या विकासासाठी स्वतंत्र योजना निर्माण करण्यात आलेली आहे. संत सेवालाल महाराज बंजारा लमान तांडा समृद्धी योजनेवर उदगीर तालुक्यातील मल्लापुर तांडा येथील रहिवासी पवन चव्हाण मल्लापुरकर आणि निलंगा तालुक्यातील दापका तांडा येथील रहिवाशी अर्जुन शिवाजीराव जाधव यांची निवड झाल्याने बंजारा समाजातील विविध स्तरातून अभिनंदन होत आहे.

# शेतकऱ्यांना सरसकट अनुदान द्या

## सोयाबीन, कापूस पिकांचा समावेश करावा; एमआयएमची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि. १४ ऑगस्ट-**




राज्यसरकारने हेक्टरी ५ हजार रुपयांचे दोन हेक्टरपर्यंत अनुदान जाहीर केले आहे. यासाठी ई पीक पाहणीच्या यादीत नाव असणे बंधनकारक केली आहे. नोंदणी करुनृही अनेक शेतकऱ्यांचे यादीत नाव आली नाहीत तर आनेक शेतकऱ्यांची नोंद झाली नाही. या जाचक अटीमुळे अनुदान योजनेतून अनेक शेतकरी वंचित राहणार आहे. यामुळे सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना सरसकट आनुदान वाटप करावे, आशी मागणी एमआयएम च्या वतीने मुख्यमंत्र्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

गेल्या वर्षीच्या खरीप हंगामामध्ये सुरवातीस अत्यल्प पाऊस पडल्याने दुबार पेरणीचे वेळ शेतकऱ्यांवर आली होती. पेरणीनंतर पावसाचा ऐन फुलोरा व दाणा भरण्याच्या अवस्थेतच पुन्हा पावसाने दडी मारली होती. नंतर मोठा पाऊस झाल्याने हाताशी आलेले पीक हातातून गेले होते. यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले होते. अशा नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी शासनाने कृषी विभागामार्फत खरीप २०२३ मधील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी ५००० रु. देण्याची घोषणा केलेली आहे. या योजनेचा लाभ मिळविण्यासाठी ई-पिक पाहणी झालेल्या शेतकऱ्यांनाच अनुदान देण्याबाबत कळविण्यात आले आहे. परंतु अनेक शेतकऱ्यांनी ई-पिक पाहणी करुनही त्यांचे नाव यादीत समाविष्ठ करण्यात आलेले नाही. तर कांही गावात पच ओपन झाला नाही. तर कांही गावात रेंजच मिळाली नाही. यामुळे अनेक शेतकरी या अनुदान लाभापासून वंचित राहणार आहेत. याचबरोबर कृषी विभाग व तहसिल कार्यालयाकडून ग्रामपंचायतीच्या फलकावर डकविण्यात आलेल्या यादीत अनेक शेतकऱ्यांची नावे आली नाहीत. यामुळे शासनाच्या मदतीच्या धोरणाबद्दल शेतकऱ्यांतून असंतोष पसरलेला दिसून येत आहे, असे या निवेदनात म्हटले आहे. शासनाने जाहीर केलेली मदत संकटातील प्रत्येक शेतकऱ्यांना मिळावी. यासाठी शासनाने सरसगट शेतकऱ्यांना हेक्टरी ५००० रुपये अनुदान द्यावे. जेणे करुन अनुदानापासुन कोणताही शेतकरी वंचित राहणार नाही. तसेच इनाम जमीनी असलेल्या शेतकऱ्यांना अनुदानाचे यादीत समाविष्ठ करुन त्यांनाही अनुदान देण्यात यावे. अन्यथा एमआयएम च्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल.असा इशारा मुख्यमंत्री यांना एमआयएमने निवेदनाद्वारे दिला आहे. या निवेदनावर जेष्ठ नेते मुझ्झफरअली इनामदार, अलिम शेख, नयुम पटवेकर आदी पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या सह्या आहेत.



### मराठवाड्यातील नवनिर्वाचित खासदारांचा सत्कार सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १४ ऑगस्ट-**

प्रदेश काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले, महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, काँग्रेस पक्षाचे विधान परिषद गटनेते सतेज ऊर्फ बंटी पाटील, माजी मंत्री आ. अमित विलासराव देशमुख,यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवार दि. १२ ऑगस्ट रोजी सकाळी छत्रपती संभाजीनगर शहरातील जिमखाना येथे विधानसभा निवडणुकीच्या प्राश्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर,जालना जिल्ह्यातील काँग्रेस पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक व मराठवाड्यातील नवनिर्वाचित खासदारांचा सत्कार सोहळा संपन्न झाला. यावेळी लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे, नांदेडचे खासदार वसंतराव चव्हाण, जालन्याचे खासदार डॉ. कल्याण काळे, आमदार राजेश राठोड आमदार कैलास गोरंट्याल महाराष्ट्र अल्पसंख्यांक काँग्रेसचे अध्यक्ष वजाहत मिर्झा, प्रदेश काँग्रेस कार्याध्यक्ष नसीम खान,कार्यालयीन प्रभारी नाना गावंडे, माजी मंत्री अनिल पटेल, माजी आमदार एम. एम. शेख, माजी आमदार नामदेव पवार,विलास औताडे, कुणाल राऊत, अमीर शेख, जितेंद्र देहाडे, युसूफ राजेभाऊ देशमुख उपस्थित होते.



### सार्वजनिक ग्रंथालयाचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्नशील : ना. बनसोडे

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. १४ ऑगस्ट-**

राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयाचे प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन राज्याचे क्रिडा व युवक कल्याण मंत्री ना. संजय बनसोडे यांनी दिले.

महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयाचे ग्रंथालय कर्मचार्यांचे विविध मागण्या आचारसंहिता जाहीर सुरु होण्या अगोदर आदेश काढावा, या मागणीसाठी उदगीर जळकोट विधानसभा मतदार संघातील सार्वजनिक ग्रंथालयाचे पदाधिकारी, ग्रंथपाल व सेवक यांनी उदगीरचे विकास पुरुष राज्याचे क्रिडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांची भेट घेऊन विविध मागण्याचे निवेदन दिले. यावेळी राम मोतीपवळे, सूर्यकांत सिरसे, सुभाष बिरादार, यशवंत पाटील, लक्ष्मण फुलारी, नागनाथ बिरादार, दयानंद सोनटक्के, शेंबाळे धर्मण्णा, आनंद ताटेकर,राजेश्वर स्वामी, शांतकुमार बिरादार, आत्माराम शेळगे, शादूर शेख रामेश्वर बिरादार, तांबोळी मन्सुर, शिवलिंग कडोळे, संजीव केंद्रे, गंगाधर केंद्रे, इश्वर शेरे, पंचाक्षरी स्वामी,ढवळे जळबा, ॲड. तानाजी साखरे, प्रवीण सोमवंशी, चंद्रखेर ढगे, कासार हैतरसाब, वाडकर धोंडिराम, संगमेश्वर पाटील, शांतकुमार बिरादा, गुणवंत मुळे, अशोक धुप्पे, लक्ष्मीबाई कांबळे, विश्वनाथ मानसे, सुजाता बिरादार, ज्ञानेश्वर पारसेवार, रामदास बेंबडे, रेखा लाला, विजयमाला मेदगे, दत्तात्र्य सोनकांबळे, बालाजी पाटील, विठ्ठल बिरादार, शंकर दत्तनुरे वीश्वनाथ, तेलंगे अशोक, दिनेश पाटील उपस्थित होते.

## श्रीमंत व्यापारी गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी आशिष अंबरखान

### कार्याध्यक्षपदी ना. संजय बनसोडे





**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. १४ ऑगस्ट-**

येथील प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या श्रीमंत व्यापारी गणेश मंडळ ट्रस्टच्या गणेशोत्सवच्या अध्यक्षपदी आशिष रमेश अंबरखाने यांची तर कार्याध्यक्षपदी ना. संजय बनसोडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

श्रीमंत व्यापारी गणेश मंडळ ट्रस्टच्या वतीने साजरा करण्यात येणाऱ्या गणेशोत्सव २०२४ च्या पदाधिकारी निवडीसाठी ट्रस्टचे अध्यक्ष आशिष रमेश अंबरखाने, उपाध्यक्ष विजय राजेश्वर निटूरे, सचिव प्रा.विश्वजित उमाकांत पाटील व सदस्यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली. अध्यक्षपदी आशिष रमेश अंबरखाने तर कार्याध्यक्षपदी राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. संजय बनसोडे यांची निवड करण्यात आली. अन्य पदाधिकाऱ्यांमध्ये उपाध्यक्ष - अभिनव नाथा कोटलवार, सचिव - विरभद्र दत्तात्रये पसारे, सहसचिव - युवराज कांडगिरे, कोषाध्यक्ष-कैलास मोदी, सहकोषाध्यक्ष अजय कबाडे यांची निवड करण्यात आली आहे. या गणेशोत्सवाच्या निमित्ताने विविध समित्यांची स्थापना करण्यात आली आहे यात प्रसिद्धी समिती :- कपील शेटकार, रवी पाटील, चेतन कप्पिकेरे, अभिषेक काणमंदे, अजय नवरखेले, सचिन बिरादार, सिध्देश्वर पैके, राजेश शेटकार, विष्णू रंजिरे, गणेश जाधव, संतोष पाटील, आनंद अंबेसगे, राजू चौधरी, सुशिल पेन्सलवार. लक्की ड्रॉ समिती: - प्रा.विश्वजित पाटील, गणेश बिरादार, गणेश भूसागरे, प्रशांत पाटील, रितेश ब्रेंद्रे, बालाजी बिरादार, संतोष अणकल्ले, महेंद्रे पाटील, ज्ञानेश्वर नादरगे, बस्वेष कोरे, गिरीश पांढरे, नरसिंग बिरादार, गजानन देबडवार, ओमकार गांजूरे, आकाश रेड्डी, प्रशांत रंगवाळ, विकास तपसाळे. प्रसाद व भोजन समिती :- संतोष पाटील, स्वरूप बदलाणी, सर्वेष बिरादार, प्रविण हलकंचे, भिमा जाधव, गजानन राजूरे, गुरुराज माळेवाडे, केदार अंबेसंगे, गजानन पाटील, ब्रमानंद स्वामी, साईनाथ लदाडे, अंकेश धनूरे, केऊर पेन्सलवार, नागेश आष्टुरे, संदिप पाटील, बिपीन जाधव, सागर चिद्रेवार, अक्षय कोनाळे पूजा व सुशोभीकरण समिती : - महेश तोडकर, विरेंद्रे आंबरखाने, केदार पेन्सलवार, रूषी फूलारी, अक्षय श्रीवास्तव, सूरज लासूने, अर्चना पैके, आदिश्री आर्य, सिमा जाबवणे, शोभा तांदळे, सुरेखा गुज्जलवार, केदार पेन्सलवार, अनिकेत गुडमेवार, अभय पारसेवार, गणेश बावगे, गजानन नागढाणे, कपील वायचाळकर, सचिन शिंदे, नरेंद्रे पाटील, संदिप ममदापूरे, नेताजी सूर्यवंशी, अनिरुद्ध बिरादार, सोपनील कप्ते. मिरवणूक समिती - सर्वश्री विरलाल कांबळे, रोहण कप्पिकेरे, प्रणव मूंढे, अक्षय पारसेवार, महेश होणराव, अमोल अणकल्ले, तुषार बुलबुले, प्रशांत गायकवाड, राहूल सातापूरे, अक्षय जाधव, अनूप अंबेसगे, नागेश अंबेगावे, नरेश सोनवणे, संदिप ममदापूरे, स्वप्नील दापके, प्रितम विरशेट्टी, बबलू मूळे, महेश खिंडे, सैरभ नागापूरे, शिवा गोरे, कुणाल बागबंदे, गुरुप्रसाद पांढरे, किरण जिरगे. मार्गदर्शक व सल्लागार समिती चंद्रकांत गुडमेवार, भगवान पाटील तळेगावकर, माजी आमदार गोविंद केंद्रे, माजी आमदार मनोहर पटवारी, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटूरे, बसवराज पाटील नागराळकर, उद्योगपती रमेश अंबरखाने, माजी नगरसेवक मनोज पुदाले, सूर्यकांत मुक्कावर, अनिल पुदाले, नाथा कोटलवार, मारोती कोटलवार, बिडवई बी.डी, सुरेश देबडवार, विश्वनाथ बिरादार माळेवाडी, अरविंद कोटलवार, प्रभाकर पेन्सलवार, भागवत पारसेवार, श्रीनिवास गर्जे, माजी नगरसेवक विजय निटुरे, लातूर जिल्हा परिषद माजी अध्यक्ष राहुल केंद्रे, अभिजीत अशोक पुदाले, अमोल अनकल्ले, राहुल अंबेसंगे, अमित पाटील-नळेगावकर, वैजनाथ मारमवार, लाला कल्याणी, शैलेश कस्तूरे, बिपीन पाटील, शिवा गोरे, कालिदास धोंगडे, विक्रम हलकीकर, गजानन चिद्रेवार, अमोल नागनाथ निडवदे, डॉ. विजयकुमार बिरादार, सतीश फुलारी, प्रसाद मुक्कावार, उमाकांत सुंदाळे यांचा समावेश आहे.

## लघुनाटिका स्पर्धेत व्यथा सूर्योदय कला मंच लातूर प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

सोलापूर अस्तित्व मेकर्स फाऊंडेशन सोलापूर या नाट्यसंस्थेने सालाबादाप्रमाणे याही वर्षी लघुनाटिका स्पर्धेचं आयोजन केलं होतं हे संस्थेचा आठवा वर्षे असून ही स्पर्धा आकरा ऑगस्ट २०२४ रोजी हुतात्मा स्मृती मंदिर या ठिकाणी सकाळी ०९ ते संध्याकाळी ९ या दरम्यान पार पडली या स्पर्धेत एकूण ३० संघाने सहभाग घेतला होता या स्पर्धेत चंद्रपूर चंद्रपूर पासून वर्धा, नांदेड ,कोल्हापूर ,पुणे , मुंबई, लातूर ,सातारा ,सबंध महाराष्ट्रातील संघाने सहभाग घेतला होता एकूण या स्पर्धेमध्ये ४०० हून अधिक महाराष्ट्रातील कलावंतांनी सहभाग घेतला होता या स्पर्धेत स्पर्धकांनी अतिशय उत्तम आपल्या कलेचे सादरीकरण केलं जवळपास दिवसभर सोलापुरातील हजारो रसिक प्रेक्षकांनी या स्पर्धेचा आनंद लुटला

या स्पर्धेत तृतीय क्रमांक एस एम प्रोडक्शन पुणे या संस्थेचे एम हे हम हे नाटक दुसऱ्या क्रमांक पटकावला आणि तिसरा क्रमांक डायन रंगानुभव कोल्हापूर या संस्थेने पटकावला या स्पर्धेत पहिला क्रमांक आला रुपये २०००० आणि स्मृतिचिन्ह १५००० व स्मृतिचिन्ह आणि दहा हजार वस्तूचे नाव वैयक्तिक पारितोषिके देण्यात आली




या स्पर्धेला प्रमुख पाहुणे म्हणून सोनी मराठीत या चॅनलचे क्रिएटिव्ह हेड गणेश सागडे सोलापूर महानगरपालिकेचे मुख्य लेखापाल अधिकारी डॉक्टर रत्नराज जवळगेकर रंग साधक पुरस्कार प्राप्त केदार सावंत उद्योजक वीरेंद्र मेरे शशिकांत पाटील, डॉक्टर केदारनाथ कळवणे, हनुमंत मते, सचिन सावंत उपस्थित होते. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी स्पर्धेचे मुख्य संयोजक ॲड. बसवराज सलगर यंदाचे महोत्सवा अध्यक्ष प्राध्यापक डॉक्टर मधुकर पवार, किरण लोंढे, नितेश फुलारी, ओंकार साठे, सागर देवकुळे, प्रतीक कसबे, सोमनाथ लोखंडे, वैशाली बनसोडे, रजनी कोल्हापुरे, कलखामकर आणि तर संस्थेच्या सर्व सदस्यांनी अथक परिश्रम घेऊन स्पर्धा यशस्वी करून दाखवली

# आमदार निलंगेकरांच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहा : आ. शिंदे

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. १४ ऑगस्ट-**

एकेकाळी निलंगेकर -चाकूरकर- देशमुख यांच्या नावाने ओळखला जाणारा लातूर जिल्हा आज आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या नावाने ओळखला जातो. आमदार निलंगेकर हे केवळ निलंगा मतदार संघातील जनतेचे नेते नाहीत तर महाराष्ट्रातील भाजपचे प्रमुख नेते आहेत. भविष्यात संभाजीराव पाटील निलंगेकर यांचे नेतृत्व कायम ठेवण्यासाठी जनतेने त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे असे आवाहान भाजपचे नेते माजी मंत्री आमदार राम शिंदे यांनी केले.




निलंगा येथे आयोजित भाजपच्या निलंगा विधानसभा अधिवेशनात ते बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर होते. माजी आमदार गोविंद केंद्रे, भाजपचे लातूर जिल्हा अध्यक्ष दिलीप देशमुख, भाजपचे प्रदेश सचिव अरविंद पाटील निलंगेकर, भगवानराव पाटील तळेगावकर, भाजप निलंगा तालुका अध्यक्ष कुमोद लोभे, शिरूर अनंतपाळ तालुका अध्यक्ष मंगेश पाटील, देवणी तालुका अध्यक्ष काशिनाथ गरीबे, माजी जि.प.अध्यक्ष मिलिंद लातूरे, माजी नगराध्यक्ष बाळासाहेब शिंगाडे, संजय दोरवे, औराद शहाजानी बाजार समितीचे सभापती नरसिंग बिरादार, संगायो निलंगा तालुका अध्यक्ष शेषेराव मंमाळे, मनोज कोळ्ळे आदी मंचावर उपस्थित होते. पुढे बोलताना आमदार राम शिंदे म्हणाले, आमदार निलंगेकर हे सर्वसामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी अन्याय अत्याचाराच्या विरोधात संघर्ष करणारे लढावू नेते आहेत. मतदारसंघात विविध नाविन्यपूर्ण व दिशा देणारे उपक्रम राबविण्यात ते कायम अग्रेसर असतात. आमदार निलंगेकर यांच्या रूपाने निलंगा विधानसभा मतदारसंघाला एक सक्षम व कणखर नेतृत्व लाभले हे मतदारसंघातील जनतेचे भाग्य आहे. मतदारसंघातील जनतेचे मत विचारात घेणारे , जनतेच्या मताचा आदर करणारे नेतृत्व पुन्हा विधानसभेत पाठवण्याच्या मतदारसंघातील जनतेच्या निर्णयाला माझे अनुमोदन असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर म्हणाले, संपत्तीसाठी किंवा सत्तेसाठी मी काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री डॉ शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या विरोधात बंड केले नाही तर सर्व सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी झालेल्या वैचारिक मतभेदांमुळे मी त्यांच्या व काँग्रेसच्या विरोधात लढा उभा केला. २४ वर्षाच्या राजकीय वाटचालीत विविध आंदोलने, कार्यक्रमाचे आयोजन,निवडणुका आदींच्या माध्यमातून जनसंपर्क वाढवून मतदार संघातील जनतेच्या हृदयात स्वतःचे स्थान निर्माण केले असल्याचे त्यांनी सांगितले. विकासाचा गाडा पुढे नेण्यासाठी केंद्रात असलेल्या भाजप महायुतीच्या सरकारशी सुसंगत सरकार राज्यात येणे आवश्यक असून त्यासाठी निलंगा विधानसभा मतदारसंघातील जनतेशी संवाद साधण्यासाठी लवकरच जनसंवाद पदयात्रा काढणार असल्याची घोषणा केली.

मतदारसंघातील विकास कामाचा लेखाजोखा मांडून जनतेचे आशीर्वाद घेण्यासाठी दोन टप्प्यांत जनसंवाद पदयात्रा काढणार असल्याचे आ.निलंगेकर यांनी सांगितले. निलंगा मतदारसंघातील धनगर समाज बांधवांच्या वतीने आमदार राम शिंदे व आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांचा भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी निलंगा विधानसभा मतदारसंघातील जनतेच्या वतीने जिल्हा बँकेचे संचालक भगवान पाटील तळेगावकर यांनी आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांचा भाजप उमेदवारीचा ठराव मांडला. या ठरावाला गोविंद चिलकुरे, संजय दोरवे ,भाजप जिल्हाध्यक्ष दिलीप देशमुख, माजी आमदार गोविंद केंद्रे आदींनी अनुमोदन दिले. उपस्थित जनतेने टाळ्याच्या गजरात, हात उंचावून आ.निलंगेरांच्या उमेदवारीच्या ठरावाला अनुमोदन दिले. सूत्रसंचालन प्रशांत पाटील यांनी तर प्रास्ताविक गणेश धुमाळे यांनी केले.

CMYK

# लातूर दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत

## किल्लारीत हर घर तिरंगा अभियान अंतर्गत विविध उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि. १४ ऑगस्ट-**

भारतीय स्वातंत्र्याला आज ७८ वर्ष पूर्ण होत आहेत. या गौरवशाली पर्वानिमित जनतेच्या मनात स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती तेवत राहव्यात व देशभक्तीची भावना कायम स्वरूपी मनात राहावी. त्याचे संस्मरण व्हावे या उद्देशाने हर घर तिरंगा अभियान व विविध उपक्रमनुसार ग्रामपंचायत किल्लारीच्या वतीने सरपंच सुलक्षणा धनराज बाबळसुरे यांच्या हस्ते ध्वज फडकवून ध्वज वंदन करण्यात आले.

दि. १३, १४ व १५ ऑगस्ट २०२४ रोजी तिरंगा झेंडा फडकविण्याचे आवाहन शासनाच्या वतीने करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने यावेळी हुतात्मा स्मारक परिसरात स्वच्छता उपक्रम राबविण्यात आला. यावेळी ग्रामविकास अधिकारी



शोभा भोजने, उपसरपंच युवराज गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य बबीता कांबळे, वैशाली गुंजोटे, सुमन भोसले, गोविंद भोसले, विजय माने, विजयकुमार भोसले, मेजर राठोडे, पांडुरंग भोसले, अमोल कोराळे, शाहूराज वाळके, अरबाज पठाण, सचिन सरवदे, जोती बाबळसुरे आदी कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त



### महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात डॉ. रंगनाथन यांची जयंती साजरी

**उदगीर, दि. १४ ऑगस्ट-**

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात डॉ. शियाली रामामृत रंगनाथन यांची जयंती साजरी करण्यात आली. एस. आर. रंगनाथन यांनी ग्रंथालयशास्त्राच्या क्षेत्रात त्यांच्या दूरदर्शी कल्पना आणि नाविन्यपूर्ण योगदानाने क्रांती केली. या दिवसाच्या निमित्ताने देशभरातील ग्रंथालये आणि शैक्षणिक संस्थांमध्ये विविध कार्यक्रम आणि उपक्रम आयोजित केले जात आहेत. महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात ग्रंथपाल डॉ. एल. बी. पेन्सलवार यांनी नवागत विद्यार्थ्यांसाठी आयोजित युजर ओरिएंटेशन प्रोग्राम चे आयोजन केले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ग्रंथालयाच्या विविध सेवा, संसाधने, आणि त्यांचा योग्य वापर याविषयी माहिती दिली. तसेच, डिजिटल संसाधनांचा वापर कसा करावा याविषयी देखील मार्गदर्शन केले, ज्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक प्रवासात ग्रंथालयाचा योग्य लाभ घेता येईल. यावेळी उपप्राचार्य डॉ. एस. जी. पाटील, प्रा. डॉ. बी. आर. दहिफळे, प्रा. डॉ. एस.ए .मुळे उपस्थित होते.



### लोकनेते विलासराव देशमुख यांच्या पुण्यतिथीनिमित्त चाकुरात अभिवादन


**चाकूर, दि. १४ ऑगस्ट-**

चाकूर येथे कै.विलासराव देशमुख यांच्या १२ व्या पुण्यातीथी निमित्त चाकूर शहरातील कॉग्रेस कार्यालयात काँग्रेस पार्टीचे चाकूर तालुकाध्यक्ष विलासराव पाटील यांनी कै.विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन केले. यावेळी ते म्हणाले,की चाकुर तालुक्याच्या विकासात विलासराव देशमुख यांचा खारीचा वाटा आहे. त्याच्या कार्यकाळात सोयाबीन या पिकांचे भुंगाआळीमुळे नुकसान झाले होते. त्यावेळी त्यांनी चाकुर तालुक्यात भरीव आर्थिक मदत केली होती. थेट शेतकऱ्याच्या बँक खात्यावर अनुदान जमा केले होते. चाकूर येथील कृषि व्यवस्थापन महाविद्यालयांची मान्यता त्यांनी एका दिवसांत दिली होती.तालुक्यात अनेक विकास कामे त्यांच्या कार्यकाळात झाली आहेत. विलासराव देशमुख यांनी सर्वसामान्यांच्या हितासाठी आपले आयुष्य खर्ची घातले. ज्या जनतेने भरभरून प्रेम दिले त्या जनतेच्या कल्याणासाठी ते अविरतपणे चालत राहिले. साहेबांनी, सर्वसामान्य माणूस हा नेहमी केंद्रस्थानी ठेवला व लोककल्याणाचे कार्य ते करत राहिले. म्हणूनच समाजातील वंचित घटकांना ते आपलेसे वाटतात. कल्याणकारी नेता म्हणून ओळख असलेले विलासराव देशमुख, यांचे कार्य दीपस्तंभासारखे आहे अशा महान नेत्यांना अभिवादन करण्यासाठी शेख पप्पू, गंगाधर केराळे, सलीम तांबोळी, गफुर मासुलदार, सुनील शिंदे उपस्थित होते.

### ई-पीक पाहणी अट शिथील करावी; आ. कराड यांची मागणी

**लातूर, दि. १४ ऑगस्ट-**

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघासह संपूर्ण जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या अनुदान योजनेपासून बहुतांशी शेतकरी वंचित राहत असल्याने या अनुदानासाठी असलेली पिक पेरा (ई-पीक पाहणी) पाहणीची अट शासनाने रद्द करावी त्याचबरोबर या योजनेसाठी पात्र असतानाही वगळलेल्या भादा सर्कलमधील मौजे वरवडा आणि वानवडा या दोन गावांचा समावेश करुन शेतकऱ्यांना आर्थीक मदत करावी, अशी मागणी भाजपाचे नेते आ. रमेश कराड यांनी राज्याचे मुख्यमंत्री आणि कृषी मंत्री यांच्याकडे एका



पत्राद्वारे केली आहे. जागतिक बाजारात सोयाबीन या तेल बियांचे भाव कोसळल्यामुळे सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना कमी भावात सोयाबीनची विक्री करावी लागली असल्यामुळे राज्यातील महायुती शासनाने हेक्टरी पाच हजार रुपये दोन हेक्टर पर्यंत मदत जाहीर केली आहे. याबाबत शासनाचे कर्मचारी कार्यरत करत असून ई पिक पाहणी नुसार गाव निहाय याद्या तयार करण्यात आल्या आहेत असे पत्रात नमूद करून आ. रमेश कराड यांनी या अनुदान योजनेसाठी खेड्यापाड्यातील, वाडी वस्तीतील शेतकऱ्यांना ऑनलाईन नोंद करता आली नाही, काही शेतकऱ्यांनी मोबाईल वरून ऑनलाईन करूनही त्यांचा पीक पेरा आला नाही त्यामुळे बहुसंख्य शेतकरी शासनाच्या या अनुदान योजने पासून वंचित राहत आहेत असे बोलून दाखविले. लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भादा सर्कलमधील मौजे वरवडा आणि वानवडा ही दोन गावे पात्र असतानाही वगळण्यात आली आहेत. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसहाय्य देण्यासाठी अनुदान योजनेत या दोन्ही गावाचा समावेश करावा आणि शेतकऱ्यांना मदत करावी, अशी मागणी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

## हर घर तिरंगा अंतर्गत चाकूरमध्ये रॅली

### रॅलीचे शहरात भव्य स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**चाकूर, दि.१४ ऑगस्ट-**

सहाय्यक प्रशिक्षण केंद्र चाकूरच्या वतीने हर घर तिरंगा मोहिमे अंतर्गत १४ ऑगस्ट २०२४ रोजी सहाय्यक प्रशिक्षण केंद्र चाकूर येथे तिरंगा दौड काढण्यात आली. या दौडला सहाय्यक प्रशिक्षण केंद्र चाकूरचे महानिरीक्षक कमांडर मदनपाल सिंह यांनी हिरवा झेंडा दाखवून मोटारसायकल रॅली काढण्यात आली.



यावेळी अनेक अधिकारी आणि अधीनस्थ अधिकारी देखील उपस्थित होते. या मोटारसायकल रॅलीत सर्व श्रेणीतील ११२० जवान सहभागी झाले होते. मोटारसायकल तिरंगा रॅलीला सहाय्यक प्रशिक्षण केंद्र चाकूर येथील नविता शर्मा बावा प्रमुख आणि विनीत कुमार, महानिरीक्षक यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून रॅलीची सुरवात करण्यात आली. या रॅलीमध्ये प्रशिक्षण केंद्रातील ७० मोटारसायकलस्वारांनी बिएसएफ येथील प्रशिक्षण केंद्राच्या मुख्य गेटपासून चाकूर शहरात हर घर तिरंगा जनजागरण रॅली काढण्यात आली. या रॅलीसोबतच जास्तीत जास्त लोकांपर्यंत तिरंगा मोहीम पोहोचवण्याचे काम जवानांनी केले. यावेळी देशभक्तीपर गीते वाजवून सर्व चाकूरवासीयांच्या मनात देशभक्ती विषयी आवड निर्माण करण्यात आली व या रॅलीचे ठिकठिकाणी चाकूर शहरात स्वागत करण्यात आले. नविता शर्मा, मुख्याध्यापक सहाय्यक प्रशिक्षण केंद्र चाकूर यांनी बॉर्डर गार्ड संगिनीओसच्या ५ किमी त्रिरंगा यात्रेला हिरवी झेंडी दाखविली.हातात तिरंगा घेऊन जनजागृती रॅली काढण्यात आली. ज्यामध्ये केंद्रीय विद्यालय चाकूरचे विद्यार्थी आणि शिक्षकही उत्साहाने सहभागी झाले होते. या रॅलीची सांगता सहाय्यक प्रशिक्षण केंद्र चाकूर येथे करण्यात आली. या रॅलीत सहाय्यक प्रशिक्षण केंद्रातील जवान, केंद्रीय विद्यालयातील विद्यार्थी,शिक्षक आदींनी सहभाग घेतला होता.



## महाराष्ट्र महाविद्यालयात हर घर तिरंगा अंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन

**निलंगा, दि. १४ ऑगस्ट-**

महाराष्ट्र महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने देशाच्या ७८ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त हर घर तिरंगा उपक्रमाच्या जनजागृतीसाठी हर घर तिरंगा रेलीचे आयोजन करण्यात आले. त्याचबरोबर निलंगा शहरातील ऐतिहासिक वारसा स्थळ निलकंठेश्वर मंदिर व परिसरात स्वच्छता मोहिम राबवण्यात आली. देशाच्या स्वातंत्र्यासाठी हौतात्म्य पत्करलेल्या हुतात्म्यांच्या स्मृतींना उजाळा देण्याच्या हेतूने हुतात्मा स्मारकास भेट देवून परिसरात विद्यार्थ्यांनी श्रमदानातून स्वच्छता केली. हर घर तिरंगा उपक्रमाची सांगता हैद्राबाद मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्यसेनानी तथा महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या स्मारक स्थळी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव कोलपुके, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. प्रशांत गायकवाड, डॉ. शेषराव देवनाळकर, डॉ. गोविंद शिवशेट्टे व विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. सुभाष बेंजलवार, डॉ. विठ्ठल सांडूर, राछेसे. केअर टेकर ऑफिसर डॉ. सचिन बसुदे, प्रा. दत्तात्रय पवार, मनोहर एखंडे व रासेयो स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.



## रेणा कारखान्याच्या वतीने विलासराव देशमुख यांच्या स्मृतीदिनानिमित्त अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १४ ऑगस्ट-**

लातूर जिल्हयाचे भाग्यविधाते राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा राज्याचे लोकनेते विलासरावजी देशमुख साहेब यांच्या १२ व्या स्मृतीदिनानिमित्त दिलीपनगर निवाडा तालुका रेणापूर येथील रेणा कारखाना साईट येथे उभारलेल्या लोकनेते विलासराव देशमुख साहेबांच्या पुर्णाकृती पुतळा व स्मृती संग्रहालय स्थळी मान्यवरांच्या उपस्थितीत आदरांजली वाहण्यात आली. यावेळी कारखान्याचे माजी चेअरमन यशवंतराव पाटील, माजी आमदार ॲड. त्रयंबकराव भिसे यांनी साहेबांच्या कार्याची व आठवणींना उजाळा आपल्या मनोगतातून दिला

यावेळी आदरांजली कार्यक्रमास कारखान्याचे चेअरमन सर्जेराव मोरे, व्हॉईस चेअरमन अनंतराव देशमुख, कारखान्याचे संचालक सर्वश्री यशवंतराव पाटील, अँड त्रयंबकराव भिसे, लालासाहेब चव्हाण,धनराज देशमुख,चंद्रकांत सुर्यवंशी, प्रविण पाटील,संग्राम माटेकर, तानाजी कांबळे, संजय हरीदास, स्नेहलराव देशमुख, कार्यकारी संचालक,बी.व्ही.मोरे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती, उमाकांत खलंग्रे उपसभापती, अँड हाके संचालक, महीला कॉग्रेस कमीटीच्या अध्यक्षा पूजा इगे, रमेश सुर्यवंशी, हाणमंतराव पवार यांच्यासह कॉग्रेस पदाधिकारी, रेणापूर, पोहरेगांव, सिंधगांव, निवाडा, कोळगांव, खानापुर येथील ग्रामस्थ यांच्यासह कारखान्यातील अधिकारी व कर्मचारी आदींची उपस्थिती होती.

### कारखाना स्थळी वृक्षारोपण

लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांच्या स्मृतिदिनानिमित्त कारखाना स्थळी कारखान्याचे चेअरमन सर्जेराव मोरे, माजी आमदार ॲड. त्रबक भिसे माजी चेअरमन यशवंतराव पाटील व्हॉईस चेअरमन अनंतराव देशमुख यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले.

## रयत क्रांती संघटनेचे शिरूर अनंतपाळ तहसीलदारांना निवेदन




**तभा वृत्तसेवा,**
**शिरूर अनंतपाळ, दि. १४ ऑगस्ट-**

रयत क्रांती संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा ओबीसी नेते शिवाजी पेठे यांच्या मार्गदर्शनाखाली शिरूर अनंतपाळ तालुक्यातील शेतकऱ्यांना २०२३-२४ मध्ये फरकाचे हेक्टरी पाच हजाराचे अनुदान जाहीर झाले आहे. त्या अनुदानाच्या यादीमध्ये ई-पीक पाहणी करूनही ज्या शेतकऱ्यांची नावे नाहीत अशा शेतकऱ्यांना कृषी अधिकाऱ्यांनी ई-पीक पाहणी करून त्यांच्या सातबारा उताऱ्यावर तशी नोंद केली आहे परंतु त्या शेतकऱ्यांची नावे संबंधित यादी मध्ये नसल्यामुळे व कृषी अधिकारी फार्म भरून घेत नसल्यामुळे रयत क्रांती संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा ओबीसी नेते शिवाजीराव पेठे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.

शेतकऱ्यांनी शेतकरी नेते शिवाजीराव पेठे यांची भेट घेतली आपली अडचण सांगितली ज्या शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणी केलेल्या सातबारा उताऱ्यावर नोंद असून सुद्धा त्यांचे नाव यादीमध्ये नाहीत अशा शेतकऱ्यांना तात्काळ सरसकट अनुदान मंजूर करावे, असे रयत क्रांती संघटनेच्या वतीने निवेदन तहसीलदार यांना देण्यात आले. यावेळी उपस्थित तळेगावचे चेअरमन अशोकराव सुरवसे, लक्ष्मण बुरंगे ,बाळासाहेब सूर्यवंशी, ज्ञानेश्वर पाटील, तसेच तालुक्यातील अनेक पिडीत शेतकरी बांधव उपस्थित होते.

## लमाण तांडा समृद्धी योजनेच्या सदस्यपदी जाधव

**निलंगा, दि. १४ ऑगस्ट-**

श्री संत सेवालाल महाराज बंजारा लमाण तांडा समृद्धी योजनेच्या लातूर जिल्हा स्तरीय समितीच्या अशासकीय सदस्यपदी निलंगा तालुक्यातील दापका तांडा येथील अर्जुन जाधव यांची निवड करण्यात आली आहे.




जिल्हास्तरावर तांड्यांना मूलभूत सुविधा पुरविणे त्याचबरोबर बंजारा लमान तांड्यांना महसूल दर्जा देऊन,स्वतंत्र ग्रामपंचायत निर्माण करण्याचे काम ही समिती करणार आहे. या समितीवर महाराष्ट्रातील १४० बंजारा समाजातील कार्यकर्त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या समितीचे अध्यक्ष जिल्हा परिषद कार्यकारी अधिकारी हे राहणार असून कार्यकर्ते हे अशासकीय सदस्य म्हणून राहणार आहेत. यात लातूर जिल्ह्यातून निलंगा तालुक्यातील दापका तांडा येथील रहिवाशी अर्जुन जाधव व उदगीर तालुक्यातील मल्लापुर तांड्यातील पवन चव्हाण यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे.

## रसिका महाविद्यालयात विलासराव देशमुख यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**देवणी, दि. १४ ऑगस्ट-**

जनसेवा सेवाभावी प्रतिष्ठान, भोपणी द्वारा संचलित कै. रसिका महाविद्यालय, देवणी येथे महाराष्ट्राचे लोकप्रिय लोकनेते स्वर्गीय विलासरावजी देशमुख यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी संस्थाअध्यक्ष गोविंदराव भोपणीकर, प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे, नगरसेवक प्रा. डॉ. महादेव मळभगे,देवणीचे, जाफरसाहब मोमीन, इस्माईल शेख माजी सरपंच देविदास पतंगे, अमरदीप बोरे, समदभाई उंटवाले, पत्रकार प्रताप कोयले इत्यादी मान्यवर उपस्थित होते. यावेळी सर्व उपस्थित मान्यवरांनी स्व. विलासरावजी देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन , पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले. यावेळी कै. रसिका महाविद्यालय व आबासाहेब इंग्लिश स्कूलमधील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. शिवाजी सोनटक्के यांनी केले.



## युवा पुरस्कारासाठी २० ऑगस्टपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

**लातूर, दि. १४ ऑगस्ट-**

राज्याचे युवा धोरण २०१२ अंतर्गत शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्यावतीने १२ नोव्हेंबर, २०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार जिल्ह्यात कार्यरत असलेल्या युवक-युवतींना व नोंदणीकृत संस्थांना, त्यांनी समाजहितासाठी कार्याबद्दल जिल्हा युवा पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. या पुरस्कारासाठी अर्ज सादर करण्यास २० ऑगस्ट २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. जिल्ह्यातील युवक, युवती तसेच नोंदणीकृत संस्थानी २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४ या पाच वर्षाच्या जिल्हा युवा पुरस्कारासाठी २० जुलै, २०२३ पर्यंत अर्ज सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार केवळ १२ पुरस्कार अर्ज प्राप्त झाल्यामुळे जिल्हास्तरावर युवा पुरस्कार अर्ज सादर करण्यास २० ऑगस्ट, २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. या पुरस्कारासाठी विहित नमुन्यातील अर्ज लातूर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातून प्राप्त करुन घ्यावेत. अधिक माहितीसाठी लातूर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील क्रीडा अधिकारी कृष्णा केंद्रे (भ्रमणध्वनी क्र. ९९७५५७६६००) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांनी केले आहे.

## अंगणवाडीच्या भिंतीला भेगा; चिमुकल्यांच्या जिवाला धोका

**तभा वृत्तसेवा,**
**शिरूर अनंतपाळ, दि.१४ ऑगस्ट-**

शिरुर अनंतपाळ तालुक्यातील थेरगाव येथील अंगणवाडी क्रमांक तीन ही नादुरुस्त असल्याने अंगणवाडीतील बालकांच्या जिवितास धोका निर्माण झाला आहे.

सदरील अंगणवाडी विमारत बांधकाम मंजूर होवून दोन ते तीन वर्षे झाली बांधकाम सुरू होवून दोन वर्षे झाली. परंतु निधी अभावी हे बांधकाम अर्धवट राहिलेले आहे. या अर्धवट राहिलेल्या विमारतीस तात्काळ निधी उपलब्ध करून देण्यात यावा व राहीलेले बांधकाम पूर्ण करण्यासाठी मदत करावी तसेच बांधकाम पूर्ण होईपर्यंत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा थेरगाव येथील एक खोली या चिमुकल्या साठी देण्यात यावी, असे निवेदन थेरगावचे उपसरपंच सुनील शिंदे यांनी शिरूर अनंतपाळचे गट विकास अधिकारी बि.टी.चव्हाण यांना दिले आहे.

